
# हाकारा

८:१ (१९८७)



वर्ष आठवे। अंक पहिला। जानेवारी-मार्च १९८७

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मार्गदर्शक : प्रा. गं. बा. सरदार

## कार्यकारी मंडळ

अध्यक्ष : जनार्दन वळवी
उपाध्यक्ष : शरद कुळकर्णी
चिटणीस : रा. के. मुटाटकर
सहचिटणीस : लक्ष्मण कुळकर्णी
खजिनदार : बाबुल पठाण
सभासद : विजय भानू
गोविंद गारे
सुधीर जोग
छायाताई खुरतवंती
सुरेखा दळवी
एकनाथ बावनकर

---

## यांच्या सहकार्याबद्दल परिषद आभारी आहे !


* महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
* शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार.
* भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र.
* आदिवासी विकास संचालनालय, महाराष्ट्र शासन.
* वनविकास महामंडळ, महाराष्ट्र.
* कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता।

# हाकारा



महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

अनुक्रमणिका


१. संपादकीय — २

१. भटक्या विमुक्त जमाती : एक ऐतिहासिक मागोवा — ४
**लक्ष्मण माने**

२. "भटकू नका, तुम्हाला कोण भटकायला सांगतं ?" — १८
**बाळकृष्ण रेणके**

३. महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातींचा अनुसूचित जमातींमध्ये समावेश का ? — २०
**प्रा. मोतीराज राठोड**

४. भटक्या-विमुक्त जमाती विकासाचे प्रयत्न — २४
**बाळकृष्ण रेणके**

५. मानवशास्त्रीय दृष्टीची गरज — ३२
**भास्कर लक्ष्मण भोळे**

६. जिप्सी : स्मृतीआड गेलेली भारताची लेकरे — ३६
**लता बापट**

७. महाराष्ट्रातील कैकाडी समाज — ४१
**त्रिं. ना. आत्रे**



वर्ष आठवे : अंक पहिला
जानेवारी-मार्च १९८७
परिषद / हाकारा संयुक्त
आजीव २०० रुपये
वार्षिक २० रुपये
सुटा अंक किंमत : ५ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४/३, आनंदपार्क, औंध
पुणे ४११ ००७.

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**सहसंपादक**
लता बापट
रमाकांत पाटील

**मुखपृष्ठ**
डॉ. विजय भानू

**प्रकाशक :**
रा. के. मुटाटकर, सचिव,
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे,
यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे,
यांच्यासाठी
कल्पना मुद्रणालय
४६१/४, सदाशिव पेठ,
टिळक रोड,
पुणे ४११ ०३०
येथे छापून प्रसिद्ध केले.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

## संपादकीय

'हाकारा' मधून आदिवासींच्या प्रश्नांची चर्चा प्रामुख्याने करण्यात येत असली तरी आदिवासीतर दलितांच्याही प्रश्नांचे संशोधन व चर्चा करून त्यांच्या विकासाबाबत अभ्यासक, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते व शासकीय अधिकारी यांच्यात सुसंवाद घडवून आणणे हेही उद्दिष्ट मानव विज्ञान परिषदेने समोर ठेवले आहे. या दृष्टीकोनातून भटक्याविमुक्त जमातींच्या प्रश्नांबाबत या अंकात चर्चा करण्यात आली आहे.

केंद्र सरकारने मान्य केलेल्या व्याख्येनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींव्यतिरिक्त भटक्या अर्धभटक्या व डिनोटीफाइड जमातींचाही समावेश मागासवर्गीयांमध्ये होतो. या तिन्ही गटांची त्यांची त्यांची वैशिष्ट्ये आहेत. गटांतर्गतदेखील प्रत्येक जमातीची स्वत:ची सामाजिक, आर्थिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. पोटापाण्याच्या व्यवसायानिमित्ताने या भटक्या व अर्धभटक्या जमातींचा मोठ्या भूप्रदेशावर संचार असतो. उपलब्ध साधनसामुग्री व तिचा कौशल्यपूर्ण वापर व आपल्या वास्तव्यकाळात त्या त्या भागातील रहिवाशांशी त्यांचे प्रस्थापित होणारे सामाजिक–आर्थिक संबंध यावरून या भटक्या व अर्धभटक्या जमातींचा जीवनमार्ग ठरत असतो.

देशातील आर्थिक विकासाचा वाढता वेग, वाढती लोकसंख्या, तुटपुंज्या साधनसामुग्रीसाठी सुरू झालेली तीव्र स्पर्धा व अर्थकारणाची पुनर्रचना यामुळे या जमातींची परंपरागत जीवनपद्धती विस्कळीत झाली आहे. त्यांचेपैकी काहींनी आपले परंपरागत व्यवसाय सोडून दिले आहेत व काही आपले परंपरागत व्यवसाय सांभाळण्याची कोशीस अजुनही करत आहेत. नृत्य-गायन व कथाकथन करून करमणूक करीत गावोगाव फिरणारे, साप, माकड, पोपट यांचा खेळ करणारे, भविष्य सांगणारे, बाहुल्यांचा खेळ करणारे इ. आपल्या तुटपुंज्या प्राप्तीसाठी ग्रामीण व नागर समाजावर अवलंबून असतात. ग्रामीण व नागर समाजाची बदलती अभिरुची, सिनेमा, नाटके, यासारखी करमणुकीची आधुनिक साधने, वेगवान जीवन यामुळे पारंपारिक करमणुकीचे व्यवसाय आता बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. वास्तविक हे लोक आपापल्या व्यवसायात अत्यंत कुशल आहेत पण त्यांना आता पर्यायी व्यवसाय मिळणे कठीण झाले आहे. आधुनिकीकरणाच्या रेट्यात नव्या सामाजिक-आर्थिक शक्तींपुढे त्यांचा टिकाव लागलेला नाही.

समाजाच्या तळागाळातील या लोकांकडे 'गावगाडा' कार त्रि.ना. आत्रे यांनी सर्वप्रथम लक्ष वेधले. त्यानंतर याच समाजातील श्री. लक्ष्मण माने यांनी भटक्या विमुक्तांच्या व्यथावेदना 'उपरा' व त्यापाठोपाठ 'बंद दरवाजा' या बहुचर्चित ग्रंथांमधून मराठी साहित्याच्या वेशीवर टांगल्या. अभ्यासक व कार्यकर्ता असा आज दुर्मिळ झालेला दुहेरी पदर श्री. माने यांच्या व्यक्तिमत्त्वास असल्याने त्यांच्या लिखाणास विशेष मोल व वजन आज प्राप्त झाले आहे. या अंकातील भटक्या विमुक्त जमातींची ऐतिहासिक पार्श्वभूमी, वर्गीकरण व त्यांच्यासंबंधीच्या कायद्यांचा आढावा घेणाऱ्या लक्ष्मण माने यांच्या लेखाचा संबंधितांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

भटक्या विमुक्त जमातींचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची तोंड भरून आश्वासने राज्यकर्त्यांनी

वेळोवेळी दिली, प्रत्यक्षात मात्र त्याकडे दुर्लक्षच केले याकडे बाळकृष्ण रेणके यांनी लक्ष वेधले आहे. भटक्या विमुक्त जमातींचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये करून त्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी प्रा. मोतीराज राठोड यांनी केली आहे. आदिवासी भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अलग पडले होते तर भटक्या विमुक्त जमाती पारंपारिक जातीव्यवस्थेशी संपर्क ठेवून होत्या व त्यांची सेवा करीत होत्या त्यामुळे त्यांच्या प्रश्नांचे स्वरूप आदिवासींच्या प्रश्नांपेक्षा वेगळे असल्याने भटक्या-विमुक्त जमातींचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये न करता त्यांची तिसरी सूची तयार करावी असाही एक मतप्रवाह आहे. यावर व्यापक पातळीवर विचारविनिमय होऊन योग्य निर्णय शासनाने लवकर घ्यावा ही काळाची गरज आहे. भटक्या-विमुक्त जमातींच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या योजनांचा आढावा घेऊन बाळकृष्ण रेणके यांनी या योजनांच्या योग्य अंमलबजावणीसाठी या जमातींचा मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून साकल्यात्मक अभ्यास होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. भारतीय मानवशास्त्राने भटक्या विमुक्त जमातींच्या अभ्यासाकडे पुरेसे लक्ष दिले नाही ही भास्कर भोळे यांची तक्रार रास्त आहे. भटक्या-विमुक्त जमातींच्या प्रश्नांचा मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास झाला तर हे प्रश्न सोडविणे सुकर होईलच पण मानवशास्त्रही त्यातून समृद्ध होईल. मूळ भारतीय वंशाच्या पण आता उपजीविकेसाठी परदेशात भटकंती करणाऱ्या 'जिप्सी' या जमातीसंबंधी डॉ. चमनलाल यांनी केलेल्या मानवशास्त्रीय अभ्यासाचे विवेचन लता बापट यांनी आपल्या लेखात केले आहे.

शोषणविरहित नवसमाजनिर्मितीच्या लक्ष्यात भटक्या विमुक्त जमातींच्या चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे. या चळवळीत काम करणारे कार्यकर्ते तसेच अभ्यासकांनाही हा अंक उपयुक्त वाटेल अशी आशा आहे. वाचक, कार्यकर्त्यांनी या अंकावरील आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात. 'हाकारा' मधून त्यांना योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

## आवाहन

आपण परिषदेचे सन्मान्य सभासद आहात. या वर्षाची वर्गणी लवकरच पाठवावी अशा विचारातही असाल. काही सभासदांची गेल्या दोन-तीन वर्षांची वर्गणी राहिली आहे आम्ही आपले काम अधिक सोपे केले आहे. या अंकासोबतच परिषदेचा पत्ता लिहीलेला मनीऑर्डर फॉर्म पाठविला आहे. त्यावर आपले नाव व पूर्ण पत्ता लिहून आपली वर्गणी मनीऑर्डरने कृपया लवकरात लवकर पाठवा. यामुळे हाकारा 'चे अंक नियमित पाठविणे सोयीचे होईल.

# भटक्या विमुक्त जमाती–

## ( एक ऐतिहासिक मागोवा )

लक्ष्मण माने

### भटके :

भटके किंवा नोमॅड हा शब्द "नेमो" या ग्रीक शब्दापासून तयार झाला आणि त्याचा अर्थ गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, घोडे, उंट चारणारा असा होतो. ग्रीक शब्दाप्रमाणे अशा तऱ्हेची जनावरे पाळण्यासाठी कुरणांचा प्रदेश शोधीत भटकणारे मानव समुह म्हणजे भटके होय.

### भटक्या जमातींचे वर्गीकरण :

### अन्नशोधक भटके :

पृथ्वीवर मानवाची उत्पत्ती सुमारे १० लक्ष वर्षांपूर्वी झाली असे शास्त्रज्ञांचे अनुमान आहे. त्यापैकी केवळ पाच दहा वर्षांची मानवाची वाटचाल उत्खननीय पुराव्या वरून आणि तर्काने आपण समजून घेऊ शकतो. पशुपालन करणारे भटके ही मानवाच्या इतिहासातील बरीच अलीकडील अवस्था आहे. त्यापूर्वी शेकडो हजारो वर्षे मानव जेव्हापासून दोन पायांवर चालू लागला तेव्हापासून निसर्गाने दिलेल्या कंदमुळे, फळे आणि पाण्यातील मास्यावर तो आपला निर्वाह करीत होता. अन्नशोधक भटके ही मानवाची प्रथम अवस्था होती.

### शिकारी भटके :

पाषाण युगात मानव दगडाची हत्यारे निर्माण करू लागला स्वतःच्या रक्षणासाठी आणि प्रतिहल्ल्यासाठी तो त्यांचा उपयोग करू लागला. नंतर त्याला धातूचा आणि लाकडाच्या लवचिकपणाचा शोध लागला. धनुष्यबाण, परशुसारखी अधिकाधिक प्रभावी हत्यारे त्याला करता येऊ लागली. या हत्यारामुळे त्याच्या हल्ल्याचा टप्पा वाढला. त्याला पाहून प्राणी पळू लागले आणि मानव त्यांचा पाठलाग करू लागला. प्राण्यांचे रक्त, मांस भक्षण केले असता त्यांच्या शक्तीचा आपल्यात संचार होतो, या समजातूनच तो मांस भक्षक झाला. शिकारीसाठी तो आता अधिक व्यापक भूप्रदेशात भटकू लागला. शिकारी भटके ही मानवाची त्यानंतरची अवस्था होती.

पशुपक्षातील नरमादीच्या संयोगाप्रमाणे मानव नरमादीचा संयोग नैसर्गिकरित्या झाला असणार. शारिरीक भूक भागवणे या एकाच उद्देशाने होणारा हा अविशिष्ठ नरमादीचा संयोग शेकडो हजारो वर्षे चालू होता. त्यातून पुढे एकाच स्त्री विषयीचे आकर्षण आणि त्या स्त्रीपासून होणाऱ्या संततीच्या रक्षणाच्या जबाबदारीची जाणीव मानवात निर्माण झाली. आणि कुटुंब संस्थेचा जन्म झाला.

शिकारी भटक्याचा, कुत्रा हा आद्यमित्र झाला असावा. कुत्र्याचे भुंकणे त्याला संकटाची सूचना देत होते आणि त्याचा रात्रभरचा पहारा त्याला निश्चित विश्रांती आणि सोबत देत होता. हळूहळू त्याला गाई–म्हशी पासून मिळणारे दूध, शेळ्या मेंढ्या पासून मिळणारी लोकर, घोडे, उंटाच्या दुर्गम प्रवासात आणि इतरांवर हल्ला करण्यासाठी होणारा सुरक्षित उपयोग करू लागला. दुधाच्या प्राशनाने त्याची बुद्धी वाढू लागली. हळूहळू सर्व प्राणी सृष्टीस आपल्या सेवेस जुंपण्यास त्याने सुरुवात केली. बऱ्याच प्राणीमात्रांना मानवाची सोबत सुरक्षिततेची वाटल्यामुळे त्यांनीही त्यांच्या सेवेत राहण्याचे मान्य केले. शेतीचा शोध मानवाला या पूर्वीच लागला होता. आता त्याने बैल, रेडे, यासारख्या प्राण्यांना शेतीस जुंपले. पशु पालनापासून मानवास अधिक अन्न, कमी श्रम आणि अधिकतर सुख मिळू लागले. मानव हळूहळू स्थिर होऊ लागला. नागरी संस्कृतीचा उदय होऊ लागला.

मानवाची ही प्रगती सर्व ठिकाणी सारख्याच वेगाने आणि एकाच काळात अर्थातच झाली नाही. जॉर्डन व्हॅलीतील जेरिको येथे सापडलेल्या उत्खनन पुराव्याचे आधारे मानवाच्या स्थिर जीवनाची सुरुवात आठ-नऊ हजार वर्षांपूर्वी आशियातील पॅलेस्टाईन ते पश्चिम जॉर्डन या पट्ट्यात टायग्रेस आणि यूफ्राटेस नद्यांच्या दूआबात झाली. परंतु पश्चिम यूरोप आणि चीनमध्ये स्थिर संस्कृतीची सुरुवात त्यानंतर चार-पाच हजार वर्षांनी झाली. भारतातही ही संस्कृती त्याच काळात म्हणजे पाच हजार वर्षांपूर्वी सुरू झाली. त्यानंतरच्या काळात मानवाची जी प्रचंड भौतिक व सांस्कृतिक प्रगती झाली त्याचा जो

बौद्धिक विकास झाला तो सुद्धा सर्वत्र सारख्या प्रमाणात झाला नाही. त्यामुळे पृथ्वीच्या काही भागात सुधारलेली संस्कृती तर काही भागात आदिमानवाची पशुतुल्य संस्कृती अशी अवस्था होती. किंबहुना आजही मध्य आफ्रिकेतील "बुशमन" व सिलोनमधील "वेड्डा" टंड्राप्रदेशातील "एस्किमो", अंदमान निकोबारसारख्या अलग पडलेल्या बेटावरील असंख्य टोळ्या पशुतुल्य जीवन जगतात. त्यातूनच अधिकाधिक प्रदेशावर तेथील मूळ मानव समुहाना हाकलून आक्रमण करण्याची हाव निर्माण झाली. स्वतःच्या टोळीचा वांशिक अहंकार व त्यातून उद्भवणाऱ्या लढाया लढल्या गेल्या. मात्र या उलाढालीच्या काळातही मानवाची प्रगतीकडे वाटचाल चालूच होती. व्यापक भूप्रदेशात शिकारीसाठी भटकणाऱ्या या शिकारी भटक्यांच्यात पुढील जमातींचा समावेश होता. पारधी, कैकाडी, वैदू, गोपाळ, ठाकर, ढेवर, पाल-लोर, बेरड, रामोशी, छारा, बंजारा इ.

### चारण भटके :

पशुंचे संगोपन करणाऱ्या भटक्या मानवसमूहांना "चारणभटके" ही संज्ञा दिली जाते. भटक्या मानव समूहाची शिकारी भटक्या नंतरची ही अवस्था आहे. पशुंचा कळप सांभाळत "चारणभटके" पृथ्वीवरील अधिकाधिक सुपीक कुरणांच्या प्रदेशाचा शोध घेत नव्या नव्या भूभागात भटकत होते. त्यांच्या पशुचे रूपांतर पशुधनात झाले होते. पशुधनाची विक्री होऊ लागली. आणि काही भटके हे पशुंचा व्यापार करणारे व्यापारी भटके झाले. हे वेगवेगळ्या जमातींच्या यात्रांच्या निमित्ताने गाढवे, घोडे, उंट, हत्ती, हरिण, ससे, कोल्हे, डुकरे, यांची विक्री करू लागले आणि मानवाची वाटचाल आधुनिकतेकडे वेगाने सुरू झाली.

### आध्यात्मिक करमणूक करणारे भटके :

मानवाची आध्यात्मिक करमणूक करणारे लोक, जे आध्यात्मिक भूक, दयाबुद्धी जागृत करून ईश्वराचा भक्त बनून पोटासाठी भीक मागतात, देवाच्या नावाने पूजन, भजन, संकीर्तन करतात आणि दारोदार फिरून भीक मागतात. मंत्र, तंत्र, जादूटोणा, भूतपिशाच्य, यांची भिती घालून भविष्य सांगून पोट भरतात यांना आध्यात्मिक करमणूक करणारे भटके म्हणता येईल. उदा. भोपे, भुते, बैरागी, गोंधळी, वासुदेव, पांगूळ चित्रकथी जोशी, भराडी मागते भक्त इ.

### करमणूक करणारे भटके :

लोकरंजनातून, लोकानूनय करून, याचना करून, लोकांना हसवून त्याची करमणूक करणारे भटके करमणूक करणारे भटके होत. उदा. आराधी, बहुरूपी, माकडवाले, अस्वलवाले, दरवेशी, गोपाळ, डोंबारी, कोल्हाटी.

भारतात सुमारे ५०००० वर्षांपूर्वी मानवाची उच्चतर संस्कृती नांदत होती हे मोहेंजोदडो आणि हडाप्पा येथे उपलब्ध झालेल्या पुराव्या वरून सिद्ध झाले. नगररचना, सौंदर्यकल्पना, ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र गणित, भूगोल, तत्वज्ञान, राजकारण, अर्थकारण, वाङ्मय धर्मशास्त्र, इत्यादीत निपुण असा मानव समाज येथे होता. हिंदुचा मूळ धर्मग्रंथ ऋग्वेदसंहिता तीन ते पाच हजार वर्षांपूर्वीचा मानला जातो. पाण्यातील ॲमिबापासून प्रथम जलचर त्यानंतर वनचर, खग आणि मानव ही जीवशास्त्राची आधुनिक कल्पना तत्कालीन हिंदूधर्मातील अवतार कल्पनेशी मिळती जुळती आहे. निसर्गातील रहस्ये ओळखून मानवाने निसर्गावर मिळविलेल्या अनेक विजयांची प्रसादचिन्हे या काळातील मानवास ज्ञात होती असेही सिद्ध झालेले आहे.

त्यानंतरच्या काळातही भारतात अनेक समृद्ध राजघराणी होती आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मानवाची प्रगती होत होती. मात्र ही राजघराणी नगरराज्ये होती आणि देशाच्या दुर्गम आणि अंतर्गत भागात भटक्या अवस्थेतील मानवसमूह पूर्वीप्रमाणेच भटकत होते. इंग्रजी राज्याच्या आणि यंत्रयुगाच्या सुरुवातीपर्यंत या मानव समूहांचा फारसा अभ्यास झाल्याचे दिसत नाही. मोगल सत्तेच्या अखेरच्या आणि इंग्रजी सत्तेच्या सुरुवातीच्या काळात भारतात सुव्यवस्थीत राज्यव्यवस्थाच अस्तित्वात नव्हती. इंग्रजांचे लक्ष मुख्यतः व्यापारवृद्धी आणि राज्य याकडे होते तर एतददेशीय राजे आपापसात किंवा इंग्रजाबरोबर लढाया करत होते. राज्याच्या सुव्यवस्थेकडे कोणाचेच लक्ष नसलेल्या या काळात उत्तर भारतात ठगांचा आणि दरोडेखोरांचा सुळसुळाट झाला होता. जनजीवन अस्ताव्यस्त झाले होते.

तसे अलेक्झांडरच्या आक्रमणापूर्वी या देशाच्या आदिम मानल्या गेलेल्या जमाती विषयी कुठलीही माहिती उपलब्ध नाही. गुन्हेगार जमातींचे मूळचे वंशज कोण ? ते लोक गुन्हेगार केव्हा व कसे व का झाले ? इत्यादी बाबतची माहिती उपलब्ध नाही.

अलेक्झांडरच्या स्वारीनंतर कागदोपत्री थोडाफार पुरावा उपलब्ध होतो. प्रा. सेरसिंग यांनी पंजाबच्या खामी या जमातीचा अभ्यास करून अशी माहिती दिली की भारतात या जमातीची दखल सर्वप्रथम १७७३ साली घेण्यात आली आणि त्यानंतर गुन्हेगारीच्या संदर्भातला पहिला कायदा १७९३ साली झाला. या कायद्याच्या १६ व्या रेग्युलेशन प्रमाणे व्यक्तीगतरित्या किंवा गटाने केलेल्या गुन्हयांना शासन करण्याची तरतूद झाली. एका अर्थाने हिंदुस्थानात लॉ ॲण्ड ऑर्डरचे राज्य खऱ्या अर्थाने सुरू झाले. यापूर्वी गुन्हेगारीच्या संदर्भातले कागदोपत्री पुरावे दिसत नाहीत. या कायद्यामध्ये १९३६ साली थोडा बदल झाला. कलम ३० अन्वये गुन्हेगारांना शिक्षा ठोठावल्या जावू लागल्या. ब्रिटीशांचे राज्य आता हिंदुस्थानात स्थिरावू लागले होते. कायदा आणि सुव्यवस्था पहाणारे कायद्याचे राज्य अशी स्वतःची प्रतिमा हिंदूस्थानात त्यांना उभी करायची होती.

### डोंगरदऱ्यांचा आश्रय :

१८४३ साली इनामकमिशन आले. या कमिशनने वतने, इनामी जमिनी, जहागिऱ्या जप्त केल्या व त्यामुळे देशी संस्थानिक, त्यांचा फौजफाटा, लवाजमा सगळे काही बेकार झाले. या सगळ्यांचे सर्वस्व वतनांच्या बरोबर ब्रिटीशांनी हिरावून घेतले. पुढे गुन्हेगारांच्या यादीत आलेले रामोशी, बेरड, बेस्तर, नाईक, नाईकवडी, तलवार इ. संस्थानिक यात्र कायद्याने बेकार केले गेले. बेकारीच्या कारणासाठी यांना गुन्हेगारीकडे वळावे लागले. यात मयूरचे नायक घराणे, तंजावरचे नायक घराणे, कालहस्तीचे नायक घराणे, सोलापूरचे गुलबर्गा संस्थान, केळदी सिमोगाचे नायक घराणे, कणकगिरी संस्थान अशी लहान मोठी अनेक संस्थाने हिंदुस्थानात खालसा झाली. १८१८ ला पेशवाई बुडाली. मराठा सैन्यातही या जमातींचा मोठा भरणा होता. अशा रितीने देशी संस्थानिकांशी एकनिष्ठ असलेला फार मोठा फौजफाटा बेकार तांड्याच्या स्वरूपात फिरत होता. १८५७ साली ब्रिटीशांच्या विरुद्ध पहिले स्वातंत्र्य युद्ध झाले. या युद्धाची पूर्वपिठीका संस्थाने खालसा करणे, दत्तक वारस नामंजूर करणे या स्वरूपाचीच होती. या युद्धामध्ये देशी संस्थानिकाकडील बेकार झालेल्या सैनिकांनी कडवी झुंज दिली. ब्रिटीशांना मोठा हादरा बसला. कारण हा उठाव हिंदुस्थानमध्ये स्वयंस्फुर्त होता, व्यापक होता. या लढ्याचा कुणी एक नेता नव्हता परंतु या लढ्याचे स्वरूप ब्रिटीशांनी हेरले व अतिशय मुत्सद्दीगिरीने पावले टाकावयास सुरुवात केली. १८५७ पर्यंत हिंदूस्थानमध्ये नागरिकांना स्वसंरक्षणसाठी इतरांच्या आक्रमणापासून स्वतःवरच अवलंबून रहावे लागत असे. त्यामुळे हत्यारे, शस्त्रास्त्रे जवळ बाळगता येत होती. १८५८ साली शस्त्र बाळगण्याविरुद्ध प्रतिबंधक कायदा झाला. लोकांना पूर्वापार बाळगता येणारी शस्त्रे बाळगता येईनाशी झाली. त्यामुळे लोक स्वसंरक्षणार्थ डोंगर, दऱ्या, खोरी, जंगले धुंडाळू लागले. एका अर्थाने या टोळ्या सैर-भैर झाल्या. त्यांनी स्वतःला इतरांपासून तोडून घेतले आणि डोंगर दऱ्यात लपून छपून राहू लागले. इंडियन पिनल कोडमध्ये १८६० मध्ये दुरुस्ती झाली आणि या जाती जमातीतील गुन्हेगारी केलेल्या व्यक्तींना किंवा संपूर्ण गटाला शासन करण्याची तरतुद करण्यात आली.

### आणि जमात गुन्हेगार ठरली

१८७१ मध्ये एखादी संपूर्ण जमात गुन्हेगार म्हणून जाहिर करण्याचे अधिकार गुन्हेगार जमातीचा कायदा अंमलात आणून शासनाला देण्यात आले. हाच तो कलंकीत १८७१ चा क्रिमीनल ट्राईब्ज ॲक्ट. हा कायदा १८७१ मध्ये अंमलात आला असला तरी एकूण समाजाची आणि शासनाची पावले ह्या दृष्टीने १७९३ पासूनच पडत होती. या कायद्यामुळे जमातीच्या–जमाती या गुन्हेगार जमाती म्हणून समजल्या गेल्या. गुन्हेगारी हा या जमातींचा स्थायी भाव बनला. या जमातींच्या लोकांवर सर्व प्रकारची बंधने लादली गेली. त्यामुळे जमातीच्या-जमाती, टोळयाच्या टोळ्या व्यापक समाजापासून वेगळ्या पडल्या गेल्या. प्रारंभी हा कायदा सिंध, पंजाब व आवध मध्ये होता. तो हळूहळू भारतातील सर्व तत्कालीन प्रांतीक सरकारनी स्विकारला. १८७६ मध्ये या कायद्यात बदल झाला. या बदलाने स्थानिक, प्रादेशिक सरकारकडे या जातींना गुन्हेगार जाती म्हणून घोषित करण्याचे अधिकार देण्यात आले.

### जाचक निर्बंध :

१८८७ मध्ये गुन्हेगार जमातींच्या कायद्यात बदल होऊन गुन्हेगार म्हणून घोषीत झालेल्या जमातीतील ४–१८ वयोगटातील मुलांना पालकांपासून अलग करण्याचा अधिकार शासनाला प्राप्त झाला. एखाद्या जातीत वा जमातीत गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आढळले तर संपूर्ण जातीचे लोक गुन्हेगार म्हणून गृहित धरून त्यांचेवर जाचक निर्बंध घालण्याचे अधिकार सरकारला मिळाले. एकाच गुन्हेगाराकडून गुन्ह्यांची पुनरावृत्ती घडली तर वाढीव व कठोर शासन करण्याची तरतुद कायद्यात करण्यात आली.

१९११ साली या कायद्यात पुन्हा दुरुस्ती झाली. बालकांच्या वयाच्या ४ वर्षा ऐवजी ६ वर्षापासून पालकापासून अलग करण्यात येऊ लागले. बालकासंबंधी किंचित हळूवार-पणाची झुळुक या दुरुस्तीत असली तरी गुन्ह्यांना अत्यंत कठोर शासनाची तरतुद होती. या कायद्याने गुन्हेगारांचे नवीन वर्ग तयार करण्यात आले.

( १ ) जे मुळचे गुन्हेगार परंतु ज्यांच्यात पुढे सुधारणा झाली. मुळ गुन्हेगार म्हणून घोषीत झालेले काही न सुधारता गुन्हेगारीच करत राहिले असे गुन्हेगार जमातीतील सुधार-लेले, न सुधारक असलेले लोक.

( २ ) अशा जमाती ज्यांनी वरकरणी कोणतातरी व्यवसाय स्विकारला परंतु संधी मिळेल तेव्हा त्यांच्या-पैकी काही चोऱ्या दरोडे इ. स्वरूपाचे गुन्हे करीत राहिले आणि त्याजवर गुजारणा करीत राहिले.

( ३ ) भटक्या जमाती ज्या कुठेही स्थायी जीवन जगत नाहीत आणि संधी मिळताच त्यातील लोक गुन्हे करतात. या निरनिराळ्या स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या व गुन्ह्यांचे निरनिराळे तंत्र अवलंबणाऱ्या जमातीशी कसे वागावे, त्याचा बंदोबस्त कसा करावा या संबंधी पोलीसांना विस्तृत मार्ग-दर्शन केले आहे. या संबंधी १९०८ साली मुंबई इला-ख्याच्या शासनाने एक पुस्तक प्रकाशित केले.

### काळा कायदा :

यानंतर १९२४ साली या कायद्यात पुन्हा थोडी सुधा-रणा करण्यात आली आणि या कायद्याने प्रथमतःच गुन्हेगार जमातींच्या लोकांनी केलेल्या गुन्ह्याची प्राथमिक चौकशी करण्याची तरतूद केली. म्हणजे १८७१ ते १९२४ या त्रेपन्न वर्षांच्या काळात या जमातीनी गुन्हा केला की नाही याची प्राथमिक चौकशीही होत नसे.

या गुन्हेगार जमाती कायद्याप्रमाणे गुन्हेगार जमातीतल्या व्यक्तींचा भयानक छळ सुरू झाला. या कायद्यानुसार गुन्हेगार जमातींच्या प्रत्येक व्यक्तीने स्वतःची नोंद करून दिली पाहिजे. प्रत्येकाने बोटाचे-ठसे घेऊ दिले पाहिजेत. स्थलांतर करायचे असेल तर स्थलांतराची अगाऊ कल्पना स्थानिक पोलीस अधिकाऱ्याला दिली पाहिजे. गुन्हेगार जमातींच्या व्यक्तीच्या किंवा जमातीतील संपूर्ण गटाच्या प्रवासावर निर्बंध घालण्याची सोय कायद्यात अंतर्भुत झाली. या कायद्याने त्याची दिवसातुन तीन वेळा हजेरी लागली. कायदा व सुव्यवस्थेच्या नावाने चाललेला हा तमाशा. या जमाती पासून इतरांचे रक्षण करण्याच्या नावाखाली या संपूर्ण जमातींच्या जमातींना बराकी बनवण्यात आल्या. या जमाती म्हणजे सर्व समाजाचे शत्रु समजण्यात आले. या कायद्याने भटक्या आणि विमुक्त जमातींच्या जमाती व्यापक समाजापासुन तोडण्यात आल्या. त्यांच्या वेगळ्या वसाहती निर्माण करण्यात आल्या. एका अर्थाने हे कॉन्स्ट्रेशन कॅम्पसुच होते.

### गुन्हेगारी जन्माने ठरली :

हा काळा कायदा मांडत असताना त्या वेळच्या कायदा व सुव्यवस्था समितीचे सदस्य जे. व्ही. स्टीफनस् यांनी सदर बील मांडताना त्यांनी जे भाषण केले ( १८७१ क्रिमीनल ट्राईब्ज ॲक्ट ) ते मोठे नामी आहे ते म्हणाले,

" समाजातील जाती व्यवस्था हा भारताचा एक विशेष आहे. जातींनीच व्यवसाय ठरवले जातात अशी येथे स्थिती आहे. सुताराच्या कुटुंबातील व्यक्ती शतकानुशतके सुतारच होईल. तर भंग्याच्या कुटुंबातील व्यक्ती शतकानुशतके भंगीच राहिल हे लक्षात घेतले तर " जातिवंत गुन्हेगार " या संज्ञेचा अर्थ स्पष्ट होतो. त्याचा सरळ अर्थ असा, ही अशी जमात आहे की, ज्यांचे पूर्वज अनादी काळापासून गुन्हेगार होते, ज्या जमातीतील लोक स्वतः जातीचा व्यव-साय म्हणून गुन्हेगारी करतात आणि त्यांचे वंशजही स्वतःच्या जात धंद्याला अनुसरून कायद्याचे उलंघन करून गुन्हे करीत रहाणार आहेत. त्यांची ही अवस्था त्यांचे ठगाप्रमाणे समुळ उच्चाटन केल्याशिवाय बदलू शकणार नाही. जेव्हा या जमातीतील व्यक्ती असे कबूल करते की कायद्यासमोर तो गुन्हेगार आहे तेव्हा त्याचा अर्थ असा की, गुन्हेगारी हा त्यांचा व्यवसाय आहे. त्यांच्या जन्मा-पासून आहे आणि तो त्यांच्या अंतकाळापर्यन्त तसाच रहाणार आहे. त्यांच्यात सुधारणा होणे अशक्य आहे. कारण गुन्हेगारी हा त्यांच्या जातीचा धंदा आहे. एवढेच नाही तर गुन्हा करणे हा त्यांचा धर्म आहे. या कायद्याने अनेक गोष्टी गृहित धरलेल्या आहेत. उदा. या जातीतील मूल जन्मतःच गुन्हेगार होते कारण ते लहानपणापासूनच गुन्हेगारी करत फिरते. एकदा गुन्हेगारी करण्याचे कौशल्य मिळवले की हेच आपल्या उपजिविकेचे साधन आहे, असे ते मानु लागते, आणि गुन्हेगारी हा त्याचा व्यवसाय बनतो.

गुन्हेगारी कृत्य सतत करत राहिल्याने व्यक्ती निर्ढाव-लेल्या गुन्हेगार बनतात. नंतर त्यांना सुधारणे केवळ अशक्य असते. अशा व्यक्तींचा समुह म्हणजे गुन्हेगार जमात होय. अशा अनेक गुन्हेगार जमाती या क्रिमीनल ट्राईब्ज ॲक्ट मध्ये अंतर्भुत केल्या होत्या.

भारतात सर्व कर्म जात धर्म बघून केली जातात कारण तेथे जातीचे प्राबल्य आहे. म्हणून जात धर्माने ठरते व्यक्तीचे सर्व जीवन जात नियंत्रीत करते म्हणून जात-गाव, जात-धंदा, जातीनेच ठरतो. म्हणून गुन्हेगार पूर्वजांचे वंशजही गुन्हेगारच असणार अशा अनैसर्गीक व अशास्त्रीय आधारावर हा कायदा करण्यात आला. परिणामी भटक्या लोकांचे समुहच्या समुह हे गुन्हेगार टोळ्या म्हणून ठरवण्यात आल्या. त्यांच्या वेगळ्या सेटलमेंटस् कॉलनीज् तयार करण्यात आल्या, अशी ५२ सेटलमेंटस् तर एकट्या मुंबई इलाख्यात होती. या गुन्हेगारांना तीन तारांच्या कंपौंडमध्ये अडकवून ठेवण्यात आले होते.

## जमातीच्या पुर्नवसनाचे प्रयत्न

या अमानवी अनैसर्गिक कायद्याच्या विरोधी काही तज्ञ संवेदनाशील मंडळीनी त्या काळामध्ये या कायद्याच्या विरोधी गुन्हेगार जमातींच्या परिषदा घेतल्या. १४ मे १९३९ ला "तिन्नेवेल्ली" येथे पहिली गुन्हेगार जमातीची परिषद भरली. त्यानंतर १० आक्टोबर १९३९ रोजी बिहारचे त्यावेळचे गव्हर्नर एम्. एस्. अने यांनी अखिल भारतीय गुन्हेगार जाती जमातीच्या परिषदेच्या अध्यक्ष पदावरून बोलताना पुढील उद्गार काढले.

"खूप विचारांती आम्ही एखादी संपूर्ण जमात त्याच्यातील काही लोकांच्या चुकांमुळे गुन्हेगार म्हणून जाहिर करण्यास व त्यातील सदस्यांची नोंदणी करण्यास विरोध केला. केवळ त्यांचेवरील संशयावरून त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने आणणाऱ्या जाचक अमानवी बंधनांवर आक्षेप घेतले, आम्हाला गुन्हेगार जमातींच्या कायद्यातील कलम २३ ला कडवा विरोध करणे हे आवश्यक वाटले, कारण त्यातील अमानुषतेमुळे कठोर व सराईत गुन्हेगारच निर्माण होतील. सदर कायद्याला प्रारंभी काही महत्त्व असले व त्यात काही तथ्य असले तरी तो आता निर्विवादपणे कालबाह्य झाला आहे."

याच परिषदेचे अखिल भारतीय हरिजन सेवक संघाचे चिटणीस, आदिम जाती सेवक संघाचे उपाध्यक्ष, महात्मा गांधींचे निकटचे अनुयायी ए. व्ही. ठक्कर यांनी भारतातील एखाद्या जमातीतील सर्वांनाच राक्षसी मानण्यात येऊन त्यांच्या हातून जर गुन्ह्याची पुनरावृत्ती घडली तर कठोरात कठोर शासन करण्याची तरतुद असणाऱ्या या कायद्यावर कठोर टीका केली. हा कायदा म्हणजे मानवी समुहाचे कोंडवाडे आहेत ह्यातुन राक्षसच निर्माण होतील म्हणून हा कायदा कोणत्याही परिस्थितीत रद्द झाला पाहिजे अशी मागणी केली. या परिषदेत देशभक्त कोंडा व्यंकट पुय्या, दिवाण बहादूर, व्ही. अय्यंगार या विधीज्ञांनी ही सदर कायद्याला विरोध दर्शवला त्यावेळचे न्याय खात्याचे मंत्री डॉ. के. एन. काटजू यांनी असे म्हटले आहे की, गुन्हेगार जमातीत जन्माला आलेल्या अश्राप बालकांना जन्मतःच गुन्हेगार असल्याचे म्हणणे म्हणजे मानवतेचा व परमेश्वराचा अपमान करणे आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू हे आरंभापासूनच या कायद्याच्या विरोधी होते. आंध्र प्रदेशातील नेल्लोर येथे १८ ऑक्टोबर १९३६ रोजी केलेल्या भाषणात त्यांनी पुढील उद्गार काढले.

"I am aware of monstrous provisions of the Criminal Tribes Act, which constituted negation of civil liberty. Wide publicity should be given to its working and an attempt made to have the Act removed from the statute book. No tribes could be classed as criminal as such and the whole principle is out of consonance with all civilized principles of criminal justice and treatment it offers."

व्ही. राघवय्या यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या भारतभरच्या या कायद्या विरुद्धच्या संघर्षाने जवाहरलालजी समाधानी झाले. हे अशा स्वरूपाचे प्रयत्न महाराष्ट्राबाहेर चालू असतानाच काही प्रयत्न महाराष्ट्रामध्येही झाल्याचे दिसते. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे आधारस्तंभ महात्मा ज्योतीराव फुले यांनी त्यांच्या "शेतकऱ्याचा आसूड"मध्ये या जमातींची दखल घेतली आहे, तर महर्षी विठ्ठलरामजी शिंदे यांनी या जमातीमध्ये प्रत्यक्ष काम केले आहे, त्यांच्यावर लिहिले आहे, त्यांच्या चळवळी संघटीत केल्या आहेत असे दिसते. राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांनी तर आपल्या खाजगीकडचा बंदोबस्त पारध्याच्या सारख्या बदनाम असलेल्या जमातीकडे देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला होता. आजही कित्येक पारध्यांकडे त्यांनी दिलेले बिल्ले, किताब, शिकारीचे परवाने पहायला मिळतात, तर शिकारीसाठी माकडवाला वैदु या जमातींना महाराजांनी महाराष्ट्रात आणल्याचे आजही या जमातीतील लोक सांगतात.

मुंबई सरकारने १९३८ मध्ये काही जातींना या कायद्याचे जोखडातून मुक्त केले. १९४२ मध्ये त्यात दुरुस्ती केली.

कलम २३ मधील Transpartation of Life ची तरतुद रद्द केली. त्यांतील शिक्षेचे स्वरूप सौम्य केले.

मद्रास सरकारने १९४६ मध्ये या कायद्यातील काही कलमांची अंमलबजावणी थांबवली होती. १९४८ मध्ये हा कायदा बंद केला. १९४७ मध्ये उत्तर प्रदेश सरकारने चौकशी समिती नेमली. भारतात सर्वत्र गुन्ह्यांचे स्वरूप पाहून शिक्षा करण्याची तरतूद असलेले बिल मंजूर झाले. शेवटी १८७१ साली सुरू झालेला गुन्हेगार जमाती संबंधीचा अशास्त्रीय आधारावर आधारलेला क्रूर कायदा संसदेने १९५२ साली रद्द केला. गुन्हेगार जाती जमातींना विमुक्त म्हणून घोषीत करण्यात आले. त्यांचेवर असलेले निर्बंध रद्द झाले. एखाद्या विशिष्ट जाती जमातीतील व्यक्ती जन्माने गुन्हेगार असतात हे तत्त्व नाकारले गेले. असे असले तरी ८१ वर्षे हा कायदा अस्तित्वात होता म्हणजे तीन पिढ्या समाजमानसात या जातीजमातींकडे ते गुन्हेगार म्हणून पाहिले गेले. त्यामुळे समाजाचा त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला नाही, दूरावा कायम राहिला तो घालवण्याचा प्रयत्न कुणीही केला नाही.

गुन्हेगारीचा कलंक लागलेल्या या जमाती गुन्हेगारी जीवनाच्या या आवर्तात फिरत राहिल्या, आणि गावगाड्याने त्यांच्याकडे संशयाने पाहिले. गुन्हेगार जमातीतील सर्वच स्त्री-पुरुष मूळ गुन्हेगार असतात. चोर, दरोडेखोर असतात अशी त्यांच्या संबंधीची धारणा समाजाची असते. या जाती विमुक्त झाल्या असल्या तरी आजही अविश्वासच कायम आहे, कुठेही गुन्हा झाला तरी पहिले संशयीत म्हणून यांनाच धारेवर धरले जाते. छळ केला जातो. जवळ जवळ १५० वर्षे या जमातींकडे शासनाने आणि गावातील समाजाने गुन्हेगार म्हणून पाहिले, वागविले. त्यामुळे सहाजिकच या जमातींनी स्वतःची निराळी यंत्रणा उभारली. जगण्याचे नियम तयार केले. न्याय पंचायतीची स्वतंत्र व्यवस्था केली, संरक्षणासाठी गुप्त भाषा केली. जातगावे अस्तित्वात आणली. त्यांची संरचना निर्माण केली. आजही भटक्या विमुक्तांनी आपली स्वतंत्र संस्कृती जतन केल्याचे दिसते. वेश, भाषा, भूषा, भोजन, गायन, वेगवेगळ्या कला, क्रीडा, संगीत अशा अनेक बाबी त्यांच्या आदीम संस्कृतीच्या खुणा म्हणून त्यांनी जोपासल्याचे दिसते. परंतु त्यांचाही अभ्यास अद्यापपर्यंत झाला नाही. तो होणे अत्यंत गरजेचे आहे व्यापक समाजाने त्यांना समजावून घेणे व त्यांनी व्यापक समाजाला समजावून घेणे, दोघांच्यातल्या दूराव्याची दरी कमी करता आली तर आणि भटक्या विमुक्तांचा अलग पडलेला सांस्कृतिक प्रवाह मुख्य प्रवाहात विलीन झाला तरच भटक्या विमुक्तांचे प्रश्न सुटू शकतील.

भटक्या आणि विमुक्त जमातींचे अनेक प्रश्न आहेत. १८७१ साली ब्रिटीश सरकारने क्रिमीनल ट्राईब्ज ॲक्ट नावाची अतिशय निषेधार्य गोष्ट केली. जवळपास १५० वर्षे हा समाज गुलामीच्या जोखड नी बांधून टाकला माणसांचे खुराडे, कोंडवाडे केले. आधीच जातीने शापीत असलेला हा भारतीय समाज या जमातींच्या काळ्या कुट्ट भविष्याची नांदी ठरला. पण दुःखात सुख एवढेच की, यांच्या पुनर्वसनाचा विचार तत्कालीन सरकारने केला होता, असे त्यांच्या अनेक कामावरून वाटते. १८७१ च्या क्रिमीनल ॲक्टने या कायद्यात सुधारणा करून गुन्हेगार जमातींची सेटलमेंटस् तयार केली होती. तीन तारांच्या कंपाऊंडमध्ये त्यांच्या वसाहती होत्या. या वसाहतींमध्ये यांच्या पुनर्वसनाचा प्रयोगच चालू होता. त्यांनी या वसाहतींमध्ये सक्तीचे मोफत शिक्षण देणाऱ्या शाळा सुरु केल्या होत्या. या शाळा पुन्हा हेतुतः धंदेशिक्षण शाळा या स्वरूपात चालू होत्या. या शाळांमध्ये मुलांना, प्रौढमाणसांना तांत्रीक शिक्षण दिले जाई. त्यामध्ये प्रोसेसिंग, कारपेंटरी, टेलरींग, या स्वरूपाचे शिक्षण होते. उदा. सोलापूर हे हिंदुस्थानातील सर्वात मोठे सेटलमेंट होय. ब्रिटीश सरकारने या जमातींच्या पुर्नवसनासाठी शेकडो एकर जमिनी राखून ठेवल्या होत्या असे आज दिसते. सोलापूर ४८० एकर, मुंढवा सेटलमेंट पुणे २३५ एकर, बारामती सेटलमेंट २५० एकर, असे अनेक ठिकाणी म्हणजे जवळपास ५२ ठिकाणच्या वसाहतींमध्ये त्यांना वरील प्रकारचे शिक्षण देण्यात येत होते. सोलापूरचे वैशिष्ठ्य असे की, तेथील सेटलमेंटमध्ये वस्त्रोद्योगात लागणारे तांत्रिक शिक्षण दिले जाई व शिक्षण घेतलेल्या माणसाला शासनाच्या लक्ष्मी मिल मध्ये लगेच नोकरीला ठेवले जाई. अशा नोकरीला लागलेल्या माणसांची वेगळी वसाहत होई. अशा वसाहतीला फ्री-कॉलनी म्हणत असत.

सेटलमेंट तारांच्या उघड्या तुरुंगात चालवले जाणारे तीन तारांचे कॉन्सनट्रेशन कॅम्पस् अखेर १९५२ साली भारत सरकारने १८७१ चा गुन्हेगार कायदा रद्द ठरवून केले. या कायद्याने पोलीस खात्याकडे असलेल्या गुन्हेगार जमातींची यादी रद्द झाली. परंतु प्रस्थापित पोलीस यंत्रणेने नेमका हा कायदा वेगळ्या मार्गाने चालू ठेवला असे दिसते. गुन्हेगार जमातींचा कायदा रद्द झाला, तरी हॅबीच्यूअल अफेंडरर्स ॲक्ट नावाचा नवा कायदा केला व

आजही हा काळा कायदा चालू असून माजी गुन्हेगार जमातींची यादी आजही पोलीसांच्या दप्तरी सापडते. कुठेही गुन्हा झाला तरी पारधी, कैकाडी, रामोशी, लमाण बंजारा, टकारी यांनाच पहिल्यांदा संशयीत गुन्हेगार म्हणून अटक केली जाते. पोलिसांच्या ट्रेनिंग कोर्सच्या अभ्यास-क्रमात आजही गुन्हेगार जमाती कायदा शिकवला जातो आणि हॅबिच्यूअल ऑफेंडर्स ॲक्ट ही चालू ठेवला जातो. ही मागल्या दाराने आलेली १८७१ च्या कायद्याची पुर्न-स्थापनाच होय.

१९५२ साली कायदा रद्द झाला असला तरी तो कागदोपत्री रद्द झाला होता. तारांचे कंम्पौंडमध्ये दिवसातून तीन वेळा आणि रात्री तीन वेळा पोलीसांची हजेरी चालूच होती. एका जागेवरून दुसऱ्या जागी बिऱ्हाड जाऊ लागले की, कोतवाल गाढव, माणसं, कुत्री, भांडी, कोंबडी मोजून घेत होता. हजेरी चालू होती. जन्माला येणाऱ्या प्रत्येकाच्या हाताचे ठसे पोलिसांच्या दप्तरी दाखल होत होते. जरा खुट्ट झाले की मरणाची मारहाण व्यापक समाज व पोलीस दोघेही करत होते. राजरोसपणे या जमातींवर अत्याचार चालू होते.

गुन्हेगार जमाती कायदा रद्द झाला, आणि १९५३ साली मागास वर्गीयांच्या अभ्यासासाठी नेमलेल्या काका-साहेब कालेलकर आयोगाचा अहवाल १९५५ साली लोक-सभेपुढे ठेवण्यात आला. या आयोगाचे पुढे काय झाले हे जगजाहिर आहेच, पण आयोगाने अति मागासलेले ठरव-लेले जात-जमात समुह १९६० साली पुन्हा वेगवेगळ्या परिशिष्ठामध्ये घातले गेले. उदा. बंगालमधल्या गुन्हेगार-जमाती अनुसूचित जमातीमध्ये घातल्या, तर कर्नाटकात या गुन्हेगार जमाती अनुसूचित जातीच्या यादीत घातल्या, आंध्रमध्ये या जमाती अनुसूचित जमातीत घातल्या. तामीळनाडूमध्ये या जमाती आदिवासी मानण्यात आल्या. तर महाराष्ट्रात या जमातींची तिसरी यादी तयार करून त्यांना डिनोटीफाईड कम्युनिटीज्, एक्सक्रिमीनल ट्राईब्ज, विमुक्त जाती, भटक्या जमाती, नावाने राज्याने सवलतीस पात्र केले. त्यातही पुन्हा एकाच जमातीला वेगवेगळया यादीत एकाच प्रांतात घातले आहे. उदा. तामीळनाडूमध्ये कुरवंजी, कुळव, केरळात कुरवंजी, ओरिसा व आंध्रमध्ये येरकुला, पामलोग, कर्नाटकात कोरवा, कोरचा, कोरमा, कोरमा, कोरवॉर, कुंची कोरवा, महाराष्ट्रात कैकाडी अशा असंख्य नांवाने ओळखला जाणारा हा समाज रोटी बेटी व्यवहाराने, जमात पंचायतीने एकसंघ बांधलेला आहे. पण शासनाने तयार केलेल्या याद्यांमध्ये मात्र तो विखूरला आहे. महाराष्ट्रात तो विदर्भात अनुसूचित जातीत आहे. तर विदर्भ सोडता उरलेल्या महाराष्ट्रात तो विमुक्त जमातीत आहे. हीच गोष्ट बंजारा, बावरी, कैकाडी, गोंधळी, जोशी, मराडी यांची आहे, असे आपणास दिसेल. वस्तुतः नोमॅडिक किंवा भटक्या जमातींची वेगळी यादी तयार व्हायला हवी होती. किंवा या जमातींना इंग्रजीमध्ये नोमॅडिक ट्राईब्ज किंवा क्रिमीनल ट्राईब्ज म्हणून शासनानेच या जमाती असल्याचे मान्य केले आहे. मग भारतीय पातळीवर यांना अनुसूचीत जमातींच्या यादीत का घातले नाही ? उलट या गुन्हेगारी व शिक्षाकरी वृत्तीने शापीत असलेल्या कायद्याने या लोकांची जबाबदारी राज्य शासनावर टाकून केंद्राने आपले हात झटकून टाकले आहेत. वस्तूतः हा कायदा केंद्राचा होता. मग केंद्राने त्यांच्या पूर्नवसनासाठी कायदा करून जबाबदारी घेण्याचे का टाळले आहे, असा प्रश्न निर्माण होतो. त्यातही पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्ये या जमातीवर केंद्राने खर्च केल्याचे दिसते, पण पुढे हा तुटपुंजा खर्चही गेला. सेटलमेंटच्या ग्रॅन्ट ही गेल्या आणि हा समाज पुन्हा भीक मागण्यासाठी, चोऱ्या करण्यासाठी मुक्त झाला म्हणून तो विशेष मुक्त "विमुक्त" झाला असेच दिसते.

१९६० साली सोलापूर येथे तारा तोडण्याचा फार मोठा समारंभ झाला. या समारंभाला देशातील गुन्हेगार जमातीतील लक्षावधी लोक हजर होते. या लोकांच्या समोर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यांच्या तारा तोडल्या आणि यांना मुक्त केले. या समारंभाला जवाहरलालजी अध्यक्ष होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण, तपासे साहेब आणि या समारंभाला हजर असलेले कितीतरी लोक आजही हयात आहेत. या समारंभात जवाहरलालजी म्हणाले, "जन्माने माणूस गुन्हेगार असतो ही कल्पनाच मुळी जंगली पणाची आहे. परंतु गेली १०० वर्षे आपण हा काळा कायदा सोसला. देश स्वतंत्र झाला, आता आपण सारे मुक्त झालो. पण तुम्ही दुहेरी जाचातून मुक्त झालात. म्हणून आपण आता विशेष विमुक्त आहात. या कायद्याने गुन्हेगार ठरवलेल्या १९८ जमातीचे लोक आता मुक्त आहेत. आपण मुक्त झालात, आपल्या तारांच्या बेड्या तुटल्या, आणि त्या माझ्या पायात पडल्या आहेत. आपलं पुर्नवसन करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी मी स्विकारतो आहे."

भारताच्या पहिल्या पंतप्रधानांचे नातू आज पंतप्रधान आहेत, आणि या गुन्हेगार जमातीतील नातवंडे ही आज

भीक मागत पोटासाठी, अन्नासाठी, चोर बनून जगत आहेत. त्यांच्या पिढ्या तुरुंगात जन्मत आहेत आणि लाठी-गोळी खावून मरत आहेत. हे कटू असले तरी सत्य नव्हे काय? या देशाने, इथल्या लोकांनी यांना कधी आपलं मानलं नाही, ही खरी शोकांतिका आहे.

बरं किडा मुंग्या सारखी चिरडून टाकली म्हणायला ही काही थोडी थोडकी नाहीत. देशात यांची संख्या कोटीत मोजावी लागेल. वस्तुतः राज्य घटनेतील ४६ व्या कलमानुसार अनुसूचित जाती जमातींचे, आणि समाजातील इतर दुर्बल व मागास समाज घटकांचे, सर्व प्रकारच्या शोषणापासून व सामाजिक अन्यायापासून रक्षण करण्याची तसेच त्यांच्या आर्थिक व शैक्षणिक हितसंबंधाची विशेष काळजी घेऊन जोपासना करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. घटनेतील हे एक मार्गदर्शक तत्त्व आहे. या तत्त्वाला अनुसरून अनुसूचित जाती-जमाती व्यतिरिक्त परंतु त्यांच्याहूनही निकृष्ठ समाज घटक म्हणून भटक्या विमुक्त जमातींचा स्पष्ट उल्लेख वरील कलम ४६ च्या प्रथम भागातच केलेला आहे तरीपण भटक्या विमुक्तांना आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात काही किमान सवलती मिळण्याबाबत घटनांतर्गत संरक्षण मात्र देण्यात आलेले नाही. यानंतर अनेकदा घटना दुरुस्त्या झाल्या. परंतु या जमातींना मात्र न्याय मिळाला नाही. एकदा बनलेल्या परिशिष्टातील याद्या पोलादी चौकटी ठोकून बंद करण्यात आल्या आणि आज जे याद्यात समाविष्ट नाहीत ते आदिवासीपेक्षा निकृष्ठ असूनही, अनुसुचित जातीपेक्षा निकृष्ठ असूनही या याद्यांना वंचित आहेत. १९३१ साली सेन्सस कमिशनर ऑफ इंडिया यांनी पददलित वर्गाचे ( Depressed classes ) वर्गीकरण करण्यासाठी खालील प्रमाणे स्पष्ट आदेश दिलेला होता. "मी हे स्पष्ट करू इच्छितो की पददलित वर्ग म्हणजे असा समाज की ज्याच्या स्पर्शामुळे उच्चवर्णीय हिंदूना स्वतःचे शुद्धीकरण करून घेणे भाग पडते. एका विशिष्ट व्यवसायावरून तो पददलित वर्ग समजला जावा असा माझा कल नाही. परंतु परंपरागत रूढीमुळे हिंदू धर्मात निर्माण झालेल्या त्यांच्या स्थानावरून ज्यांना मंदीर प्रवेश, शाळा प्रवेश, गृह प्रवेश, विहीर प्रवेश इ. गोष्टी निषिद्ध आहेत किंवा अशा प्रकारची सामाजिक दुर्बलतेची इतर दुःख ज्यांना भोगावी लागतात. त्यांचे वर्गीकरण पददलित वर्गात करण्यात यावे."

वरील आदेशाप्रमाणे १९३१ साली वर्गीकरण होऊन पददलित वर्गाच्या जाती पोटजातींची यादी तयार झाली. पुढे "भारत सरकार कायदा १९३५" ला अनुसरून "भारत सरकार अनुसूचित आदेश १३६ प्रमाणे अनुसूचित जातींची यादी तयार करण्यात आली. ही यादी म्हणजे दुसरे काही नसून १९३१ सालची पददलित वर्गाची यादीच होय. यांच्या पुढे १९५० मध्ये अनुसूचित जातींची यादी पुन्हा एकदा नव्याने तयार करण्यात आली. ही यादी म्हणजे १९३६ सालच्या यादीची सुधारित नवीन यादी होय. १९६५ मध्ये नेमलेल्या "लोकुर समिती" ने पुन्हा एकदा अनुसूचित जातींची यादी निश्चित केली परंतु हे करताना १९३१ सालच्या पददलित वर्गाच्या यादीचा व १९५० सालच्या सुधारित यादीचा आधार घेतला आहे. मागास-वर्गीयांच्या बाबतीत नेमलेल्या बॅकवर्ड क्लास कमिशनने प्रस्तुत केलेल्या प्रश्नावलीच्या प्रस्तावनेत कमिशनने म्हटले आहे की.

"अस्पृश्यता हाच अनुसूचित जातींचा निकष आहे. हे अगदीच स्पष्ट आहे. ही अस्पृश्यता केवळ हिंदूधर्मात असल्यामुळे ज्या हिंदूजाती अस्पृश्य समजल्या जातात त्यांचीच गणना अनुसूचित जाती मध्ये करण्यात आली आहे. हिंदूधर्माशिवाय इतर कोणत्याही जातीधर्माला अनुसूचित जातीत समाविष्ट करणे शक्य नाही.

राज्य घटनेतील कलम ३४१ मधील परिछेद क्र. ३ खालील प्रमाणे आहे. "हिंदू व शिख धर्माला सोडून इतर कोणत्याही धर्मातील इसमास अनुसूचित जातीचा आहे असे समजले जाणार नाही."

अनुसूचित जातींच्या यादीचा विस्ताराने विचार केला कारण या अनुसूचित जातींच्या यादीमध्ये शीख व हिंदू-शिवाय कुणीही अस्पृश्य नाही असे समजण्यात आले आहे. आणि अस्पृश्यता हाच निकष लावला आहे. या निकषाचा विचार केला तर कैकाडी, माकडवाले, सापगारुडी दरवेशी, शिकलगार, गोंधळी, भोपे, आराधी, कंजारभट, लमान बंजारा या जमातींना स्पर्श बंदी नाही असे कोण म्हणेल? हे गावातच आले नाहीत, आले तरी हगणदारीतच राहीले. झाडावर पक्षी बसतो, व उडून जातो. त्याची दखल कोण घेतो! पाण्याला वाटसरू शिवला तर पाणवठा विटाळत नाही. पण त्याने त्याची जात जाहिर करून पाणी प्याला तर पाणवठा बाटतो मी स्वतः गाढवं राखली आहेत, डुकरांची लीद गोळा केली आहे. कोण शिवून घेत होतं आम्हाला? केवळ पाण्याच्या पिपाला स्पर्श झाला तर माझ्या समक्ष माझ्या स्पर्शाने बाटलेला, भरलेला पिप ओतण्यात आला आणि त्यासाठी मारही खावा लागला.

ग्रामीण भागात आजही डुकरं खाणारांना कोण शिवून घेतो. मग जर आम्ही अस्पृश्य आहोत, आमचाही विटाळ होतो, तर आम्ही अस्पृश्य नाही कसे? अस्पृश्यांना निदान पाणवठा वेगळा असेल, पण आहे. मसणवाटा वेगळा असेल, पण आहे. हाडकी, हाडोळा आहे. तराळकी, यस्करकी आहे. गावकुसाबाहेरच दुःखी जीवन आहे. पण गावकुसाबाहेर तरी जागा आहे, परंतु ज्यांच्या पिढ्या हागंदारीत नाही तर तुरुंगात वाढतात ते अस्पृश्यांहूनही हीन–दीन नाहीत काय? या जमातींना घटनेचे संरक्षण का नाही? वस्तुतः घटनेच्या सरनाम्यात (१) समाजातील दुबळ्या गटांची आर्थिक, शैक्षणिक उन्नती साधण्यासाठी विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या उन्नतीसाठी व त्यांचे सामाजिक अन्याय, अत्याचारांपासून संरक्षण करण्यासाठी राज्य शासनाने विशेष काळजी घेतली पाहिजे, असा आदेश घटनेतील कलम ४६ प्रमाणे देण्यात आलेला आहे. २) सामाजिक, शैक्षणिक, दृष्ट्या मागासलेल्या जनतेची आणि अनुसूचित जाती जमातींची जलद प्रगती साधण्याच्या हेतूने घटनेतील कलम १५ (४ प्रमाणे खास तरतुद करण्याचे अधिकार राज्य शासनास देण्यात आले आहेत. (३) अनुसूचित जाती जमातींना लोकसभेत विधानसभेत, राखीव जागा मिळण्याची तरतुद कलम ३३० व ३३२ मध्ये करण्यात आली आहे. (४) अनुसूचित जमातींना घटनेने दिलेल्या सवलती, व त्यासंबंधीची प्रत्यक्ष कार्यवाही यावर संशोधन करून अभ्यासपूर्ण अहवाल सादर करण्यासाठी कलम ३३८ प्रमाणे कमिशन नेमण्याची तरतुद आहे अशा विशेष अधिकाऱ्याच्या अहवालावर राज्य विधानसभेच्या खास समितीतर्फे विचार केला जातो. (५) अनुसूचित जाती जमातींच्या कल्याणासाठी दर १० वर्षांनी एक अभ्यास मंडळ नेमण्याचे अधिकार कलम ३३९ (१) प्रमाणे राष्ट्रपतींना देण्यात आले आहेत. (६) अनुसूचित जाती जमातींच्या कल्याणासाठी आवश्यक वाटणाऱ्या योजना आखण्यास व त्या राबविण्यास राज्य शासनाला भाग पाडणारे आदेश देण्याचे अधिकार कलम ३३९ (२) प्रमाणे केंद्र शासनास देण्यात आले आहेत. (७) कलम २७५ (१ मधील शर्तींना अनुसरून राज्यातल्या अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी केंद्रशासनाच्या परवानगीने हाती घेतलेल्या योजना पूर्ण करण्यासाठी केंद्राने राज्यांना अर्थ सहाय्य करणे आवश्यक आहे.

घटनेतील वरील तरतुदींचा विचार केला तर, हे सूर्य प्रकाशाइतके स्पष्ट आहे की, अनुसूचित जाती-जमातीचा शैक्षणिक, आर्थिक, व सामाजिक, मागासलेपणा आणि तो घालवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, या दोन्ही गोष्टी राज्य घटनेस मान्य आहेत. म्हणूनच सर्व बाबतीत अनुसूचित जाती जमातींच्या बरोबरीने मागासलेले असलेल्या, किंबहुना त्यांचेहून मागासलेल्या राहिलेल्या जमातींना समान संधी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने त्यांना ही घटनात्मक सवलती मंजूर करणे कर्तव्य ठरते.

अनुसूचित जमातीशिवाय ज्यांच्या उन्नतीसाठी विशेष काळजी घेतली पाहिजे, असा समाजातला दुसरा मागासलेला अत्यंत दुबळा गट सुद्धा घटनेस मान्य आहे. या मागासवर्गाचा स्पष्ट उल्लेख घटनेतील कलम ४६ च्या प्रथम भागातच केलेला आहे. हे मागासवर्गीय खालीलप्रमाणे नमूद केले आहेत. (१) नवबौद्ध (२) ठराविक भौगोलीक क्षेत्राच्या बाहेर रहाणाऱ्या जमाती ( ३ ) विमुक्त जमाती (४) भटक्या जमाती.

वरील समूहांना मागासवर्गीय म्हणून मान्यता देऊन त्यांच्या उन्नतीसाठी सुद्धा विशेष प्रयत्न केले पाहिजेत, या मार्गदर्शक तत्त्वाचे प्रतिपादन राज्य घटनेने केले असले तरी घटनेतील कलमाचे कायद्याने काटेकोर पालट केल्यास हा मागासवर्गीय समुदाय हक्काने घटनांतर्गत सवलती मिळवण्यास पात्र नाही.

अनुसूचित जातीतील काही लोकांचे वैचारिक परिवर्तन होऊन त्यांनी केवळ धर्म बदलला, तर त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, मागासलेपणात आपोआप काहीच बदल होणार नाही हे विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाने १ मे १९६० पासून अनुसूचित जातींना मंजूर असलेल्या सर्व सवलती नवबौद्धांना, बहुसंख्येने केवळ महाराष्ट्रातच असून ज्यांची लोकसंख्या सुमारे ३५ लाख आहे. जे घटनेप्रमाणेसवलतीस वंचित झालेल्या या गटास अनुसूचित जातींच्या बरोबरीने सर्व सवलती अशा शासनाने दिल्या आहेत. मात्र केंद्र शासनाने तेथेही बोटचेपी भूमिका घेतली असून त्यांनाही केंद्राच्या सवलती मिळत नाहीत.

वरील मागास वर्गीय समुदायातला दुसरा दुबळा गट म्हणजे ठराविक भौगोलिक क्षेत्राच्या बाहेर रहाणाऱ्या जमाती होय. नुकतेच भौगोलिक क्षेत्राचे बंधन उठवून केंद्र शासनातर्फे या जमातींनासुद्धा आदिवासींना असलेल्या सवलती विशेष हक्क मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे आदिवासी व या जमाती यांना हक्क सवलती मिळण्याच्या बाबतीत समान संधी उपलब्ध झाली आहे.

शिल्लक राहिला तो केवळ भटक्या विमुक्त जमातींचा दुबळा गट, ज्याला आजपर्यंत मागास वर्गीयांच्या केंद्रीय यादीत समाविष्ट केलेले नाही किंवा अनुसूचित जाती

जमातीच्या बरोबरीने सवलती व विशेष हक्क देण्यात आलेले नाहीत. अनुसूचित जाती जमातींची यादी तयार करण्याबाबत राज्य घटनेत कोणत्याच तत्वाचा किंवा धोरणाचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. परंतु त्यांना घटनांतर्गत मंजूर असलेल्या सवलतींचा विचार केला तर, त्यांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, मागासलेपणा नष्ट झाला पाहिजे हे एकच धोरण गृहित धरल्याचे स्पष्ट दिसून येते. भटक्या जमाती या सर्वक्षेत्रात अनुसूचित जाती जमातीपेक्षा अत्यंत मागासलेल्या असूनसुद्धा दुर्दैवाने आजपर्यंत त्यांचा केंद्राकडून विचार झालेला नाही.

हरिजन, नवबौद्धांना, गावोगाव वतने आहेत. जमिनी आहेत, याचा वर उल्लेख आला आहेच. गावा बाहेर असली तरी त्यांची एकत्रित वस्ती आहे, त्यामुळे त्यांची संख्यात्मक शक्ती आहे, तिला आपोआपच राजकीय शक्तीचे स्वरूप आले आहे. विमुक्त भटक्यांकडे यातले काहीच नाही.

कसरती व तारेवरचे खेळ करणारे कोल्हाटी, डोंबारी, गोपाळ, नाडीपरिक्षेच्या आधारे रोगाचे निदान करून वनस्पती औषधे देत गावोगाव फिरणारे वैदु, नंदीबैल घेऊन गावोगाव फिरणारे नंदी बैलवाले, डोक्यावर देवीचे देऊळ घेऊन दंडात सुया टोचून व अंगाभोवती आसूडाचे फटके मारुन घेत गावोगाव फिरणारी मरगम्मा जमात, बाहुल्या नाचविणारे, खेळ करणारे ठाकर (बावळेकर), सापाच्या व जादूचा खेळ करीत गावोगांव फिरणारे सापगारुडी, मदारी, चित्ररुपाने कथा सांगुन गावाची करमणूक करणारे चित्रकथी, पोतडीतून पक्षाचा आवाज काढणारे व हातचलाखीचे खेळ करणारे मसनजोगी, शिदगुड् सिद्दे, डोक्यावर मोरपिसांची टोपी घालून "दानपावले" म्हणत भिक्षा मागणारे वासूदेव, पोपटाकडून पत्रिका काढून किंवा हस्तरेषेवरून भविष्य वर्तविणारे जोशी, संभूळ, तुणतुणे गळ्यात अडकवून जगदंबेच्या नावाने गावोगाव भिक्षा मागणारे गोंधळी, कोयते, खुरपे, कुऱ्हाडी तयार करून देत गावोगाव फिरणारे घिसाडी, तलवारी, जंबिया वगैरेंना "म्यान" करून देत किंवा हत्यारांना धार लावून देत गावोगांव फिरणारे शिकलगार, घरोघर फिरून जुन्या कपड्यांची खरेदी करणारे काशीकापडी, झाडावर उंच ठिकाणी बसून पिंगळ पक्ष्याचा आवाज काढून सूर्योदयापूर्वी भिक्षा मागणारे पिंगुळ, डवर (डमरु) वाजवून भिक्षा मागणारे डवरी गोसावी, स्त्रिया मणी, पोत, सूया विकण्यासाठी व पुरुष मंत्र तंत्र करीत गावोगाव फिरणारे नाथजोगी आणि बावा बैरागी, भोई, हळबी, पाथरवट, बेलदार इ. तत्सम जमाती भटक्या जमाती होत. तर माकड, अस्वलांचा खेळ करीत गावोगाव फिरणारे कुंची कोरवा, कोरवा, पापलोर, रानावनातल्या झाडांच्या फांद्या पासून झाडू, टोपली तयार करून ते विकण्यासाठी गावोगांव फिरणारे कैकाडी, दगडाचा पाटा वरवंटा, उखळ वगैरे तयार करून विक्रीसाठी गावोगांव फिरणारे व स्त्रियांना अंगात चोळी न घालण्याची प्रथा असलेला वडार-समाज, रात्रीच्या समयी गस्त घालून ग्राम रक्षणाचे काम करणारे परंतु अस्पृश्य समजून गावाच्या बाहेर किंवा एका बाजूला वस्ती असलेले रामोशी, रानावनात रहाणारे, पूर्वी व्यापार करत असणारे, मिठाच्या गोणी वहाणारे, बंजारे, शिकार करणारे पारधी, बेरड, भामटा, टकारी, उचले, कंजार भाट, वाघरी, बेस्तर, कटबू, सलत वाघरी वगैरे विमुक्त जमातीचे लोक.

आदिवासी डोंगरदऱ्यातून फिरतात तर भटके विमुक्त गावागावातून पोटासाठी भटकतात. दोघांनाही साथ नाही, पदोपदी नेहमीच मानवी उपेक्षेला व अपमानाला सामोरे जावे लागते. नावाप्रमाणेच आश्रयहीन, पोटासाठी दाही दिशा भटकावे लागते. मुलाबाळांना त्यामुळे शिक्षण नाही. रानात जमीन नाही. गावात घर नाही. सन्माननीय व्यवसाय नाही. नुकसान होण्यासाठी स्थावर जंगम मालमत्ता नाही. अशा रितीने कायमचा आपद्ग्रस्त. अशा पिचलेल्या दुबळ्या गटांसाठी युद्ध पातळीवर कल्याणकारी योजना राबविण्याचे दूरच राहिले. निदान यांना घटनांतर्गत सवलती देण्याचा विचार सुद्धा झालेला नाही, ही केवढी शरमेची गोष्ट आहे.

मागासवर्गीयांचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने १९६५ मध्ये नियुक्त केलेल्या लोकुर समितीने भटक्या विमुक्तांवर काही प्रमाणात प्रकाश टाकला आहे. लोकुर समिती आपल्या अहवालाच्या परिच्छेद क्र. २९ मध्ये म्हणते, "गेल्या १५ वर्षांच्या काळात भटक्या विमुक्त जमातींच्या बाबतीत जो विशेष विस्ताराने अभ्यास व्हायला पाहिजे होता तो झालेला नाही असे आम्हास दिसून आलेले आहे. भटक्या विमुक्तांच्या समस्या समजून घेण्यासाठी पुरेशी माहिती व पुरेसा वेळ नसल्यामुळे त्यांच्या यादीवर गुणानुक्रमानुसार आम्ही निर्णय घेण्याच्या अवस्थेत नाही. त्यांना आहे त्याच अवस्थेत ठेवण्यापलिकडे आमच्या जवळ दुसरा पर्याय नाही.

लोकुर समितीने हे मान्य केले आहे की भटक्या विमुक्तांना टोळीने रहाण्यासाठी आणि परंपरागत अस्पृश्यांची (अनुसूचित जातीसाठी आवश्यक असलेले लक्षण) दोन्ही लक्षणे लागू आहेत. याशिवाय भटकी प्रवृत्ती व गुन्हेगारी वृत्ती ही दोन जादा लक्षणे पण त्यांना लागू आहेत. म्हणून

वास्तविक या जमातींचा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींच्या यादीत समावेश करण्याची शिफारस करण्याऐवजी समितीने पुरेसा वेळ व पुरेशी माहिती नसल्याची सबब पुढे करून त्यांना आहे त्या अवस्थेत ठेवण्याचा अहवाल दिला आहे. पुढे केंद्र शासनाने सुद्धा यांचा विचार केलेला नाही. किंवा यांचा विशेष अभ्यास करण्यात आलेला नाही हे भटक्या विमुक्तांकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष आहे, अन्याय आहे.

अनुसूचित जाती व आदिवासींची यादी ठरविताना विधीमंडळ समितीतर्फे खालील निकष निश्चित करण्यात आले होते.

( १ ) सांस्कृतिक वेगळेपणा
( २ ) प्राचिन लक्षणे
( ३ ) भौगोलीक अलगता
( ४ ) बहुजन समाजाशी समरस होण्याबबत असलेला न्यूनगंड
( ५ ) मागासलेपणा

भौगोलिक अलगपणा हा निकष या जमातींना "भूगोल"च नसल्याने वगळला तर वरील सर्व निकष भटक्या विमुक्तांना लागू आहे. त्यांच्यापैकी पुष्कळ जमातींना अस्पृश्यता हा निकषही लागू आहे. या जाती नसून जमाती आहेत. यांचं जातगाव, जातपंचायत, जातधंदा, जातधर्म अगदी आजही काही जमातीत स्त्रियांचा क्रयविक्रय होतो. त्या भाड्याने दिल्या जातात. तर काही जमातीत कमालीची शुद्धता पाळण्यात येते. यांच्या जातपंचायती म्हणजे आदिम मानवाची शासन पद्धती आहे तर त्यांचे सांस्कृतिक कोष, बोली भाषा, सांकेतिक भाषा, भूषा, भोजन सारेच विश्वास न बसण्याएवढे विलक्षण आहे. यातील काही जमाती या आजही शिजलेले अन्न खात नाहीत काही जमातींची लग्नं केवळ अंगावर थुंकून होतात, तर काहींची लग्न दारूची बाटली जमिनीवर ओतून होताना दिसतात. या संदर्भात खूप लिहिता येईल. पण आता निश्चितपणे असे म्हणता येते की, या भटक्या विमुक्त जमाती या आदिम जमातीच आहेत. एवढी लक्षणे सांगता येतील पण लक्षात कोण घेतो ? इथे बळी तो कान पिळी असा जंगलाचा कायदा चालू आहे.

असाच दुसरा घोळ झाला आहे तो या जमातीच्या लोकसंख्या मोजण्याबाबत. यांना कोणत्याही जनगणनेत ग्रहितच धरलेले दिसत नाही. याहीसंबंधी थोडे तपशीलाने पाहू.

१९५३ साली मागासवर्गीयांच्या अभ्यासासाठी नेमलेल्या काकासाहेब कालेलकर आयोगाने आपल्या अहवालात अनुसूचित जातीजमाती व्यतिरिक्त इतर मागासवर्गीयांची यादी देऊन त्यांना सवलती देण्याची शिफारस केली होती. शिवाय या यादीतील काही जमाती अत्यंत मागासलेल्या असून त्यांचेकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले. या अत्यंत मागास जमाती म्हणजे भटक्या विमुक्त जमाती होय. या जमातींची निश्चित लोकसंख्या कळण्यासाठी १९६१ च्या शिरगणतीच्यावेळी लोकसंख्येची जातवार नोंदणी करावी अशीही शिफारस आयोगाने केली. जातवार शिरगणतीची शिफारस केंद्र शासनाने फेटाळली आणि या अहवालास अनुसरून आवश्यक त्या अभ्यासानंतर योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी राज्य शासनावर सोपवून केंद्रशासन मोकळे झाले.

कालेलकर आयोगाने सुचवल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने १९६० मध्ये त्यांची वेगळी यादी तयार केली. हीच भटक्या विमुक्त जमातींची यादी होय. कोणताही शास्त्रीय अभ्यास न करता, तज्ञांचे मार्गदर्शन न घेता शासनाने ही यादी तयार केली आहे. त्यामुळे ती पुरेशी नाही. राजकीय हस्तक्षेप व सोय-गैरसोय पाहून यादी फुगत गेली व पुन्हा ज्यांचेसाठी ती तयार झाली तेच या यादीत अल्पसंख्य झाले व नव्या नव्याने दाखल झालेलेच आज सवलती लुबाडत असताना दिसते.

अनुसूचित जाती जमातींच्या राखीव जागा त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ठेवलेल्या आहेत. म्हणून भटक्या विमुक्त जमातींसाठी राखीव जागेची टक्केवारी निश्चित करताना राज्य शासनास त्यांची लोकसंख्या जाणून घेणे गरजेचे वाटले, किमान पक्षी आधार म्हणून कागदोपत्री काहीतरी दाखवणे आवश्यक वाटले. इतर मागास वर्गांच्या लोकसंख्या निश्चित कळण्यासाठी १९६१च्या शिरगणतीच्या वेळी लोकसंख्येची जातवार नोंदणी करावी अशी कालेलकर आयोगाने केलेली शिफारस केंद्रशासनाने फेटाळल्यामुळे अनुसूचित जाती जमाती प्रमाणे शिरगणतीच्या वेळी भटक्या विमुक्तींची वेगळी नोंद झाली नाही, आजही होत नाही. शिवाय महाराष्ट्र शासनाने ही खास नियम व यंत्रणा निर्माण करून भटक्या विमुक्तांची पहाणी केलेली नाही. मात्र १९६१ साली प्रत्येक जिल्ह्याच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांकडून त्या त्या जिल्ह्यातील भटक्या विमुक्त जातींची अंदाजे लोकसंख्या मागवली. १९६१ साली अंदाजे १३.६३,८९० एवढी दाखवली आहे. ही लोकसंख्या १९६१ सालच्या महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या ४% ( टक्के ) भरते म्हणून भटक्या विमुक्तांना महाराष्ट्र

शासनाने ४% राखीव जागा ठेवल्या आहेत.

आता अशा अशास्त्रीय पद्धतीने, लहरीपणाने अंदाजे ठरवलेल्या लोकसंख्येच्या आधाराने या सवलती चालू आहेत. एका अर्थाने ही शासनाने अधिकृतपणे भटक्या विमुक्त जमातींच्या डोळ्यात धुळफेक केली आहे असे असे म्हटले तर वावगे ठरू नये. या अशास्त्रीय गृहितात चुकाच चूका दिसतात. मोले घातले रडाया नाही आसू नाही माया ! दुसरे काय ? सारा आकड्यांचा मेळ घातलेला दिसतो.

या जमातींची यादी दोन भागात विभागली आहे. पहिला भाग विमुक्त भटक्या जमातींचा व दुसरा भाग तत्सम जमातींचा प्रत्यक्ष पहाणी व अनुभवावरून असे लक्षात येते की सर्वच तत्सम जमाती म्हणजे मुख्य जमातींच्या पोट जमाती नव्हेत. बोलीभाषा व व्यवसायाचे रूप याबाबतीत काहीसे साम्य असले तरी या जमाती एक नव्हेत. त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. त्यांच्या जात पंचायती भिन्न आहेत. उदा. कोल्हाटी, डोंगरी, भराडी, नाथजोगी, कंजारभाट, छारा, भोई-कैवट, गोपाळ खेळकरी, बेलदार-ओड इ.

१९६१ साली शासकीय यादीत नोंद आहे. परंतु ज्यांची लोकसंख्या जमेस धरली गेली नाही. अशा तत्सम जमाती अशा आहेत.

| मुख्य जात | | तत्सम जमाती |
|---|---|---|
| १. बेरड | : | नाईकवडी, तलवार, वाल्मीकी |
| २. बेस्तर | : | संचलू, वड्डार |
| ३. भामटा | : | गिरणीवड्डार, कामाठी, पाथरुट, उचले, टकारी |
| ४. कैकाडी | : | धोंतले, कोरवा, कोरवी, माकडवाले, कोंची कोरवा, पामलोर |
| ५. कंजारभाट | : | छारा-नाट |
| ६. कटबू | : | कटबू |
| ७. बंजारा | : | घाळी, घालीयां, घाडी घारिया |
| ८. फासेपारधी | : | पालपारधी, चित्तापारधी |
| ९. राजपारधी | : | टाकणकार, हरणशिकारी |
| १०. राजपूतभामटा | : | परदेशी, भामटा, भामटी |
| ११. रामोशी | : | नाईक |
| १२. वडार | : | पाथरवट |

**भटक्या जमाती**

| मुख्य जमात | | तत्सम जमात. |
|---|---|---|
| १. बावा | — | बैरागी. |
| २. बेलदार | — | ओड. |
| ३. भराडी | — | बाळसंतोषी, किंगरीवाले, नाथबागा, नाथजोगी, नाथपंथी डबरीगोसावी. |
| ४. भूते | — | भोपे. |
| ५. चलवादी | — | — |
| ६. चित्रकथी | — | — |
| ७. गारूडी | — | — |
| ८. घिसाडी | — | — |
| ९. गोल्ला | — | — |
| १०. गोंधळी | — | — |
| ११. गोपाळ | — | — |
| १२. हेळवे | — | — |
| १३. जोशी | — | बुडबुडके, कुडमुडे, डमरूवाले, मेघांगी, सरोदे. |
| १४. काशीकापडी | — | — |
| १५. कोल्हाटी | — | डोंबारी. |
| १६. भैराळ | — | दांगट, वीर. |
| १७. मसणजोगी | — | सिद्गुड, सिंद्द |
| १८. नंदीवाले | — | तिरमल, मेंढगे. |
| १९. पांगुळ | — | — |
| २०. रावळ | — | — |
| २१. शिकलगार | — | कटारी. |
| २२. ठाकार | — | — |
| २३. वैदू | — | — |
| २४. वासुदेव | — | — |

वरील सर्व तत्सम जमातींची लोकसंख्याच शासनाने जमेस धरलेली नाही. खरेतर ती जमेस धरली पाहिजे.

१९६१ नंतर आजपर्यंत वेळोवेळी अनेक नवीन जमातींचा भटक्या विमुक्तांच्या शासकीय यादीत समावेश केला गेला आहे. परंतु त्यांची लोकसंख्या जमेस धरलेली नाही. १९६१ नंतर आजपर्यंत वेळोवेळी भटक्या विमुक्तांच्या शासकीय यादीत समाविष्ट केलेल्या मुख्य व तत्सम जमाती पुढीलप्रमाणे —

**विमुक्त जमाती —**

| | | |
|---|---|---|
| १. बंजारा | : | १८-८-७७ पासून |
| २. सलाटसलट वाघरी | : | मार्च ७७ नंतर |
| ३. छप्परबंद | : | २०-२-७८ पासून |

**भटक्या जमाती —**

१. भारती, गिरी, सरस्वती,
पर्वत सागर, बन, थेती, आश्रम,

अरुय, घरभारी, संन्यासी,
नाथपंथी गोसावी ... १३-२-७८ पासून

२. गाडी लोहार, चितोडी
लोहार, राजपूत लोहार ... १४-८-७० पासून

३. गोल्लेवार, गोल्लेर
गोलकर ... १२-७-७९ पासून

४. गोपाळ भोरपी,
खेळकरी ... १३-८-६५ पासून

५. हेळवी ... मार्च ७७ नंतर

६. सखदे, सरोदा सहदेव
जोशी ... मार्च ७७ नंतर

७. रावळ जोशी ... २९-५-६६ पासून

८. भोई कहार, किरात, मछुआ, मांझी
जानिया, केवट, धिवर, मल्हार
पाळेवार, मल्हाव, ढेवरी
... २४-१०-७४ पासून

९. बहुरूपी ... मार्च ७७ नंतर

१०. टेलारी ... मार्च ७७ नंतर

११. ओतारी, ओझारी,
ओतकर, ओतनकर, ... १३-१२-७७ पासून

भटक्या विमुक्तांच्या मुळ ४% राखीव जागांमध्ये वरीलप्रमाणे भरमसाठ नवीन जमाती कोंबण्याचे काम शासनाने केले आहे, या नवीन जमातीपैकी केवळ 'भोई' या एका जातीची लोकसंख्या ६ लाखापेक्षा जास्त आहे. धुळे, जळगाव, बुलढाणा, अकोला या केवळ चार जिल्ह्यातील ठेलारी जमातीची लोकसंख्या १ लाखाच्या आसपास आहे. वरील सर्व जमातींची लोकसंख्या लक्षात न घेता त्या सर्वांना ४% राखीव जागांमध्ये कोंबून ठेवले आहे.

लोकसंख्येच्या १९६१ चा जो मूळ अंदाज आहे तो सुद्धा त्या त्या जमातींच्या वास्तव लोकसंख्येशी फारच विसंगत आहे. उदा. आपण समाजकल्याण अधिकाऱ्याने दिलेली आकडेवारी पाहू.

**विमुक्त जमाती**

| | | |
|---|---|---|
| १. | बेरड | ०२२,२०० |
| २. | बेस्तर | ००१,५९५ |
| ३. | भामटा | ०१३,९९० |
| ४. | कैकाडी | ०४८,८८० |
| ५. | कंजारभाट | ००६,९०० |
| ६. | कटबू | ००१,२०० |
| ७. | बंजारा | ४,७७,९०० |
| ८. | फासेपारधी | ०,३३,६०० |
| ९. | राजपारधी | ०,७१,३०० |
| १०. | राजपूत भामटा | ०,०६,३०० |
| ११. | रामोशी | १,०५,१०० |
| १२. | वडार | २,१८,०४० |
| १३. | वाघरी | ०,०६,३०० |
| | | १०,१३,१८५ |

**भटक्या जमाती**

| | | |
|---|---|---|
| १. | बावा | ०,१८,७०० |
| २. | बेलदार | ०,२७,७५० |
| ३. | भराडी | ०,३९,२५० |
| ४. | भूते | ०,०१,२८० |
| ५. | चलवादी | ०,०८,७०० |
| ६. | चित्रकथी | ०,०६,६०० |
| ७. | गारुडी | ०,०२,१०० |
| ८. | घिसाडी | ०,३०,४०० |
| ९. | गोल्ला | ०,०२,४०० |
| १०. | गोंधळी | ०,२५,४५० |
| ११. | गोपाळ | ०,२२,२०० |
| १२. | हेळवे | ०,०२,०४० |
| १३. | जोशी | ०,४०,१३० |
| १४. | काशीकापडी | ०,०९,६५० |
| १५. | कोल्हाटी | ०,२५,८३० |
| १६. | मैराळ | ०,०१,१०० |
| १७ | मसणजोगी | ०,०२,०४० |
| १८. | नंदीवाले | ०,०९,६०० |
| १९. | पांगुळ | ०,११,३५० |
| २०. | रावळ | ०,०३,३५० |
| २१. | शिकलगार | ०,०६,३६५ |
| २२. | ठाकर | ०,०४,०४० |
| २३. | वैदू | ०,३२,६०० |
| २४. | वासुदेव | ०,०७,६०० |
| | एकूण– | ३,५०,७०५ |

वरील यादी पाहिली की लक्षात येते की, बहुतांश जमातींची लोकसंख्या पूर्ण हजारात किंवा पूर्ण शतकात आहे. काहींची पूर्ण दशकात आहे. केवळ २ जमातींची लोकसंख्या ५ या अंकाने संपते. हे पाहिल्यावर हे आकडे गावोगाव फिरून मिळवलेले नसून ते ऑफिसमध्ये टेबलावर बसून लिहिलेले आहेत. हे आकडे वस्तुस्थितीशी विसंगत आहेत उदा. भटक्या जमातींच्या यादीत क्रमांक १६ ला मुख्य जमात मैराळ व तत्सम जमाती, दांगट वीर दाखवल्या आहेत. तक्त्यात मैराळ जमातींची लोकसंख्या १,१००/– दाखवली आहे. दांगट व वीर जमातीची ही लोकसंख्या नाही. दांगटांची केवळ हडपसरच्या एकाच वस्तीत भरेल. उरलेल्या महाराष्ट्रातील वीर, दांगट, मैराळ, समाज यादीत कुठाय? उलट या जमाती भटक्या असल्याने यांची मत-

दार याद्यात नोंद नाही. असलीच तर ती स्थायिक असलेल्या जमातीतीलच ( त्यावेळी ) माणसांची असते. आजही हा समाज मतदानापासून वंचीत आहे. आम्हाला बेरजेत न धरताच लोकशाहीचा महान प्रयोग चालू आहे. तर जन-गणनेत कुठून असणार ?

विमुक्त जमातींच्या यादीत क्रमांक ४ चे वर कैकाडी मुख्य जमात असून तिची लोकसंख्या ४८,८८० दिलेली आहे. तत्मम जमातीत धोंतले, कोरवा, माकडवाला, पामलोर वगैरे जमाती आहेत. एकाधारावी, अंधेरी, कुर्ला, पुणे, हडपसर येथील माकडवाला या एकांच उपजमातीची लोकसंख्या ५०,००० हून जास्त असेल. धारावीतच ती १० ते १२ हजार आहे तर महाराष्ट्रातला अंदाजच न केलेला बरा. माकडवाला व कैकाडी या एकच जमाती असल्यातरी त्यांच्यात बेटी व्यवहार नाही.

याशिवाय अनेक भटक्या विमुक्त जमातींचा समावेशच या यादीत नाही, मदारी, मरगम्मा बागडी, गोवारी, गाढवी सोनार अशा अनेक जमाती आहेत. ज्यांच्या लोकसंख्येचा विचार करण्याचे कारणच नाही.

अशा अशास्त्रीय पद्धतीने यांची जनगनणा झाल्याने यांच्या ४ % जागा हाही एक विनोदच आहे. बरं, यात काही भटक्या नसलेल्याही जमाती आहेत. पेशवे ज्यांना गुरु मानत ती दशनाम गोसावी मंडळीही यादीत आहेत आणि आश्चर्य असे की आज शासकीय नोकरीत आकडे-वारी काढली तर याच मंडळीनी सवलती खशात घातल्याचे दिसेल. साराच जुलमाचा रामराम आहे. मग बेकायदेशीर केवळ नामसादश्याचा फायदा घेऊन या सवलती लुबाड-णारी मंडळी वेगळीच. विशेषतः रजपूत, भामटा, कुडमुडे, जोशी या जमातींचा खूपच गैरवापर झाला आहे.

या जमातीच्या व्यथा वेदनेला वाचा फोडण्याचे प्रयत्न गेली १५ वर्षे चालू आहेत. गेल्या दहा बारा वर्षात या प्रश्नासंबंधी या जमातीत जागृति होऊ लागली आहे. आणि गेली तीन-चार वर्षे तर महाराष्ट्रात दलित म्हणजे नुसते महार मांग आदिवासी नाहीत तर भटके विमुक्त आठरापगड जाती जमाती अशी व्याख्या होऊ लागली आहे. दखल घेण्याएवढी चळवळ आज भटक्या विमुक्त जमातींनी केली आहे. अन्यायाविरुद्ध आवाज ऊठू लागला आहे. परिषदा, मेळावे, मोर्चे, धरणे अशा विविध मार्गाने ते आपले म्हणने मांडू लागले आहेत. काही लेखकही या जमातींमधून लिहीत आहेत, बोलत आहेत. विशेषतः ब्रिटीश ऑफीसर जे. व्ही. स्टीफनसन्, गावगाडाकार अत्रे या स्वातंत्र्यपूर्व काळातील लेखकां-प्रमाणेच डॉ. बाबा आढाव, अण्णाभाऊ साठे, डा. प्रभाकर मांडे, शंकरराव खरात, मालतीबाई बेडेकर, डॉ. अनिल अवचट, व्यंकटेश माडगुळकर, प्रा. मोतीराज राठोड, बाळकृष्ण रेणके, विलास वाडेकर, यासारख्या साहित्यिक, पत्रकार, विचारवंत मंडळींनी आवर्जुन लिहीले आहे. काहींनी वैचारिक, काहींनी साहित्यिक स्वरुपात लेखन केले आहे. त्यामुळे समाज प्रबोधनाच्या चळवळीची दिशाही बदलते आहे. मध्यमवर्गीय समाजाची मोठी सहानुभूती यांच्या पाठीमागे क्रियाशीलपणे उभी रहाते आहे. या मंडळींना न्याय देण्यासंबंधी मतभेद कुठेच दिसत नाहीत परंतु प्रत्यक्षात काहीच होताना दिसत नाही. त्यामुळे भटक्या विमुक्तांच्या प्रश्नाचा वेगवेगळा विचार करून त्याचे प्रश्न ते सोडवतील असे म्हणून सुज्ञांनी दुर्लक्ष करून उपयोग नाही. या प्रश्नाच्या पाठीमागे न्याय, नीती, विवेक, यांची शक्ती लावावी लागेल आणि त्यांच्या चळवळीही संघटित कराव्या लागतील. समाजातील मान्यता प्राप्त असलेल्या तज्ञ व्यक्तींनी आपले नैतिक सामर्थ्य या उपेक्षितांमागे उभे केले पाहिजे.

**संदर्भ-ग्रंथ**


१. "नोटस् ऑन क्रिमीनल केसेस इन द बॉम्बे प्रेसिडन्सी – एम केनेडी ( डी आय. जी. रेल्वे ॲन्ड क्रिमीनल इनव्हेस्टीगेशन–बॉम्बे प्रेसिडन्सी )
२. क्रिमीनड ट्राईब्ज ॲक्ट – १९२४
३. गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे रिपोर्ट ऑफ दि एक्स क्रिमीनल ट्राईब्ज रिहॅबिलीटेशन कमिटी रिपोर्ट ( अंत्रोलीकर रिपोर्ट – १९५१ )
४. O. H. B. स्टार्ट कमिटी रिपोर्ट – १९३०
५. रिलीफ ऑफ दि क्रिमीनल ट्राईब्ज ॲक्ट १९४७
६. डिनोटीफाईड ट्राईब्ज ॲक्ट – १९५६, १९६१
७. गोरबंजारे लोकांचा इतिहास – १९३६
लेखक – बळीराम हिरामण पाटील.
८. बंजारा लोकांचा इतिहास – लेखक – आव्हाड.
९. भटक्या विमुक्तांचा एल्गार येत आहे – बाळकृष्ण रेणके.
१०. गावगाड्या बाहेरील – प्रा. प्रभाकर मांडे.
११. "उत्क्रांती" ऑगस्ट – १९७७.
"नवबौद्ध घटनात्मक संरक्षण आणि विमुक्त भटका समाज" – बाळकृष्ण रेणके
१२. विश्वकोश खंड ४.


( दि. २ व ३ मार्च १९८६ रोजी झालेल्या 'भटक्या–विमुक्त जमाती' चर्चासत्रासाठी सादर केलेले टिपण )

# " भटकू नका, तुम्हाला कोण भटकायला सांगतं ? "

तारेवरची कसरत करीत, जीवाशी खेळ करून लोकांनी दिलेल्या पैशावर आपले पोट भरणारे डोंबारी काय किंवा ऋतुमानाप्रमाणे ह्या गावाहून त्या गावाला आपली मेंढरे घेऊन जाणारे मेंढपाळ काय, आजपर्यंत हे सगळे भटके, पांढरपेशा समाजाच्या मनामध्ये तिरस्कृत होऊनच राहिले आहेत. त्यांना ह्या समाजात स्थानच नाही. राज्यसरकार आणि केंद्रसरकार ह्यांनीही ह्या भटक्यांकडे व त्यांच्या प्रश्नांकडे आपुलकीने किंवा जिव्हाळ्याने पाहिले नाही. उलट राज्यसरकार आणि केंद्र-सरकारनी त्यांच्या बाबतीत बेपर्वाईच दाखविली.

भटक्या विमुक्त जमातींचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने गेल्या पंधरावर्षांत झालेले प्रयत्न, राज्यकर्त्यांशी आलेले संपर्क, त्यातून आलेले अनुभव आणि राज्यकर्त्यांनी दाखविलेली भटक्यां-विषयीची बेपर्वाई बाळकृष्ण रेणके ह्यांनी समर्पकपणे मांडली आहे.

— बाळकृष्ण रेणके

१. ९ जानेवारी १९७२ च्या राज्यस्तरावर झालेल्या भटक्या विमुक्तांच्या पहिल्या परिषदेचा समारोप करताना राज्याचे मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक म्हणाले, " जागृती व संघटन कार्याच्या दृष्टीने आतापर्यंत महाराष्ट्रात दुर्लक्षित व उपेक्षित राहिलेल्या समाज घटकास आपण हात घातला आहे. या अस्थिर समाज घटकाचा विस्कळीतपणा व स्वतःच्या हिताची जाणिव नसलेला अजाणतेपणा लक्षात घेता यांना संघटित करण्याचे कार्य जेवढे कौतुकास्पद व आवश्यक आहे तेवढेच कठिणही आहे. "

आणि या कार्याला प्रोत्साहन मिळावे म्हणूनच ४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत विधानसभेवर भटक्या विमुक्तांचा मोर्चा काढला असताना शासनाचे सर्व संकेत बाजूस सारून मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक स्वतः रस्त्यावर मोर्चास सामोरे आले होते.

२. दि. २ नोव्हेंबर १९७२ रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या उपस्थितीत पंतप्रधान इंदिरा गांधींना भटक्याच्या शिष्टमंडळाद्वारे निवेदन देण्यात आले. दहा मिनिटेपर्यंत शांतपणे आमचे म्हणणे ऐकून त्या म्हणाल्या " मैं जरुर कोशिश करूंगी. "

३. त्या सालच्या लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनात या विषयावर चर्चा होणार आहे असे कळल्यावरून डिसेंबर १९७२ मध्ये भटक्यांच्या शिष्टमंडळाने दुसऱ्यांदा पंतप्रधान इंदिरा गांधींची भेट घेतली व होऊ घातलेल्या चर्चेच्या अनुषंगाने मुद्दे सुचविणारे निवेदन दिले. त्या म्हणाल्या, " येस, यू आर इन टाईम. "

४. १९७५ मध्ये मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या उपस्थितीत भटक्यांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान इंदिरा गांधींची तिसऱ्यांदा भेट घेतली आणि त्यांच्या मागणीची आठवण करून देणारे निवेदन दिले. त्या म्हणाल्या, " मैंने कोशिश तो कि, लेकिन आपकी मांग को बाबूजी का विरोध हैं, इसलिये नतिजा निकल नहीं पाया, कुछ रास्ता ढुंढेंगे."

५. दिनांक ७ ऑक्टोबर १९७७ रोजी दिल्ली येथे पंतप्रधान मोरारजी देसाई यांना प्रत्यक्ष भेटून आमच्या शिष्टमंडळातर्फे त्यांना निवेदन देण्यांत आले. या भेटीत पंतप्रधान मोरारजी व आमचा खालीलप्रमाणे संवाद झाला.

— " भटक्या विमुक्त जमातींना अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ट करा किंवा त्यांची तिसरी सूची तयार करून त्यांना केंद्रसरकारच्या सवलती द्या, अशी आमची फार दिवसाची मागणी आहे. इंदिरा गांधींनी प्रयत्न करू असे आम्हाला आश्वासन दिले होते. " मी

— " हे शक्य नाही. " ... पंतप्रधान मोरारजीभाई देसाई.

— " असे झाले तर त्यांचा हक्क नाकारल्यासारखे होईल त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्यात आले नाही तर अज्ञान, दारिद्र्य आणि विशेषतः त्यांच्या रूढी व भटक्या प्रवृत्तीमुळे आहे त्या परिस्थितीत त्यांची सुधारणा होणे कठिण आहे. " ... मी

— " भटकू नका. तुम्हाला कोण भटकायला सांगतं ? " पंतप्रधान मोरारजीभाई देसाई

— " तुमच्या बापानं आधीच भटकायला सांगितलं आहे. "

— आता मी भटकु नका म्हणून सांगतो ... पंतप्रधान मोरारजीभाई देसाई.

— " केवळ सांगून उपयोग होणार नाही कारण त्यांची अवस्था दोरा तुटलेल्या पतंगासारखी आहे." ...मी

— " दोरा तुटलेल्या पतंगामागे धावणे व्यर्थ आहे. " ... पंतप्रधान मोरारजीभाई देसाई.

— " त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्यात आले नाही तर त्यांच्यावर अन्याय होणार आहे. " ... मी.

— " तसे तुम्हाला वाटते. " ... पंतप्रधान

६. दिनांक ८ ऑक्टोबर १९७७ रोजी दिल्ली येथे विरोधी पक्ष नेते यशवंतरावजी चव्हाण यांना भेटून आम्ही चर्चा केली व त्यांनाही निवेदन दिले. त्यांनी निवेदन वाचले. निवांतपणे आमचे ऐकून घेतले. आणि म्हणाले– " भटक्या विमुक्त जमाती हा " स्टेट सब्जेक्ट " केला गेला आहे. तो केंद्रसरकारचा विषय बनण्यासाठी प्रयत्न केला पाहिजेल आहे. "

७. आतापर्यंत पंतप्रधानांना देण्यात आलेले निवेदने पुढील विचारार्थ भारत सरकारच्या " अनुसूचित जाती-जमाती पार्लमेंटरी कमिटी, नवी दिल्ली " यांच्याकडे पाठविण्यात आली आहेत असे कळल्यावरून दिनांक २४ सप्टेंबर १९७८ रोजी आम्ही या अनुसूचित जाती-जमाती पार्लमेंटरी कमिटीचे अध्यक्ष श्री. रामधन यांना भेटून चर्चा केली व निवेदन दिले. ते म्हणाले " " येस आय विल लुक इन टू दि मॅटर डीपली. "

त्यानंतर आजपर्यंत या बाबतीत केंद्रसरकार कडून काहीच निर्णय घेण्यात आलेले नाहीत.

८. दिनांक १२, १३ फेब्रुवारी १९८३ रोजी औरंगाबाद येथे भटक्या विमुक्तांची राज्य स्तरावरची अत्याचार निर्मूलन परिषद आम्ही घेतली होती. या परिषदेचे उद्घाटन करताना महाराष्ट्रातील एक आघाडीचे राजकारणी व विरोधी पक्ष नेते शरद पवार म्हणाले, " या समाज घटकाच्या एवढ्या गंभीर समस्या असताना त्यांच्याकडे स्वराज्यात एवढे दुर्लक्ष झाले आहे कि देशातल्या प्रस्थापित समाज घटकाचा प्रतिनिधी म्हणून या परिषदेत बोलताना मी स्वतः आरोपीच्या पिंजऱ्यात उभा आहे असे वाटते. "

९. दिनांक ९ ऑक्टोबर १९८४ रोजी पुण्यात " भटक्या विमुक्तांचे प्रश्न आणि लक्ष्मण माने यांचे " बंद दरवाजा " पुस्तक यावर आयोजित केलेल्या चर्चासत्राच्या अध्यक्ष पदावरून बोलताना महाराष्ट्राचे थोर नेते कै. यशवंतरावजी चव्हाण म्हणाले, " पंडित जवाहरलाल नेहरू १९५९ साली सोलापूर येथे उद्घाटन केलेल्या विमुक्त जमातींच्या मेळाव्याचा मी अध्यक्ष व महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो. सेटलमेंट तुरुंगाच्या तारा तोडून जमातींना विशेष मुक्त केलेल्या घटनेचा मी साक्षीदार आहे. परंतु तारा तोडून मुक्त झालेले हे लोक जाणार कोठे, हा प्रश्नच त्यावेळी डोक्यात घुसला नाही. या जमातींची कटी पतंगासारखी अवस्था झाली आहे हे लक्षातच आले नाही. एवढेच नव्हे तर ४० वर्षे सत्तेत असताना या समाज घटकांचे प्रश्न समजू शकलो नाही याबद्दल मी स्वतः अपराधी आहे. "



# महाराष्ट्रातलि भटक्या विमुक्त जमातींचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये का ?

**प्रा. मोतीराज राठोड**

एम फील / जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, औरंगाबाद

भटका (Nomad) शब्दाची परिभाषा तशी आपल्याकडे कोणी केली नाही. माणसाची टोळी करून भटकत जीवन जगण्याचा इतिहास जगात सगळीकडे होता. ग्रीक भाषेतील Nemo शब्दापासून Nomad शब्द प्रचलीत झाला. Nemo शब्दाचा अर्थ to pasture म्हणजे चारणे असा होतो. ग्रीक देशामध्ये काही टोळ्या गुरे जनावरे पाळीत आणि गुरांना चारा मिळेल त्या ठिकाणी ते भटकत जात. Nomad and Nomadism च्या संदर्भात The Royal Anthropologi al Institute of Great Britain या संस्थेने Nomadic people (भटके लोक) या संज्ञेचा अर्थ पुढीलप्रमाणे लावला आहे. "Those dependent principally on hunting or collecting for their supplies, having no parmanent abode."

भारतामध्ये प्राचीन काळापासून काही जमाती भटकत होत्या. त्यांच्याकडे फारसे कोणाचे लक्ष गेले नाही. एका ठिकाणी स्थिर न झाल्यामुळे स्थिर संस्कृतीचे फायदे या जमातींना घेता आले नाहीत.बदलत्या काळानुसार या जमाती बदलल्या नाहीत. पुढे एका ठिकाणी पोट भरेल असे स्थिर स्वरूपाचे साधन नसल्यामुळे भटकणे ही यांची सवय पुढे यांची संस्कृती झाली, धर्म झाली. त्यांची मानसिकता तयार झाली. इतर स्थिर समाजापासून तो फटकून वागू लागला. त्यामुळे भविष्यातील जीवनासंबंधी विचार करण्याचा अभाव त्याच्यामध्ये निर्माण झाला. इतर समाज स्थिर होऊन आधुनिक जीवन जगण्यासाठी प्रयत्न करू लागला तेव्हा या जमाती एका ठिकाणी झोपडे बांधणे इतकेच काय पण स्वयंपाक करण्यासाठी चुल सुद्धा करू नये, तीन दगडावरच स्वयंपाक करावा, जाते जमिनीवर गाडू नये, विहीरीचे पाणी पिऊ नये तर वाहतेच पाणी प्यावे अशी या जमातीची आपली वेगळी संस्कृती झाली. अन्न, वस्त्र, निवारा एका ठिकाणी यांना कधी मिळाळाच नाही. आपण भले, आपली जनावरे भली, आपला टोळी तांडा भला ! त्यामुळे हा समाज अज्ञान, अंधश्रद्धा, जादूटोणा जातपंचायत रितीरिवाज, दैववादामध्ये बुडाला.

बदलत्या प्रगतीपासून भटका समाज कोसा गणती दूर होता. हजारो वर्षापासून रानटी आदिम व्यसनी जीवन तो जगत आला होता. पुढे मनाला वाटेल त्या ठिकाणी राहण्यावर, थांबण्यावर बंधने आली. जमिनीवर सर्वांची मालकी झाली. आता त्यांना पोटासाठी भटकावे लागले. भटकत करता येईल तो व्यवसाय त्यांनी पत्करला. भटकंती धरून अशी विभागणी देशातील भटक्यांची करता येईल.

१. गावगाड्याला आवश्यक कामे करणे, काम झाले की गाव बदलणे.
२. करमणूक करीत गावोगाव भटकन्ती करणे.
३. लोकांच्या दयेवर किंवा भीक मागून पोट भरणे. एकंदरीत पोट डोक्यावर घेऊन पूर्ण देशात या जमाती भटकत होत्या. सर्व दृष्टीने अमानवी जीवन यांच्या वाट्याला आले होते. या सर्व जमातींना १८७१ साली इंग्रजानी गुन्हेगार जमाती कायदा करून जन्मजात गुन्हेगार ठरविले. १९११ च्या जनगणनेप्रमाणे यांची लोकसंख्या साडेतीन कोटी होती. त्यामध्ये देशातील भटक्या २७८ जमाती होत्या. ( **गुन्हेगार जमाती कायदा आणि परिणाम लेख पहावा** )

**अनुसूचित जमाती सूचिमध्ये दुरुस्ती** : अनुसूचित जमातीमध्ये महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमाती समाविष्ट केल्याने घटनात्मक न्याय देशातील भटक्या विमुक्तांना समान मिळेल. भारतीय घटनेच्या ३६६ (२५) या कलमाद्वारे अनुसूचित जमातींची व्याख्या करण्यात आली आहे. ३४२ या कलमाखाली अनुसूचित जमाती म्हणून मान्यता मिळाली आहे. अनुसूचितच जमातींचे निष्कर्ष ( १ ) **संस्कृतीचा वेगळेपणा** ( डिस्टिंकटिव्ह कल्चर ) ( २ ) **भौगोलिक अलगता** ( जिऑग्राफिकल आयसोलेशन ) ( ३ ) **सामाजिक न्यूनगंडता** शायनेस ऑफ कॉंट्रॅक्ट उईथ कम्युनिस्टी ॲटलार्ज ) **(४) मागासलेपणा** ( बॅकवर्डनेस ) या निष्कर्षाच्या आधारे अशा टोळ्या-टोळ्याचे समूह किंवा टोळ्यांचा भाग किंवा गट अशा टोळ्या समूहाचे भाग किंवा गट ३४२ ( १ ) या

कलमाच्या तरतूदीप्रमाणे घटनात्मक काढून देशातील चौदा प्रांतातील एकूण २/२ अनुसूचित जमातींची सूची जाहीर केली. वरील चौदा प्रांतापैकी आठ प्रांतामध्ये भटक्या जमातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये आहे तर चार प्रांतामध्ये ते अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट आहेत. काही प्रमुख जमाती प्रांत नियम १९५० प्रमाणे

| प्रांत | वडार | बंजारा | | कैकाडी | पारधी |
|---|---|---|---|---|---|
| १. आंध्र | S C | S T | | S C | S T |
| २. कर्नाटक | S C | S C | | S C | S T |
| ३. दिल्ली | S C | S C | | S C | S T |
| ४. उत्तर प्रदेश | S C | S C | | S T | S T |
| ५. ओरिसा | S C | S T | | S T | S T |
| ६. बंगाल | S T | S T | | S T | S T |
| ७. बिहार | S T | S T | | S T | S T |
| ८. गुजराथ | S T | S T | | S T | S T |
| ९. हिमाचल प्रदेश | S C | S T | | S T | S T |
| १०. राजस्थान | S C | S T | | S T | S T |
| ११. म्हैसूर | S C | S C | | S T | S T |
| | | | विदर्भात | S C | S T |
| १२. महाराष्ट्र | DNT | DNT | अन्य भागात | DNT | DNT |
| १३. मध्यप्रदेश | DNT | DNT | काही भागात | S C | S T |
| १४. मद्रास | DNT | DNT | | DNT | do |

**असे कसे घडले** — भारतीय स्तरावरील भटक्या विमुक्त जमातींना वेगवेगळ्या सूचिमध्ये का टाकले ? चूक कशी झाली ?

एक तर आपल्याकडे जमातींचा अभ्यास करण्याची शास्त्रीय, समाजशास्त्रीय पद्धत नव्हती. केवळ वर्णाचा भोंगळ आधार होता. वेशीबाहेर डोकावण्यास आपल्या देशातील विचारवंतांना वेळ मिळत नाही तर सतत भटक्या जमातींकडे त्यांचे लक्ष काय जाणार !

२. पारंपारिक भटकन्ती सवयीमुळे शिक्षणापासून वंचित. त्यामुळे या जमातीचे सुखदुःख जाणणारा, सांगणारा नेता झाला नाही.

३. भाषानिहाय प्रांत रचनेच्या वेळी या जमातीं-संबंधी अभ्यास न केल्यामुळे विशेषतः महाराष्ट्रातील भटके जमातींना त्यांची काहीही चूक नसताना घटनात्मक अधि-कारांना मुकावे लागले आहे.

घटनात्मक तरतूदीसाठी लागणारे सर्व निष्कर्ष महाराष्ट्रा-तील भटक्या जमातींना लागू आहेत. मागासवर्गीय सिद्ध करण्यासाठी काही अधिक गुण म्हणजे एक पोटासाठी भटकन्तीची सवय आजही आहेच. दुसरे गुन्हेगार जमाती म्हणून या जमातीला मिळालेली रानटी वागणूक.

१८७१ ते १९५२ पर्यंतची ही अमानवी वागणूक सर्व सामान्यपणे आजही महाराष्ट्रातील जमातींना मिळते. (एक्स गुन्हेगार जमाती ग्रंथ पाहणे.)

**महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तावर अन्याय कसा झाला —**

मागे सांगितलेली दोन कारणे सगळीकडे समान आहेत पण भाषानिहाय प्रांतरचनेमुळे अशी चुक झाली. एक जमात बोलीभाषा, वेशभूषा, रितीरिवाज, जातपंचायत, भटकन्ती प्रवृत्ती, काही जमातींना गुन्हेगार जमातींची वाग-णूक संपूर्ण भारतात आज दिसून येते.

आजही सोईर संबंध चालू आहेत. १९५० सालानंतर दहा वर्षांनी महाराष्ट्राची निर्मिती झाली. ज्या जमातींना घटनात्मक सवलती मिळत होत्या त्या प्रांतविभाजनमुळे यांच्यावर अन्याय झाला. शेवटी या जमातींना आपले गाव असे नव्हते, शिवार नव्हते, सारा देश ते भटकत होते. यांची भटकन्ती यांचीच वैरीण झाली. घटनेप्रमाणे देशात कुठेही फिरण्याचा व स्थिर होण्याचा अधिकार 19, 20–21 प्रमाणे असताना यांना घटनात्मक अधिकाराला मुकावे लागले.

पूर्वीच्या निझाम स्टेटमधील काही जिल्हे कर्नाटकात गेले, तर काही जिल्हे आंध्र प्रदेशामध्ये आणि मराठवाड्यातील

पांच जिल्हे महाराष्ट्रात आले. निझाम स्टेटमधील सर्व भटक्या विमुक्तांना आंध्र व कर्नाटकात गेलेल्यांना आजही घटनात्मक संरक्षण मिळते आहे. पण जे ( मराठवाडा ) महाराष्ट्रात विलीन झाले त्यांना घटनात्मक संरक्षण मिळत नाही.

भटक्या विमुक्त जमातीचा संबंध आजही कर्नाटक आणि आंध्रातील जमातीशी आहेत. त्याचप्रमाणे प्रांता-अंतर्गत शुद्ध चुक झाली आहे ती अद्यापही दुरुस्त करण्यात आलेली नाही. विदर्भातील कैकाडी, पारधी जमाती अनुसुचित जमातीमध्ये आजही आहेत. तर इतर महाराष्ट्रातील भागात याच जमातीना DNT मानले जाते. आज असा घोटाळा झाला आहे की या जमातीचे सोईर संबंध आंध्र, कर्नाटक, मराठवाड्यात आजही आहेत. मराठवाड्यातील कैकाडी जमातीच्या मुलांनी विदर्भाची मुलगी केली तर मुलगी SC मुलगा DNT, आंध्र कर्नाटकाची मुलगी केली तर ST असा घोटाळा केवळ प्रांत विभाजनामुळे झाला आहे.

घटनात्मक तरतुदीची यादी १९५० मध्ये जाहीर झाली. गुन्हेगार जमाती कायदा ३१ ऑगस्ट १९५२ साली रद्द करण्यात आला. त्यामुळे चुका झाल्या आहेत. याकरीता घटनात्मक ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता, समानता स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातीचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये करून सर्व अर्थांनी उपेक्षित असलेल्या जमातीना न्याय दिला पाहिजे. मिळते तेच आम्हाला द्या, नवीन काही नको अशा प्रकारची ही मागणी आहे.

मराराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमाती अनुसूचित जमातीच आहेत. त्या प्रमाणे शासनाने डिनोटीफाईड ट्राईब आणि नोमॅडीक ट्राईब अशी सूचीपण केली आहे. पण केंद्र शासनाकडे पुरोगामी महाराष्ट्र शासनानी या जमातीना अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ट करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले नाहीत.

प्रसिद्ध समाजशास्त्र डॉ. एल्विन यांच्या नेतृत्वाखाली १९५९ साली एक समिती स्थापन झाली होती. त्यांनी अनुसूचित जमातीचे वर्गीकरण चार भागात केले आहे. चवथ्या वर्गीकरणात ते म्हणतात, " याशिवाय एक्स गुन्हेगार जमाती व भटक्या जमाती यांच्या समस्या वर सांगितल्याप्रमाणे आहेत " श्री. यु. एन. ढेबर आणि काकासाहेब कालेलकर आयोगांनी या जमातीकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता मान्य केली आहे. केंद्र शासनानी बी. एन. लोकुर यांच्या नेतृत्वाखाली १९६५ मध्ये एक समिती नेमली होती. लोकुर यांनी तर असे स्पष्ट म्हटले आहे, " The members of Denotified and Nomadic communities posses a complex combination of tribal characteristics; traditional untouchability, nomadic traits and an anti-social heritage." अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती म्हणून असणारे निकर्ष या जमातीमध्ये आहेतच.

१९६० साली शीलु आयो अभ्यास गटानी निकर्ष काढताना Excriminal Tribe and Nomadic Tribe च्या संदर्भात फारसे काहीच बदल झाले नाही असे म्हटले आहे. या संदर्भात पंडीत जवाहरलाल नेहरु म्हणाले होते की वन्य जाती आदिवासी चे प्रश्न सोडविण्यासाठी दवाखाने आरोग्यधाम किंवा विद्यालये बांधून चालणार नाही तर त्यासाठी एक मानसशास्त्रीय दृष्टिकोण अंगीकारणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ शेरसिंग शेर यांनी ' A plea for Denotified and Gypsy Tribes of India ' या विस्तृत लेखामध्ये या जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी पंधरा शिफारशी केल्या आहेत. त्या अतिशय महत्त्वाच्या आणि भटक्या विमुक्तांच्या मूलभूत परिवर्तनासाठी आहेत. त्यातील दोन नंबरच्या शिफारशीत ते म्हणतात की, देशातील भटक्या विमुक्तांना एकाच सूचिमध्ये टाकले पाहिजे म्हणजे सवलतीच्या निमित्ताने का होईना हा समाज भारतीय स्तरावर संघटीत होण्याचा प्रयत्न करील. या जमातींची लोकसंख्या आज देशात दहा कोटीच्या आसपास आहे. १९११ च्या शिरगणणेप्रमाणे गुन्हेगारी जमातींची लोकसंख्या साडेतीन कोटी आहे हे मान्य केलेले आहे.

१०–११ एप्रिल १९६० रोजी अखिल भारतीय विमुक्त फेडरेशनचे अधिवेशन सोलापूर येथे झाले होते. उद्घाटन करताना पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु म्हणाले होते की आज तुम्ही गुन्हेगारी जमाती कायद्यातून मुक्त झालात गुन्हेगार म्हणून तुम्ही तार कुंपणात बंदिस्त आहात, जोपर्यंत मानवी जीवन तुम्हाला जगता येणार नाही तोपर्यंत मी आपल्या बंधनात आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून चवथ्या पंचवार्षिक योजनेपर्यंत भटक्या विमुक्तांच्या पुनर्वसनासाठी विशेष आर्थिक तरतुद पंडीत जवाहरलास नेहरु यांनी करुन घेतली होती. पंडीत जवाहरलाल नेहरु गेले आणि यांची पंचवार्षिक योजनेतील विशेष आर्थिक तरतूद बंद करण्यात आली. आज एकाही पैशाची विशेष तरतुद भटक्या विमुक्तांच्या विकासाकरीता नाही. विविध आयोग, अभ्यासगट,

समाज शास्त्रज्ञ, पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या सहानुभूतिचा परिणाम काही प्रमाणात झाला.

शेड्यूल्ड कास्ट शेड्यूल्ड ट्राईब ऑर्डर (Amendment, Bill १९६७) प्रमाणे आंध्र, कर्नाटक, मध्य प्रदेश हिमाचल प्रदेशानी काही भटक्या जमातीचा समावेश शेड्यूल्ड कास्ट/शेड्यूल्ड ट्राईब मध्ये केंद्राकडे शिफारस करवून घेतला.

अखिल भारतीय बंजारा सेवा संघाने एक अभ्यास समिती नेमून पहाणी करून महाराष्ट्रातील बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करावा असा अभ्यासपूर्ण अहवाल केंद्राकडे १९६८ मध्ये पाठविला पण परिणाम झाला नाही. महाराष्ट्रातील गारुडी जमात मात्र एक्स गुन्हेगार जमातीपैकी होती. तिचा समावेश शेड्यूल्ड कास्ट मध्ये १९६८ साली करण्यात आला.

बुरूड नावाची जमात महाराष्ट्रात इतर मागासवर्गीय जातीपैकी होती. १९७७ मध्ये तिचा समावेश शेड्यूल्ड कास्टमध्ये करण्यात आला.

The Scheduled Castes and Scheduled Tribes order (Amendment) Act 1976 Act No 108/20 sept., 1976 प्रमाणे देशातील वेगवेगळ्या उपजातीच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पण निकष शेड्यूल्ड ट्राईब आणि शेड्यूल्ड कास्ट प्रमाणे असलेल्या उपजातीचा समावेश करून घटनात्मक संरक्षण देण्यात आले. घटनेप्रमाणे शेड्यूल्ड कास्ट किंवा शेड्यूल्ड ट्राईबमध्ये जाती समाविष्ट करण्याचा किंवा वगळण्याचा अधिकार केंद्राला आहे. पण तशी शिफारस मंत्रीमंडळाने राज्यपालामार्फत केंद्राकडे करावी लागते. असे प्रयत्न महाराष्ट्र शासनानी केले किंवा नाही यांची माहिती नाही.

१९११ साली देशातील डिप्रेस कास्टची एक सूचि करण्यात आली होती. त्यामध्ये त्या काळातील गुन्हेगार व भटक्या जमातींची नावे होती. १९३१ साली लोकगणना कमिशनरनी ट्राईबची जी यादी जाहीर केली होती त्यामध्ये सुद्धा आज महाराष्ट्रात असलेल्या भटक्या विमुक्त जमातीची नोंद होती. निझामांनी फस्ता कौमची जी सूचि केली होती त्यामध्ये आज महाराष्ट्रात असलेल्या बहुतेक भटक्या विमुक्त जमातींची नोंद होती.

अलिकडे मंडल आयोगाचे एक सदस्य एल्. आर. नाईक यांनी डिसेन्ट नोट मध्ये डिप्रेस्ड कास्ट यादी जाहीर केली आहे त्यामध्ये भटक्या विमुक्त जमातीची नोंद आहे.

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये केल्यास घटनेच्या खालील कलमांची किंवा मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी होईल.

समान संधीसाठी विशेष संधी ३२० ते ३३२, ३३४, ३३५, ३३८, ३३९ कलमे पाहावी.

सांस्कृतिक आणि शिक्षा संबंधी अधिकार कलम २९, ३० प्रमाणे समान सांस्कृतिक अधिकार.

मूलभूत अधिकार समानतेची हमी १४ ते १८ द्वारे धर्म, वंश, जात, लिंगभेद केला जाणार नाही.

समान संधी घटनेच्या १६ व्या कलमानुसार जन्म स्थान, निवासस्थान या आधारावर भेदा भेद करता येणार नाही.

घटनेच्या ४६ व्या कलमाद्वारे समाजातील दुर्बल घटकाची खास काळजी घेण्याची जबाबदारी देशाने स्विकारली आहे.

वरील सर्व पार्श्वभूमि आणि संदर्भावरून महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करणे काळाची गरज आहे. हा एक राष्ट्रीय प्रश्न आहे.

(दि. २ व ३ मार्च १९८६ रोजी झालेल्या 'भटक्या विमुक्त जमाती' चर्चा सत्रासाठी सादर केलेल्या टीपणाच्या आधारे.)



# भटक्या-विमुक्त जमाती विकासाचे प्रयत्न

बाळकृष्ण रेणके

## भटक्या-विमुक्त जमातींची ओळख

### विमुक्त जमाती :

ब्रिटिश सरकारने १८७१ साली गुन्हेगार जमाती कायदा केला. या कायद्याप्रमाणे काही जमातींची माणसे जन्मतःच गुन्हेगार असतात असे ठरविण्यात आले. जाती व्यवस्था मुळाधार असलेल्या समाज व्यवस्थेला या कायद्यामुळे चांगलेच खतपाणी मिळाले आणि ठराविक जमातींची माणसे जन्मतःच गुन्हेगार असतात हा विचार समाजात सर्वदूर पक्का झाला. म्हैस, बैल, कुत्रा वगैरे पाळीव प्राण्याबद्दल असणारा जिव्हाळा सुद्धा या माणसांच्या वाट्याला आला नाही. त्यामुळे त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारास सीमाच राहिली नाही. कधी पोलिसांच्या ताब्यात, कधी तुरुंगात, तर कधी रानावनात लपून छपून कोल्ह्या-लांडग्याचे जीवन जगणे ह्याला सोडून त्यांना दुसरा पर्यायच उरला नाही. घर, गाव, शेती, उद्योग किंवा सणवार वगैरे बाबींना त्यांच्या जीवनात स्थानच उरले नाही.

पुढे १९२४ साली ब्रिटिश सरकारने केलेल्या "गुन्हेगार जमाती वसाहतीकरण कायदा" यामुळे तर त्यांच्यावर कडक निर्बंध लादून तारेचे कुंपण व पोलिसांचा कडक पहारा असलेल्या त्यांच्या वसाहती स्थापण्यात आल्या.

"कोणत्याही जाती-जमातीचा माणुस जन्मतः गुन्हेगार असू शकत नाही" हे तत्त्व आपल्या राज्यघटनेने मान्य केल्यामुळे स्वराज्यात १८७१ व १९२४ सालचे वरील दोन्ही कायदे १९५१ साली रद्द करण्यात आले. त्यामुळे या जमातीना १९५१ पासून पुढे "पूर्वाश्रमीच्या गुन्हेगार जमाती" ( Excriminal Tribes or Denotified Tribes) असे कागदोपत्री संबोधण्यात येऊ लागले.

या जमातीना उद्देशन नेहरूंनी विमुक्त जन हा शब्द प्रयोग केला म्हणून महाराष्ट्र शासनाने Excriminal Tribe या शब्दांचे मराठी भाषांतर "विमुक्त जाती" असे केले.

ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या वसाहतींमध्ये त्यांच्यावर कडक निर्बंध असले तरी त्यांच्या उपजिविकेसाठी त्यांना निश्चित स्वरूपाचा भत्ता दिला जात होता. शिवाय वसाहतीतील स्त्री-पुरुषांना औद्योगिक प्रशिक्षण देऊन त्यांच्या दोन हाताला काम देण्याचा प्रयत्न ते करीत होते. लहान मुलांना शिक्षण प्रशिक्षण देणाऱ्या शाळांची व्यवस्था तुरुंगातच केली होती.

ब्रिटिशांनी निर्माण केलेले तारेचे कुंपण स्वराज्यात नष्ट झाले व हे लोक मुक्त झाले. परंतु त्याचबरोबर त्यांच्यासाठी ब्रिटिशांनी निर्माण केलेली शिक्षण-प्रशिक्षणाची व्यवस्था व उपजिवीकेसाठी त्यांना मिळणारा भत्ता या गोष्टीही नष्ट झाल्या. आणि त्यांच्या पुनर्वसनाची पर्यायी व्यवस्था करण्यास भारत सरकार विसरले.

### भटक्या जमाती :

उपजिविकेसाठी सतत गावोगाव भटकत रहाण्याची परंपरा असलेल्या काही जमाती आहेत. बहुतांशी जमाती देव-देवतांच्या नावे भिक्षा मागत व लोकांची अध्यात्मिक करमणूक करीत फिरतात. काही जमाती रस्तोरस्ती कसरतीचे, जादूचे, हातचलाखीचे खेळ करीत फिरतात. साप, माकड, बैल, पोपट वगैरे प्राण्यांचा खेळ करीत फिरणाऱ्या काही जमाती आहेत. नृत्य-गायन, कथा-कथन वगैरे करून लोकांची करमणूक करीत फिरणाऱ्या काही जमाती आहेत. नाडी परीक्षेवरून रोगांचे निदान करून वनस्पतींची औषधे देत गावोगांव फिरणाऱ्या जमातीही आहेत. स्वतःच्या दंडात सुया टोचून निघालेल्या रक्ताचे नैवेद्य कोपलेल्या देव-देवतांना दाखवून गावकऱ्यांच्या सुखी जीवनाची मागणी करीत गावोगाव भटकणारी जमातही आहे. परंपरागत पद्धतीने पुरेशी भिक्षा मिळाली नाही तर रानावनांत शिकार करून किंवा नद्या-नाल्यात मासे मारून ते आपली उपजिविका करतात.

वरीलप्रमाणे गावोगांव भटकणाऱ्या बावा-बैरागी, भराडी गारुडी, घिसाडी, गोंधळी, जोशी, वासुदेव, दांगट, कोल्हाटी, डोंबारी, मसणजोगी, नंदीवाले, माकडवाले, बैदू, बहुरूपी, नाथजोगी, डवरी, कानफाटे गोसावी, चित्रकथी, काशीकापडी, पांगुळ, ठाकर, रावळ, सिक्कलगार, हेळव, गोपाळ, वगैरे प्रमुख जमातींसह एकूण २८ जमातींची नोंद महाराष्ट्र शासनाच्या भटक्या जमातींच्या यादीत आहे

### भटक्या विमुक्त जमातींची अवस्था :

### सामाजिक आर्थिक व शैक्षणिक अवस्था :

धर्माने सांगितलेल्या वर्ण व्यवस्थेत या जमातींना स्थान नाही. म्हणून गावगाड्यातील उत्पादन प्रक्रिया किंवा सेवाकार्य यामध्ये त्यांना कोठेच स्थान नाही. गावकुसाच्या बाहेर ओसाड माळावर किंवा गावाच्या आश्रयाने हागंदरीत अगर मसनवाट्यात चार दोन दिवस राहून, त्या गावात भिक्षा मागून झाली की पुढच्या गावाला निघणे हा त्यांचा जीवनक्रम आजही चालूच आहे. घिसाडी, सिक्कलगार, कैकाडी, वडार वगैरे काही थोड्या जमाती, गावकऱ्यांच्या गरजा भागविणारे छोटे छोटे व्यवसाय किंवा माती वहाणे, दगड फोडणे वगैरे सारखी हलकी समजली जाणारी कष्टाची कामे करतात. परंतु या व्यवसायाचे स्वरूप सुद्धा भटके असून हे व्यवसाय हलके व प्रतिष्ठाहीन समजले जातात.

मंत्रतंत्र, जादूटोणा, भूत बाधा, देव-देवस्की वगैरे बाबतीत या जमाती अत्यंत अंधश्रद्ध आहेत. घातक व्यसनांचे प्राबल्य, पराकोटीचे अज्ञान व दारिद्र्य बाळगणारा हा समाज गावात घर नाही, रानात शेत नाही, प्रतिष्ठीत व्यवसाय नाही अशा अवस्थेत पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या भटकेपणाला कवटाळूण जीवन जगत आहे. ह्यां भूहिन, बेघर, दारिद्र्यरेषेखालील लोकांच्यासाठी शासनाने काही सोयी सवलती जाहीर केलेल्या आहेत. परंतु भटक्या जमातींच्या लोकांची नावे भूहिनांच्या, बेघरांच्या किंवा दारिद्र्यरेषेखालच्या लोकांच्या यादीत आलेली नाहीत.

या जमातीचे लोक जन्मतः गुन्हेगार किंवा भिकारी असतात अशी सामान्य जनांची मनोधारणा असल्यामुळे त्यांना कष्टाची, मजुरीची कामे वेळेवर मिळत तर नाहीतच परंतु त्यांना पदोपदी मानवी उपेक्षा व अन्याय-अत्याचारास तोंड द्यावे लागते. काही वेळा यांच्यापैकी काहींना मूलभूत गरजा भागविण्यासाठी चोरी करण्याला दुसरा पर्यायच उरत नाही. या परिस्थितीचा फायदा काही धूर्त प्रस्थापित लोक स्वतःच्या स्वार्थासाठी करून घेतात. हे धूर्त लोक भटक्यांना मजुरी देऊन चोरीच्या कामाला लावतात. अशातऱ्हेने व्यवहारात ते प्रतिष्ठित म्हणून वावरतात आणि मजुरीने चोरी करणारा मात्र गुन्हेगार म्हणून बदनाम ठरतो.

भटकेपणामुळे या जमातींना मूळात शिक्षणाची संधीच मिळत नाही. यांच्या अज्ञान व निरक्षरता यामुळे मुलांची जन्मतारीख लिहून ठेवली जात नाही. त्यामुळे ती सांगताही येत नाही. म्हणून मुलांना शाळेत प्रवेश मिळविण्यास अडचण निर्माण होते. कोणत्याच गावचे "रहिवासी प्रमाणपत्र" मिळत नाही म्हणून मुलांना वसतिगृहांत प्रवेश मिळत नाही. या अडचणी सोडवून घेण्यासाठी आवश्यक असलेली हुशारी, वेळ, पैसा यांच्याजवळ नाही. मुख्य म्हणजे शिक्षणाबद्दल आवडच नाही. म्हणून वैदू, माकडवाला, नंदीवाले, डोंबारी, पारधी, मसनजोगी, मांगगारुडी वगैरे जमातीचे लोक तर शंभरटक्के निरक्षर आहेत.

### राजकीय अवस्था :

अज्ञानी, दरिद्री आणि सामाजिक दृष्ट्या तुच्छ व अलिप्त असलेल्या मागास समाज घटकांना समान संधीचा लाभ घेता यावा म्हणून त्यांना विशेष संधी देण्याचे तत्त्व भारतीय राज्यघटनेने मान्य केले आहे. अशी विशेष संधी दुर्बल घटकातील ज्या ज्या जातीजमातींना दिली पाहिजे त्यांची यादी करून राज्यघटनेस दोन परिशिष्टे जोडली आहेत. यापैकी एक अनुसूचित जातीचे व दुसरे अनुसूचित जमातीचे आहे.

भारतामध्ये दुर्दैवाने आजही अशा असंख्य भटक्या जमाती आहेत की ज्या अनुसूचित जाती / जमातीपेक्षा कंकणभर जास्तच हालाखीचे, उपेक्षित, शापित जीवन जगत आहेत. परंतु विशेष संधीसाठी भारत सरकारच्या वरील परिशिष्ठात त्यांची नोंद केली गेलेली नाही.

काही प्रांतात अशा जमातींची वेगळी यादी तयार करून राज्य शासनानी त्यांना शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात थोड्याबहुत सवलती जाहीर केल्या आहेत. परंतु मुळातच भटकी प्रवृत्ती, सामान्य लोकांपासून अलिप्त रहाण्याची वृत्ती, सुधारणेच्या विरोधातले त्यांचे परंपरागत मन, निरक्षरता, बहुजन समाजाकडून मिळणारी तुच्छतादर्शक वागणूक यामुळे त्यांना राज्य शासनाच्या या सोयी, सवलतींचा लाभ होताना दिसत नाही.

भटक्या जमातींचे लोक आजही राज्यसंस्थेपासून तुटलेल्या अवस्थेत पूर्वपार पद्धतीने भिक्षा मागूनच आपला चरितार्थ चालवत असल्याचे दिसते. सापगारुडी, डोंबारी, माकडवाले, नंदीवाले, मरगम्मा, पारधी, वैदू, जोशी, वगैरे लोक नेहमीच डोळ्यात भरतात. त्यांच्या ब्रिटिश आमदानीतील जीवनात आणि ३८ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर आजच्या या जीवनात काही फरक पडल्याचे आढळत नाही. राज्य कोणाचेही असो त्यांच्यासाठी काहीच फरक पडत नाही. बाहेरील कायद्यांची बंधने त्यांच्यावर जरुर पडतात. परंतु त्या कायद्यांचे लाभ मात्र त्यांना होत

नाहीत. "कायदा व सुव्यवस्था" या कल्पनेत व त्यानुसार होणाऱ्या कारवाईत भटक्या विमुक्तांचे तिळमात्र सुख किंवा लाभ सामावलेले नाही. उलट जर ते त्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर आले तर "कायदा व सुव्यवस्था" धोक्यात आली म्हणून त्यांच्याच पाठीत बडगा बसण्याची शक्यता आहे.

### भटक्या विमुक्त जमातीचे वेगळेपणा :

मानवी विकाराला अनुसरून सामान्य जनाप्रमाणे भटक्या विमुक्त जमातींमध्ये सुद्धा अनेक वाद, भांडणे, गुन्हे रोजच होतात. बऱ्याचदा या वादांचे रूपांतर खून, मारामाऱ्या होण्यात होते. आजपर्यंतच्या शेकडो वर्षांच्या इतिहासात आपणास एकही उदाहरण असे आढळणार नाही की एका भटक्या जमातीच्या इसमाने त्याच जमातीच्या दुसऱ्या इसमाविरुद्ध पोलिसांकडे किंवा न्यायालयाकडे धाव घेतली आहे.

भटक्या जमातीचे स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. त्यानुसार जमातीतील लोकांच्या जीवनक्रमावर सर्व बाबतीत संपूर्णपणे नियंत्रण ठेवणारी, राज्यसत्तेशी समांतर असलेली, जमाती अंतर्गत जातपंचायतीची स्वतंत्र शासन व्यवस्था आहे. स्त्री-पुरुषसंबंध, लग्न, घटस्फोट, मारामारी, खून, आर्थिक व्यवहार, फसवणूक वगैरे संबंधातले जमाती अंतर्गत निर्माण झालेले सर्व प्रश्न आजही जातपंचायती मार्फतच सोडविले जातात. ही जात पंचायतीची शासन यंत्रणा एवढी मजबूत कडेकोट झाली आहे की दिल्लीच्या तक्तावर कोण राज्य करीत आहे यांचे त्यांना काहीच सोयरसूतक नाही. सामुदायिक पंचायतीचे अधिकार त्या समुहापुरते सर्वश्रेष्ठ असतात. या जमाती व राज्यशासन यांच्या संबंधाचा विचार केला तर शासकीय कायद्याचे निर्बंध या जमातीवर जरुर पडले आहेत. परंतु त्या त्या कायद्यांचा लाभ मात्र झालेला नाही.

समाज पुरुषाने भटक्या जमातींना गावगाड्यात स्थान दिले नाही. त्यांना अवर्ण मानले. त्यामुळे मुख्य समाज व भटके विमुक्त यांच्यात अलिप्तता निर्माण झाली. या अलिप्ततेतून शक्तीशाली प्रस्थपितांशी संघर्ष निमाण होऊ नये व निर्माण झालाच तर सोयींच्या दृष्टीने संपत्ती, अन्न धान्य, कपडालत्ता वगैरेचा संचय करायचा नाही हा नियम झाला. या नियमातूनच रात्रीचे अन्न सकाळसाठी ठेवायचे नाही. ताट-वाटी-झोळी रिकामी करून उशाला घेऊन झोपायचे, तीन दिवसापेक्षा जास्त काळ एका गावात रहायचे नाही. रोज ताजी भिक्षा मागूनच पोट भरायचे अशा प्रकारचे तत्त्वज्ञान काही जमातींनी स्विकारले; भिक्षा मागितल्या शिवाय उपजिविकाच होत नाही म्हणून भिक्षा मागणे वाईट तर नाहीच परंतु तो आपला पवित्र धर्म आहे अशी धारणा सर्वच भटक्या जमातींची आहे.

देशातल्या एका दगडावर किंवा एका झाडावर मालकी हक्क सांगण्याचा अधिकार भटक्या जमातींना नाही. परंपरेने "जन्मतः गुन्हेगार व भिकारी" नावाचा शिक्का कपाळावर मारल्यामुळे कष्ट करून पोट भरण्याची संधीही मिळत नाही. चूल तयार करण्यासाठी कोणाच्या शेतातले तीन दगड उचलले, चूल पेटवण्यासाठी कोणाच्या शेतातून काटक्या घेतल्या, भूक भागविण्यासाठी रानातले कणिस किंवा भाजी घेतली तरी या साऱ्या गोष्टी कायद्याने चोरीच ठरतात. चोरी केल्याशिवाय या जमातींचे भागतच नाही. सामान्य जनाकडून कमीतकमी त्रास व्हावा, शक्यतो त्यांच्याकडून दया-सहानुभूती मिळावी म्हणून "पोटापुरती" म्हणजेच त्या दिवसाच्या गरजा भागण्या एवढीच चोरी करायची हा काही जमातींचा नियम झाला. आणि गरजेपेक्षा जास्त चोरी करणे 'हा जातपंचायतीने गुन्हा ठरविला. चोरीची मर्यादा ठरविण्याचे अधिकार जातपंचायतीकडे आले परंतु चोरी करण्यास मान्यता देण्यात आली.

अपघाताने शिक्षण मिळाल्यामुळे शिक्षकाची नोकरी करणाऱ्या उरळीकांचन येथील मुसळे गुरुजींना कोल्हाटी जमातीची जातपंचायत वाळित टाकते. मुसळे गुरुजींचा गुन्हा काय, तर त्यांनी कोल्हाटी जमातीचा नाच-गाण्याचा परंपरागत व्यवसाय सोडून शिक्षण घेतले व सरकारी नोकरी पत्करली.

आर्थिक गरजा भागविण्यासाठी काही भटक्या जमातीत याच कारणासाठी आपल्या स्वतःच्या बायका जमातीतल्याच सावकाराकडे गहाण ठेवून कर्ज काढले जाते व सवडीने कर्ज फेड करून आपापल्या बायका परत नेल्या जातात. या व्यवहारास जातपंचायतीची मान्यता आहे. आजही ही प्रथा चालू आहे.

प्रस्थापितांपासून संरक्षण व्हावे, आपले अस्तित्व टिकावे म्हणून भटक्या जमातींनी आपले स्वतंत्र तत्त्वज्ञान व जीवन जगण्याची विशिष्ट पद्धत निर्माण केली. प्रत्येक जमातीची वेगळी सांकेतीक भाषा आहे. जीवनाच्या सर्वांगावर नियंत्रण ठेवणारी जातपंचायतीची शासन व्यवस्था निर्माण केली परंतु स्वसंरक्षणासाठी आळी स्वतःभोवती कोष तयार करते व शेवटी त्यालच अडकून ती मरते त्याच प्रकारे या

जमाती स्वतःच्या संरक्षणासाठी स्वतःभोवती स्वतः केलेल्या संरक्षण कोषात स्वतःच गुदमरत आहेत.

वैज्ञानिक सुधारणांचा वारसा घेऊन आपला देश २१ व्या शतकात स्वाभिमानाने पदार्पण करण्याच्या मार्गावर आहे. तर आज २१ व्या शतकातही या जमाती इ. स. पूर्व काळात वावरत आहेत. त्यातील काही जमाती एवढ्या कमालीच्या अडाणी आहेत की आजही त्या अन्न शिजवून खात नाहीत. देवधर्माच्या कर्मकांडात एवढ्या अडकलेल्या आहेत की काही जमातीत आजही नरबळी दिल्याने देवता लवकर प्रसन्न होते असे समजतात.

या जमातींच्या वस्त्या म्हणजे स्वायत्त बेटे किंवा स्वायत्त राष्ट्रकेच आहेत. त्यामुळे आधुनिक भारताचा कोणताच लाभ या मंडळीपर्यंत पोहचलेला नाही. देशाच्या स्वातंत्र्याला ३८ वर्षे पूर्ण झाली. "एक माणूस एक मत" हा सिद्धांत घटनेने स्विकारला. परंतु या जमाती नागरी स्वातंत्र्याच्या पलिकडे राहिल्या आहेत. या जमातीतील बहुतांशी लोकांची मतदारांच्या यादीत नोंद नाही. म्हणून ते मतदानाच्या हक्कापासून वंचित आहेत. त्यामुळे या जमाती स्वतंत्र आहेत, असे म्हणण्याला काहीच अर्थ नाही.

## संशोधनाची गरज—

### समकालिन महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातींच्या जीवनाची ओळख करून देणारे संशोधन झाले पाहिजे.

देशात आजही अनेक दलित दुबळे समाज घटक आहेत. त्यांचे सर्व प्रश्न सुटलेले आहेत असे नाही. परंतु ते एका जागी स्थिरावलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे त्यांना किमान कागदोपत्री कायद्याने जमिनी किंवा गुरेढोरे, घरे, इतर मालमत्ता यांचे हक्क व नागरी हक्कही कमी अधिक प्रमाणात मिळाले आहेत. संघटित लढे देण्याची त्यांची ताकद वाढते आहे म्हणून ते देशाच्या सर्वसाधारण विकासाच्या प्रवाहात सामिल झालेले आहेत. किंवा निदानपक्षी त्या प्रवाहाच्या काठावर ते पोहचलेले आहेत. भटक्या विमुक्त जमातींचा बहुसंख्य समाज घटक मात्र आजही देशातील विकासाच्या प्रवाहापासून अलिप्त राहिलेला आहे. एकीकडे हा समाज घटक एकूण समाज व्यवस्थेला बिचकून स्वतःच विकासाच्या प्रवाहापासून अलिप्त रहाण्याचा प्रयत्न करीत आहे. तर दुसरीकडे त्यांच्या प्रश्नाबाबत बहुजन समाज उदासिन आहे असे दिसत आहे.

भटक्या विमुक्त जमातींचा समाज घटक. देशाच्या विकासाच्या प्रवाहात सामिल व्हायचा असेल तर तो शासन, विचारवंत, सामान्य जनता यांच्या चिंतनाचा विषय बनला पाहिजे. त्यासाठी खेड्यापाड्यातून व रानावनातून फिरणाऱ्या निरनिराळया भटक्या जमातींच्या टोळयांबरोबर राहून, त्यांचे जीवन प्रत्यक्ष अनुभवून, अभ्यासून, त्यांच्यातील लहान–मोठी स्त्री-पुरुष यांच्या मुलाखती घेऊन, त्यांच्या जीवनाच्या सर्वांगाचे ( सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, मानसिक अंगाचा अभ्यास होऊन ) वस्तुनिष्ठ चित्र समाजापुढे येणे आवश्यक आहे.

## शासनोपयोगी संशोधन झाले पाहिजे

बेघरांच्या, भूमिहिनांच्या किंवा दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या याद्या तयार करून त्यांच्या कल्याणाच्या काही योजना शासन राबवित आहे. भटक्या विमुक्त जमातींच्या कल्याणासाठी तर काही खास सोयी सवलती ठेवण्यात आल्या आहेत. या जमातींच्या विकासाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाचे धोरण पहाता तसे ते कल्याणकारी आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र या जमातींच्या तळातल्या लोकांना शासकीय कल्याणकारी धोरणांचा, योजनांचा लाभ होत असलेला दिसत नाही. म्हणून कल्याणकारी धोरणाला अनुसरून योजनांच्या निर्मितीमध्ये, योजनांच्या अंमल-बजावणीसाठी निर्माण केलेल्या यंत्रणेमध्ये, योजनांच्या अंमल बजावणीच्या पद्धतीमध्ये, शासनात लोकांचे योग्य ते सहकार्य मिळण्यामध्ये काय चुका होत आहेत, कोणत्या अडचणीमुळे शासकीय योजनांचा गरजूंना लाभ होत नाही, त्या योजना जास्तीत जास्त कशा उपयुक्त ठरतील वगैरे बाबतीत तटस्थ भूमिकेतून संशोधन झाले पाहिजे. आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, विज्ञानाचा प्रसार, भटक्यांच्या रूढी परंपरा, त्यांचे भटकेपण, कर्ज बाजारीपणा, जातपंचायतीकडून वाळीत टाकण्याचे प्रकार, जात–पंचायतीने आकारलेला दंड पिढ्यान्‌पिढ्या फेडण्याची बंधने, या सर्वांचा भटक्या विमुक्त जमातींच्या जीवनावर होणारा परिणाम, याबाबत शिवाय त्यांचा सामाजिक-आर्थिक, सामाजिक-मानसिक, सामाजिक-सांस्कृतीक असा तौलनिक साकल्यात्मक आणि मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास होणे जरुरीचे आहे.

## भिक्षा प्रतिबंधक कायदा मायेने व ध्येयपूर्तीसाठी राबविला पाहिजे :

ब्रिटिश सरकारने १९४५ मध्ये प्रथम "भिक्षा प्रतिबंधक कायदा" आणला. त्यानुसार १९४६ पासून भिक्षार्थी

वृत्तीला प्रतिबंध घालण्याच्या कार्यास सुरवात झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर म्हणजे १९४७ पासून १९५९ पर्यंत हा कायदा मृतावस्थेतच होता.

मागासवर्गीयांचा अभ्यास करण्यासाठी १९५३ साली नेमलेल्या काकासाहेब कालेलकर कमिशनने आपला अहवाल १९५५ मध्ये केंद्र सरकारला सादर केला. या अहवालात आज भटक्या-विमुक्त समजल्या जाणाऱ्या जमातींकडे विशेष लक्ष देण्याची शिफारस केली होती. ह्या अहवालाच्या आधारावर महाराष्ट्र राज्याने भटक्या विमुक्त जमातींची यादी १९५९–६० मध्ये तयार केली तेव्हा त्यांच्या लक्षात आले कि भटक्या जमातीतील बहुसंख्य जमाती भिक्षा मागून उपजिविका करतात. या जमातींच्या भिक्षा वृत्तीला आळा घालण्याच्या आणि त्यांचे पुनर्वसन होण्याच्या हेतुने सन १९४५ च्या "भिक्षा प्रतिबंधक कायद्यात सुधारणा करून भिक्षा प्रतिबंधक कायदा, १९५९" तयार होता. या कायद्यातील तरतुदीप्रमाणे भिकाऱ्यांना पकडून त्यांना बंदिस्त करून त्यांच्यासाठी अन्न, वस्त्र निवारा यांची मोफत सोय करून यांच्या धंदे शिक्षणाची आणि त्यांच्या पुनर्वसनाची उपाय योजना करण्यात येते."

या कायद्याची हेतुपूर्ण काटेकोर अंमलबजावणी झाली तर ती फायद्याचीच आहे. परंतु यात शासनाने एक मेख मारलेली आहे. ती म्हणजे पुणे, मुंबई, नागपुर सारख्या विशिष्ट प्रांतापुरताच हा कायदा लागू आहे. ह्या प्रांताबाहेर जर गोंधळ्याने तुणतुणे वाजवून भीक मागितली तर तो गुन्हा ठरत नाही आणि त्याला शिक्षाही होऊ शकत नाही. सहाजिकच त्याची जबाबदारी शासनावर पडत नाही.

भिक्षावृत्तीस आळा घालण्यासाठी आणि भिक्षकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी एक सहाय्यक पोलिस आयुक्त आणि काही पोलिस शिपायासह सुमारे २५ जणांचे एक पोलिस पथक मुंबईतील भिकाऱ्यांना अटक करण्याच्या कामगिरीवर खास नेमलेले आहे. अशा खास पथकाकडून अटक केलेल्या भिकाऱ्याचा स्वीकार करण्यासाठी मुंबई, पुणे, नागपूर या ठिकाणी एकुण चार भिक्षेकरी स्विकार केंद्रे आहेत. स्विकार केंद्रात भिकाऱ्यांची संपूर्ण चौकशी करून ती न्यायालयास सादर करण्यात येते. न्यायालयाने भिकाऱ्यांस दोषी ठरविल्यास त्याला भिक्षेकरी गृहात स्थानबद्ध केले जाते. महाराष्ट्रात शासकिय व खाजगी संस्थाचे सरकारमान्य असे मिळून २४ भिक्षेकरी गृहे आहेत. यासर्व भिक्षेकरी गृहाची एकूण क्षमता ३००० भिक्षेकरी सामावून घेण्याची आहे. कायद्याने दोषी ठरलेला भिक्षेकरी या भिक्षेकरी गृहात कमीत कमी १ वर्ष व जास्तीत जास्त ३ वर्षे रहातो. ३ वर्षानंतर त्याला स्थानबद्धतेतून मुक्त केले जाते. या स्थानबद्धतेच्या काळात त्याला धंदे शिक्षण, प्रशिक्षण, शेती व्यवसायाचे शिक्षण दिले जाते. परंतु स्थानबद्धतेतून मुक्त झालेला भिक्षेकरी बाहेर गेल्यावर त्याने काय करावे? त्याचा पोटापाण्याचा, धंद्याचा विचार शासनाने केलेला नाही. त्यामुळेच असे विचारावे लागते की असे किती भिक्षेकरी स्वावलंबी झाले? कारण स्थानबद्धेतून मुक्त झालेल्या भिक्षेकऱ्यांच्या भविष्यातील बऱ्या वाईटाशी शासनाचा काही संबंधच नसतो. अशीच वर्तणूक या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी समाज कल्याण खात्यावर महाराष्ट्र शासन दरसाल सुमारे एक कोटी रुपये खर्च करते. म्हणजे भिक्षेकऱ्यांचे पुनर्वसन करून त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या इच्छेने गेल्या २५ वर्षात २५ कोटी रुपये खर्च करून राबविण्यात आलेल्या या कायद्यामुळे एकूण किती भिक्षेकरी स्वावलंबी झाले आहेत असे विचारले तर शासनाजवळ उत्तर नाही. पण त्याचे फलीत फारतर भिक्षेकरी गृहात नोकर म्हणून सामावून घेतलेली बोटावर मोजण्याइतकी उदाहरणे सरकार देऊ शकले. बाकी सारा अंधारच.

## अन्याय अत्याचारापासून सुटका होण्यासाठी त्यांच्या संरक्षणाचा स्वतंत्र कायदा केला पाहिजे :

१८७१ साली केलेला "गुन्हेगार जमाती कायदा" स्वराज्यात १९५१ साली रद्द झाला असला तरी जाती व्यवस्थेच्या आधारावर निर्माण झालेल्या या कायद्याचा अंमल तब्बल ८० वर्षे भारतात अमानुषपणे चालू होता. जाती व्यवस्था मुळाधार असलेल्या समाज व्यवस्थेत ह्या जमातीची माणसे जन्मतःच गुन्हेगार असतात हा विचार सर्वदूर पक्का झाला आहे. म्हणून प्रत्यक्षात हा कायदा कागदोपत्री रद्द झाला असला तरी समाजमन ते मानण्यास तयार नाही हा रोजचा अनुभव आहे.

१९५१ साली जेव्हा १८७१ सालचा गुन्हेगार जमाती कायदा रद्द झाला तेव्हा कायद्याची राबवणूक करणाऱ्या पोलीस खात्याला पोकळी जाणवू लागली. गुन्हेगारांचे रजिस्टर ठेवण्यासाठी त्यांना तसा कायदा आवश्यकच होता असे पोलीसांनी त्यांचे मत मांडले शेवटी १९५२ साली– "सराईत गुन्हेगार कायदा –" मंजूर करण्यात आला आणि भटक्या विमुक्त जमातीचे स्वातंत्र्य पुन्हा एकदा पोलीसांकडे गहाण पडले.

अशा तऱ्हेने बहुजन समाज व पोलीस या दोघांतर्फे जमातींना गुन्हेगार, भिकारी तुच्छ समजले जात असल्या-

मुळे, त्यांच्या वाट्यास सहानुभूती, माणूसकी देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

आज नव्या परिस्थितीमुळे नवी समस्या भेडसावीत आहे. ठिकठिकाणच्या भटक्या जमाती जागृत होत आहेत, व नागरिकांचे हक्क मागत आहेत. जमिनीतला, संपत्तीतला त्यांचा वाटा ते मागत आहेत. ज्यांच्याकडे साठलेले आहे ते लोक ज्यांच्याकडे नाही त्यांना वाटून देण्यास राजी होताना दिसत नाहीत. या जमातींच्या विकासाच्या मागण्या मंजूर होणे म्हणजेच प्रस्थापितांचे हितसंबंध धोक्यात येणे होय. जिथे जिथे भटके हक्कांसाठी नेटाने उभे रहात आहेत तिथे तिथे समाज कार्यकर्त्यांचे खुन, मारामाऱ्या, झोपड्या जाळणे वगैरे मार्गांनी त्यांची मुस्कटदाबी होत आहे हा अनुभव आहे.

## संरक्षणाचा कायदा व त्याच्या अंमलबजावणीसाठी फिरत्या न्यायालयाची नेमणूक होणे आवश्यक आहे :

अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली गेली आहे. परंतु अद्याप ती पाळली जात आहे. त्याच प्रमाणे [ १८७१ सालाचा गुन्हेगार जमाती कायदा स्वराज्यात रद्द करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात तो पोलिस व जनता या दोघांकडून पाळला जात आहे. ] अस्पृश्यता पाळणे गुन्हा असल्याची नोंद करून अस्पृश्यता पाळणाऱ्यास शिक्षा करण्याची तरतूद अस्पृश्यता विरोधी कायद्यात केलेली आहे. परंतु गुन्हेगार जमाती कायदा रद्द केला असला तरी तो कायदा पाळणाऱ्यास शिक्षेची तरतूद केलेली नाही. म्हणून भटक्या विमुक्त जमातींना कायद्याने संरक्षण मिळालेले नाही. तरी भटक्या विमुक्तांना जन्मतः गुन्हेगार किंवा भिकारी समजून त्यांच्यावर केल्या जाणाऱ्या अन्याय अत्याचारापासून त्यांचे संरक्षण करणारा एक वेगळा कायदा करणे आवश्यक आहे. कारण अन्याय-अत्याचार बंद झाल्या शिवाय ते कोणत्याही विकास योजनेचा लाभ घेऊ शकत नाहीत.

अशा अन्याय-अत्याचार प्रकरणी जागच्या जागी तात्काळ न्याय निवाडा करून गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी प्रशासकीय व न्यायालयीन असे दुहेरी अधिकार दिलेल्या फिरत्या अधिकाऱ्यांची नेमणुक करणे आवश्यक आहे.

अशा अन्याय अत्याचाराच्या घटना घडतात तिथे जाऊन त्यांना लोकशाही मार्गाने अन्याय–अत्याचाराचा संघटीत प्रतिकार करण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य करणे आणि गरज भासल्यास न्याय मिळविण्याचे कामी त्यांना कायद्याची मदत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

## भटक्या विमुक्तांच्या कल्याणासाठी शासनाने सुरू केलेल्या काही कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी पहाण्यासारखी आहे.

### १. वाहन चालक योजना :

भटक्या विमुक्त जमातीतील अशिक्षितपणा लक्षात घेऊन त्यांच्या तरुण पिढीचा आर्थिक विकास साधण्यासाठी त्यांच्यातील युवकांना मोटार चालविण्याचे मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने "वाहन चालक योजना" सुरू केली. वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रात एकूण पंधरा केंद्रे उघडण्यात आली. या पंधरा केंद्रांतून १९७१–७२ ते १९८१–८२ या दहा वर्षांच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रातून भटक्या विमुक्तांच्या फक्त वीस उमेदवारांना प्रशिक्षण दिले गेले आहे. विशेष म्हणजे या वीस उमेदवारांना शासकीय नोकरीत का सामावून घेतले गेले नाही ? त्यांना अन्य ठिकाणी नोकरी लागली आहे का ? ते जिवंत आहेत की नाहीत ? याची माहिती सरकारकडे नाही. या योजनेवर शासनाचा दरसाल रु. ५० हजार खर्च झाला आहे. पण त्यातून विधायक असे काहीच निष्पन्न झाले नाही.

### २. प्रचारकांची नियुक्ती

भटक्या विमुक्तांसाठी असलेल्या कल्याणकारी योजनांचा, सोयी-सवलतींचा भटक्या जमातीच्या अज्ञान लोकांत प्रचार करून त्यांना त्या योजना व सवलतींचा लाभ घेण्यास मदत करण्यासाठी काही संस्थातर्फे प्रचारकांची नियुक्ती करण्यात आली. या प्रचारकांचे वेतन व प्रवासखर्च यावर नव्वद टक्के अनुदान शासनाने दिले आहे. या योजनेसाठी सुद्धा शासनाने भरपूर पैसा खर्च केला आहे. गेल्या दहा वर्षांपासून ग्रामीण भागात भटक्यांच्या वसत्या व तांड्यातून आम्ही सतत फिरत आहोत. परंतु एकाही ठिकाणी प्रचारक पोहोचला असल्याचे आम्हांस आढळून आले नाही.

तसेच त्यांनी काय प्रकारचे कार्य केले ह्यांची नोंदही सरकारी दप्तरी नाही.

### ३. संस्कार केंद्रे :

अंधश्रद्धा, प्रतिगामी समजुती, व परंपरागत वाईट रूढी यांचे मूळ विशेषतः स्त्रियांमध्ये खोल रूजलेले दिसून येते. म्हणून स्त्रिया व मुले यांच्यासाठी समाज कल्याण खात्याने

संस्कार केंद्राची योजना सुरू केली. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी मागासलेल्या जातीतील स्त्रिया व मुले इतर सुधारीत व उच्च समजल्या जाणाऱ्या जातीतील स्त्रिया व मुलांबरोबर एकत्र आणणे हा या योजनेचा हेतू होय. शिवण कामाच्या प्रशिक्षणाची सोय करून स्त्रियांना शिवणकामाचा स्वतंत्र व्यवसाय करण्यात समर्थ बनविणे हा या योजनेचा दुसरा हेतू होय. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात विखुरलेल्या ४२ भटक्या विमुक्त जमातींसाठी शासनाने केवळ चार संस्कार केंद्राची तरतूद केली होती. सुमारे दहा वर्षे पर्यंत दरसाल या योजनेवर ४३ हजार रुपये खर्च करून शासनाने आता ही योजना बंद केली आहे. प्रत्यक्ष भटक्या जमातींना या योजनेचा लाभ शून्य आहे. कारण ते शिक्षण भटक्या स्त्रियांपर्यंत सरासरी एक टक्का पोहोचले असेल.

## ४. प्राथमिक शिक्षण :

आश्रमशाळा, नादारी, वसतिगृह आणि शाळा कॉलेजात राखीव जागा, शिष्यवृत्त्या वगैरे आकर्षक वाटणाऱ्या सोयी-सवलती असल्याचे सांगितले की भटके लोक भारावून जातात. परंतु प्रश्न आहे की सोयी-सवलती किती आहेत यापेक्षा त्यांचा गरजुंना लाभ किती होतो हे महत्वाचे आहे. भटक्या विमुक्त समाजातील मुलं वयाच्या सातव्या आठव्या वर्षापर्यंतच कुटुंबाच्या उत्पन्नाचे साधन बनतात. ते प्रामुख्याने घरोघर भीक मागून अन्न मिळवितात. रस्त्यावरील व उकिरड्यावरील चिंध्या, फुटक्या काचा, प्लास्टिकचे तुकडे, रद्दीकागद, हाडे वगैरे वस्तु वेचून जमा करतात. तसेच इतर काही व्यवसाय करून पालकांना आर्थिक मदत करतात. यामुळे अशा मुलांना शाळेत घालणे त्यांच्या पालकांना आर्थिकदृष्ट्या गैरसोयीचे ठरते.

मुळात शिक्षणाची आवड नाही. त्यात भटकेपणाची अडचण आहेच. याशिवाय विशेष म्हणजे भोवतालच्या काही शिकलेल्या मुलांची हेळसांड व बेकारी पाहून त्यांच्याकडून शिक्षणाविरुद्ध बोलले व वागले जाते. यातूनही काही जणांनी आपल्या मुलांना शाळेत घालण्याचा प्रयत्न केलाच तर सर्व प्रथम मुलाची "जन्मतारीख" हीच त्यांची मोठी अडचण ठरते. अनेक कारणांमुळे त्याचे आईवडील जन्मतारीख सांगू शकत नाहीत. जन्मतारखेच्या दाखल्याशिवाय तर शाळेत प्रवेशच मिळत नाही. त्यातूनही मोठ्या मुष्कीलीनं मुलास शाळेत घालण्यासाठी तयार झालेल्या पालकास परंपरेनं दिलेल्या जीवनचक्रात मुलासह स्वतःस गुरफटून घेण्यापलिकडे मार्ग उरत नाही.

## ५. आश्रमशाळा :

भटक्या विमुक्तांच्या मुलांसाठी समाजकल्याण खात्यातर्फे आश्रमशाळांची योजना राबविली जाते. परंतु शासन स्वतः एकही आश्रमशाळा चालवित नाही. आश्रमशाळा चालविणाऱ्या स्वयंस्फूर्त संस्थांना शासनातर्फे अनुदान देण्यात येते. परंतु असे दिसून येते की —

१. आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा अत्यंत कनिष्ठ आहे. ( ४ थी च्या मुलांना स्वतःचे नाव लिहिता येत नाही, की दहा पर्यंतचे पाढे म्हणता येत नाहीत हा अनुभव आम्ही स्वतः सुद्धा घेतला आहे. )

२. बहुतेक आश्रमशाळेतील पन्नास टक्के मुले अनुपस्थित असतात.

३. चौथी नंतर आश्रमशाळेतून पाचवीसाठी दुसऱ्या शाळेत जाताना सुमारे ५० टक्के मुलांना गळती लागते.

४. आश्रमशाळेतील मुलांना निकृष्ठ दर्जाचे व अपुरे अन्न दिले जाते. समितीने, तपासणीअंती आलेल्या अनुभवातून वरील मुद्दे स्पष्ट केले असले तरी या परिस्थिती मागील कारणमीमांसा शोधून आवश्यक उपाययोजना नीटपणे सुचविलेली नाही.

## ६. माध्यमिक शिक्षण :

१९७७ साली महाराष्ट्रात आठव्या इयत्तेत शिकत असलेल्या एकूण १८ लाख ५० हजार विद्यार्थ्यांपैकी भटक्या विमुक्त जमातींचे विद्यार्थी अवघे ५ हजार होते. आठवीच्या पुढे गळतीचे प्रमाण वाढत जाऊन विद्यार्थ्यांची ही ५ हजार संख्या दहावीसाठी ३ हजार होते. म्हणजे आठवी ते दहावीच्या दरम्यान विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण ४० टक्के आहे. शासनाच्या म्हणण्याप्रमाणे ३० लाख लोकसंख्या असलेल्या भटक्या विमुक्त समाजातून दहावीपर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अवघी ३ हजार भरते. यावरून या समाजाच्या अतिमागासलेपणाबाबत अधिक काही लिहिण्याची गरज आहे असे वाटत नाही.

## ७. वसतिगृहे :

१९७६–७७ सालात ७० शासकीय व ११७७ अनुदानित मिळून एकूण १२४७ वसतिगृहे होती. या सर्व वसतिगृहांतील भटक्या विमुक्तांच्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ५४८७ होती. प्रत्येकी १२५ ते १५० विद्यार्थी असलेल्या वसतिगृहात भटक्यांचे एवढे कमी विद्यार्थी असण्याची प्रमुख कारणे वसतिगृहात प्रवेश मिळण्यासंबंधी

असलेल्या खालील अटी आहेत.

१. विद्यार्थी ७ वी पास पाहिजे, भटक्यांची मुलं ७ वी पर्यंत शिकणं हेच मोठं कठीण काम आहे.

२. वसतिगृहाच्या गावापासून ८ कि. मीटर अंतराच्या परिसरातला तो रहिवासी असता कामा नये.

३. त्यासाठी गावच्या सरपंचाचे रहिवासी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ज्याला स्वतःचे गावच नाही त्याने कोणा सरपंचाचे प्रमाणपत्र सादर करायचे ?

## ८. दोनच मुलांना शिष्यवृत्त्या देण्याचा नियम :

भटक्यांना कुटुंब नियोजनासाठी प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने पहिल्या दोन ते तीन मुलांनाच शासकीय सोयी सवलती देण्याचे धोरण शासनाने स्विकारले आहे.

भटक्या विमुक्तात पराकोटीचे अज्ञान व अंधश्रद्धा आहेत. भटक्या प्रवृत्तीमुळे त्यांना शिक्षणाची संधी नाही आणि त्यांना शिक्षणाची आवडही नाही. तसेच अनेक सामाजिक, आर्थिक कारणांमुळे आणि धर्म आणि अंधश्रद्धा ह्यांचा त्यांच्यावर असलेल्या जबरदस्त पगड्यामुळे कुटुंब-नियोजनाचे महत्त्व त्यांना समजतच नाही. भटक्या जमातीच्या जोडप्यांना सरासरी १५ ते २० मुले होतात व त्यापैकी पाचसहा जगतात असा अनुभव आहे.

कुटुंब नियोजन हा विषय त्यांची उत्पन्नाची साधने कमी करणारा, पहिली दोन्ही तिन्ही मुले मेली तर आपण निसंतान होऊ अशी भिती निर्माण करणारा, त्यांच्या पूर्वापार समजुतीना व भावनांना तडा देणारा आहे. अशा अज्ञानी व दरिद्री लोकात योग्य ती जागृती होण्याआधी त्यांच्या केवळ दोनच मुलांना शिष्यवृत्त्या देण्याचा नियम लागू करणे अन्यायकारक आहे.

## ९. भटक्या विमुक्तांच्या यादीची पुनर्रचना करण्यासाठी तज्ञ व अभ्यासूंची समिती स्थापणे :

सर्वांना समान संधी मिळण्यासाठी मागासवर्गाना विशेष संधी दिली पाहिजे या न्यायाने राज्य शासनातर्फे शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात ४२ भटक्या-विमुक्त जमातींना ४ टक्के जागा राखून ठेवण्यात आलेल्या आहेत. या चार टक्के राखीव जागा त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा फारच कमी असल्या तरी त्या राखीव जागांचा लाभसुद्धा भटक्या विमुक्त जमाती पूर्णांशाने घेऊ शकत नाहीत, कारण मुळात असलेल्या शिक्षणाच्या नावडीमुळे व भटकेपणामुळे त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार फारच कमी झालेला आहे. शिपाई, कारकून, शिक्षक या जागासाठी भटक्यांचे उमेदवार मिळणे कठीण जाते परंतु वैद्यकीय, इंजिनीअरिंग महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी भटक्यांच्या उमेदवारांची गर्दी झालेली दिसते. अशीच गर्दी फौजदार, तहसीलदार, विक्रीकर अधिकार वगैरे नोकऱ्या मिळविण्यासाठी सुद्धा होत आहे. याचे कारण पुढारलेल्या जातींच्या लोकांकडून नामसदृश्यामुळे भटक्या विमुक्तांच्या सवलती लुबाडण्याचा सपाटा चालू आहे. यामुळे भटक्या विमुक्तांच्या विकासाची आकडेवारी जनतेच्या तोंडावर फेकणे शासनाला सहज शक्य झाले आहे.

वैद्यकीय व इंजिनीअरींग महाविद्यालयात प्रवेश मिळण्या आधी किंवा सरकारी अधिकाऱ्यांची नोकरी मिळण्याआधी उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र समाज कल्याण समितीकडून तपासून घेण्याची अट शासनाने घातली आहे. गेल्या तीन चार वर्षात या समितीने शेकडो उमेदवारांनी भटक्या जमातीची प्रमाणपत्रे फेटाळली आहे. आश्चर्याची गोष्ट अशी आहे की समितीने फेटाळलेली शेकडो पमाणपत्रे उमेदवार अपीलात गेल्यावर संबंधीत कमिशनर साहेबांनी ग्राह्य मानली आहेत. माजी समाजकल्याण मंत्री प्रतिभाताई पाटील यांच्या अनेक नातेवाईकानी अशाच पद्धतीने "राजपूत भामटा" या जमातीची प्रमाणपत्रे घेऊन सवलती लुबाडल्याचे कळते. सत्तेचा गाभाच असा किडलेला असेल तर समाज वृक्षाला किडीशिवाय दुसरे कसले फळ येणार ?

उपजिविकेसाठी गावोगाव भटकण्याची परंपरा, शैक्षणिक व आर्थिक मागसलेपण, सामाजिक अप्रतिष्ठा, भिक्षावृत्ती व गुन्हेगार प्रवृत्तीची परंपरा वगैरे निकष भटक्या जमातीला लागू आहेत. शासकीय यादीत समावेश नसलेल्या मदारी, गोवारी, मरगम्म (कडक लक्ष्मी), गाढवी सोनार, परदेशी सोनार, बागडी वगैरे जमातीना हे निकष लागू आहेत. त्यांचा भटक्यांच्या यादीत समावेश होणे आवश्यक आहे.

भटक्या विमुक्तांच्या यादीतील दोष नष्ट होऊन गरजूंना जमातीची प्रमाणपत्रे मिळणे सुलभ व्हावे आणि गैर फायदा घेऊ इच्छिणाऱ्यांना खोटे प्रमाणपत्र मिळणे अशक्य व्हावे यासाठी या जमातीच्या संदर्भात अभ्यासू व तज्ञ असलेल्या लोकांची समिती नेमून यादीची पुनर्रचना केली पाहिजे. प्रमाणपत्र देण्याच्या यंत्रणेतील धोके लक्षात घेऊन प्रमाण पत्राचा नमुना व प्रमाणपत्र मिळण्याची पद्धत या समितीने निश्चित करणे आवश्यक आहे.

भटक्या विमुक्तांचे स्वातंत्र्य

# मानवशास्त्रीय दृष्टीची गरज

भास्कर लक्ष्मण भोळे

१९६५ साली भारतातल्या जनजातींबद्दल प्रसिद्ध लेखक श्री. निराद चौधरी म्हणाले होते की — 'नाईल नदीच्या धरणाखाली बुडालेल्या इजिप्तच्या देवळांप्रमाणे उद्योगप्रधान भारत देशात आदिम जनजातीचे जीवन उध्वस्त होणे अनिवार्य आहे. त्यांचा निर्वंश होणार नाही, तसा तो झालेला एक वेळ पत्करेल. पण जे घडेल ते असे दुःखान्त केवळ असणार नाही, त्यापेक्षा ते ओंगळवाणेच अधिक असेल. आपल्याला जे खेदपूर्वक पहावे लागेल ते या जनजातींचे लोपन नसेल तर ते त्यांचे गुलामीकरण आणि अधःपतन असेल.' इतर जनजातींपेक्षाही चौधरींचे हे विधान भटक्या विमुक्तांबद्दल खरे ठरण्याची दाट शक्यता आहे. एका जागी स्थिरावलेल्या जनजातींना किमान कागदोपत्री कायद्याने जमिनी, गुरेढोरे व मालमत्ता यांचे हक्क लाभले असून नागरी हक्कही कमी अधिक प्रमाणात उपलब्ध झाले आहेत. संघटित लढे देण्याची त्यांची ताकदही अलीकडे बरीच वाढलेली आहे. तसे मुख्य प्रवाहापासून तेही दूरच असले तरी किमान काठापर्यंत त्यांची वाटचाल झाली आहे आणि मुख्य प्रवाहात त्यांना कसे सामील करून घ्यायचे यावर मतांतरे असली तरी किमान विचार-विमर्श सुरू झाला आहे. भटक्या जनजाती मात्र अजून काठापासूनही चिक्कार दूर आहेत.

## भटक्या जमातींची कोंडी

उपजीविकेसाठी रानोमाळ गावोगाव झोळी घेऊन विशिष्ट क्रमाने भटकंती करीत असलेल्या या जनजाती कश्याबश्या निर्वाह पातळीवर जगत असतात. महाराष्ट्रात आज यांची वस्ती बेचाळीस लाखाहून जास्त असल्याचे प्रा. मोतीराम राठोड, श्री. लक्ष्मण माने प्रभृतींच्या लिखाणावरून अलीकडे उघड झाले आहे. एरवी त्यांची कुणी कधी खानेसुमारी केली नाही की मतदार नोंदणी केली नाही. काही टोळ्यांचे तर अस्तित्वही सरकारला माहित नाही. या जमातींना स्थिर निवारा नसल्यामुळे मतदार संघ नाही. त्यामुळे प्रतिनिधित्व नाही, त्यामुळे निर्णयप्रक्रियेत सहभाग नाही. अशा सगळ्या दुरावस्थेत त्यांना स्वातंत्र्याचा अर्थ समजावाच कसा ? त्यांच्या नावे नोकऱ्यांमध्ये काही जागा राखीव असल्याचा गाजावाजा रोजगारविषयक जाहिरातीमधून वारंवार होत असला तरी त्या आरक्षणांचा लाभ कोण घेणार ? हाताच्या बोटांवर मोजता येण्यापलीकडे पदवीधरांची संख्या या चाळीस लाख लोकसंख्येत आजपर्यंत गेलेली नाही. अशाप्रकारे विद्यमान चौकट त्यांना पशुपातळीवर जगणे भाग पाडते आणि भविष्यकालीन विकासाच्या योजना त्यांना परिवर्तनाचा कुठलाच इसार देऊ शकत नाहीत अशी भटक्या जनजातींची कोंडी स्वतंत्र भारतात सुरू आहे. आजतरी सुटका दृष्टिक्षेपात नाही.

विशेषतः ज्या भटक्या-विमुक्तांच्या कपाळावर गुन्हेगारीचा ठप्पा गोऱ्या तसेच काळ्या राज्यकर्त्यांनी आणि त्यांच्यापेक्षाही आर्थिक, सामाजिक कौटुंबिक परिस्थितीने मारून ठेवला आहे त्यांच्या गुलामगिरीला तर या लोकशाही गणराज्यात तोडच नाही. राठोड-माने प्रभृतींच्या लिखाणातून गुन्हेगार म्हणवल्या जाणाऱ्यांची जी जीवनचित्रे समोर आली आहेत, ती स्वतंत्र देशाच्या नागरिकांची क्वचितच म्हणता येणार नाही. राज्यकर्त्यांचे मग्रूर स्थानिक प्रतिनिधी, नोकरशाहीतील यंत्रवत तटस्थ कर्मचारी, ऐच्छिक संघटनेचे स्वनामधन्य कार्यकर्ते, विद्यापीठांचे पोटार्थी 'इन्व्हेस्टिगेटर्स', त्यांच्या अर्धनग्न दारिद्र्याचे भांडवल करून चित्रे वा चित्रपट काढू इच्छिणारे गल्लाभरू दिग्दर्शक व निर्माते किंवा त्यांच्या लोककलांना व कसरतींना शहरी व्यासपीठे मिळवून देण्याच्या नावाखाली त्यांचे शोषण करू पहाणारे सांस्कृतिक मक्तेदार या पैकी प्रत्येकाने भटक्या-विमुक्तांना स्वतःच्या स्वार्थासाठी वा करियरसाठी वापरले आहे. यापैकी कोणालाच कधी त्या त्या जमातीतल्या स्त्री-पुरुषांना स्वतंत्र नागरिक म्हणून सन्मानाने जगता येण्यासाठी काही तरी केले पाहिजे अशी बुद्धीच कधी झाली नाही.

## न्याय, स्वातंत्र्य, समता ही मूल्ये भटक्यांसाठी नाहीत ?

सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या नागरी हक्कांचा कुठे संकोच वा भंग घडल्यास आकांडतांडव करणारी पांढरपेशी वृत्तपत्रे भटक्या विमुक्तांना अपवादानेही नागरी हक्क उपलब्ध नसतात याची दखलही घेताना आढळत नाहीत. भटक्यांच्या बायकांना वेश्या व्यवसाय करणे भाग पाडण्याची, तांड्यामधल्या तरण्या पोरी पळवून नेल्याची,

तांड्यांवर सशस्त्र हल्ले, मारहाण व जाळपोळ केल्याची, केवळ संशयाखातर भटकी माणसे कापून काढल्याची अनेक प्रकरणे रोज घडत असतात. वृत्तपत्रांतून शतांशानेही त्यांच्याबद्दल माहिती प्रसिद्ध होत नाही. याचे कारण उघड आहे. भटक्या विमुक्तांवर दादागिरी गाजवणाऱ्यांचे राजकीय, सामाजिक सामर्थ्य जबर आहे. भटक्यांना नागरिकत्वाचे हक्क मिळण्यात त्या बलदंडांचे अनहित दडलेले आहे. स्थानिक धनदांडग्यांचे आश्रित म्हणूनच त्यांनी जगावे व सर्वांगीण शोषण मुकाट्याने सोसावे अशीच वृत्तपत्रांसह या सबंध व्यवस्थेची अपेक्षा असते. भटक्यांचे नागरी हक्क तुडवले जाण्याच्या प्रसंगाला वृत्तमूल्य ( न्यूज व्हॅल्यू ) तरी कुठे असते ? कारण एक तर ते बारा महिने चोवीस तास सुरूच असते. रोज मरे त्याला कोण रडे ? आणि दुसरे असे की पांढरपेशा वाचकांना बिनभिकाऱ्यांच्या बाबतीत रस तरी कुठून असणार ? चार कंजारभट बायकांवर बलात्कार झाले, पंधरावीस पारध्यांची कत्तल झाली. एकठसके मध्यमवर्गीय वृत्तपत्रवाचक थोडेच हळहळणार आहेत ! त्यांच्या मते, न्याय, समता स्वावलंबन वगैरे गोष्टी भटक्या विमुक्तांसाठी नाहीतच !

राज्यसंस्थेपासून तुटलेल्या अवस्थेतच भटके लोक आपला चरितार्थ पूर्वापार चालवित आले आहेत. ते राज्य हिंदूंचे असो, मुसलमानांचे, ब्रिटिशांचे की स्वतंत्र भारतीयांच्या सार्वभौम संसदेचे वा मंत्रिमंडळाचे असो भटक्या विमुक्तांचे वेगळे स्वायत्त सामुहिक अस्तित्व कायम राहिल्याचेच इतिहासात आढळते. त्यांचे जणू राज्यांतर्गत राज्यच असते ! बाहेरच्या कायद्यांमुळे त्यांच्यावर निर्बंध पडत असले तरी त्यांचे लाभ मात्र त्यांच्या पदरात कधी पडत नाहीत. उलट 'कायम सुव्यवस्था' ही संकल्पना नेहमी त्यांच्या बोकांडीच बसत आली आहे. त्याबाबतीत स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळ हे वर्गीकरणही या लोकांच्या संदर्भात पूर्णपणे निरर्थक आहे. स्थिरावलेल्या समाजगटांपेक्षा ते भौतिक सांस्कृतिकदृष्ट्या इतके मूलतः निराळ्या पातळीवर जगत आले आहेत की त्यांना सामावून घेणे जातीव्यवस्थेला चिरंतन समजणाऱ्या या पुरातन समाजाला कधीच साध्य होणे शक्य नाही.

## मानवशास्त्रीय दृष्टिकोनाची आवश्यकता

राज्यकर्ते, नोकरशाही, विद्यापीठीय पंडित, सांस्कृतिक ठेकेदारी वा शारीरिक पातळीवर त्यांच्या अब्रूची व श्रम शक्तीची लूट करणारे– या सर्वांचे सोडा पण ज्यांना भटक्या विमुक्तांबद्दल आंतरिक कळकळ वाटते आणि त्याची आजची अमानुष अवस्था संपावी असे मनापासून वाटते त्यांचीही स्थिती अजून किंकर्तव्यतेच्या कोंडीतून बाहेर पडलेली दिसत नाही. काही परिषदा, काही संघटना, काही नियतकालिके वा पुस्तके हे उपक्रम निश्चितच स्वागतार्ह आहेत पण अजून बरेच काही करावे लागणार आहे. संबंधित सद्हेतूप्रेरितांसाठीच प्रस्तुत लेखाच्या यापुढील परिच्छेदांचा प्रपंच करीत आहे. भटक्यांमधील निष्ठावंत कार्यकर्त्यांनी मानवशास्त्रीय दृष्टीकोन जोपासण्याची नितांत आवश्यकता आहे हे सांगण्याचा हेतू या लेखनामागे आहे.

मानवशास्त्रानुसार भटक्या जनजातीची आपली स्वतंत्र राजकीय प्रणाली, न्यायव्यवस्था व प्रशासनयंत्रणा असते. राज्यसत्तेशी ती समांतर असते तिथे नागरिकत्व वंशाधिष्ठित असते आणि नागरिकत्वाचे हक्क– तसेच सार्वजनिक व्यवहारातील वाटा ज्याच्या त्याच्या समूहातल्या स्तरीकरणातील स्थानावरून ठरतात. वयाचे ज्येष्ठकनिष्ठत्व, जादुई वा धार्मिक विशेषाधिकार व मालमत्ता यावर प्रत्येकाची प्रतिष्ठा अवलंबून असते. समाजाचे स्तरीकरण उतरंडवजा असले तरी त्याची उतरंड संरचनात्मक असण्यापेक्षा संबंधात्मक आढळते. समुहाचे ऐक्य, अभंगत्व आणि अंतर्गत व्यवहारांचे सौदर्य टिकून रहावे यासाठी परंपरागत रूढी, कर्मकांड, संकेत, वा वर्तननिर्बंध स्त्रीपुरुषांसाठी घालून दिलेले असतात आणि ते कटाक्षाने पाळले जातील असा बंदोबस्त असतो. सामुदायिक पंचायतीचे अधिकार समुहापुरते सर्वश्रेष्ठ असतात.

समूहांतर्गत राजकीय जीवन व शासकीय सत्ता संकीर्ण व विखुरलेली असते आणि फक्त प्रसंगोपात्तच ती प्रत्ययकारी होत असते. वरकरणी कौटुंबिक, धार्मिक वाटणाऱ्या कित्येक प्रसंगांना महत्त्वाचे राजकीय संदर्भ असतात. त्याखेरीज विशेषतः स्पर्धात्मक प्रसंगांमधूनही राजकीय संबंधाचे स्वरूप व्यवस्थापरिवर्तनात्मक उठावांचे सहसा कधीच असत नाही, आहे त्या समाज घटकांच्या आंतरसंबंधाची फेरमांडणी करवून घेण्याइतपतच ते सीमित असते. टोळ्यांचे युतीविग्रह वा नेतृत्वबदल एवढेच त्यातून निष्पन्न होत असते.

प्रत्येक भटक्या जमातीची स्वतःची अशी मिथके (मिथ्स) असून त्या मिथकांच्या द्वारे जमातीच्या सदस्यांचे हक्क व अधिकार क्षेत्रे निर्धारित होत असतात. जमातीचे नियम करणारे व परंपरा टिकवून ठेवणारे नायक किंवा मुखिया यांना प्रचलित व्यवस्था टिकवण्यासाठी मिथके उपयुक्त ठरतात. अस्तित्वात असलेल्या समाजसंरचनेला

समर्थित करणारा तो सामाजिक जाहीरनामाच असतो. ( मॉलिनोव्हस्की ). प्रत्येक समूहाची एक विशिष्ट संस्कृती असते. संस्कृतीच्या अनेक व्याख्या मानवशास्त्रज्ञांनी केल्या असल्या तरी स्थूल मानाने असे म्हणता येईल की, इतिहासनिर्मित अशी जगण्याची जी विवेकी, अविवेकी वा विवेकविरहित पण सर्वमान्य व्यवस्था विशिष्ट काळी, विशिष्ट समुहात अस्तित्वात असते व सदस्यांच्या वर्तनाला दिशा देत असते ती त्या समुहाची संस्कृती होय. प्रत्येक जमातीची बहुधा आपली काही कुलचिन्हे, स्वतंत्र दैवते, पूर्वजपूजेचे वा नैसर्गिक शक्तींच्या उपासनेच्या विधीही असतात.

आपल्याकडे भटक्याविमुक्त जमातींचे राजकीय अंगाने फारसे अभ्यासच अजून झालेले नाहीत. किंबहुना भारतीय मानवशास्त्राने या जमातींकडे पुरेसे लक्षच आजतागायत दिलेले नाही. त्यांच्या प्रश्नांचा मानवशास्त्रीय विचार केल्यास ते प्रश्न सोडविणे तर सुकर होईलच पण मानवशास्त्रही त्यातून समृद्ध होणार आहे.

## ब्रिटीशांचे धोरण

भटक्या विमुक्त जमातींपैकी तथाकथित गुन्हेगार जमातींचा जरी स्वातंत्र्याच्या संदर्भात विचार करायचा तर असे म्हणता येईल की ब्रिटिश अमदानीत 'पॅक्स ब्रिटानिका'च्या निमित्ताने १८७१ चा गुन्हेगार जनजाती अधिनियम मंजूर केला गेला होता. या जमातींवर व त्यांच्या हालचालींवर बारीक नजर ठेवणे, काही सेटलमेंटस उभारून त्यांना सुधारण्याची व त्यांच्या पुनर्वसनाची व्यवस्था करणे इ. हेतू त्यामागे होते. पुढे अनेक कायदे झाले, त्यात विशोधने झाली, तरी पण त्यांचे यश मर्यादितच राहिले.

## स्वातंत्र्योत्तर काळातील धोरण

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक समित्यांनी त्यांच्या प्रश्नाचा अभ्यास केला. जन्मावरून कुलालाही गुन्हेगार ठरवणे आणि दुरुस्तीपलीकडचा ठरवून निकालात काढणे ही आधीच्या अधिनियमांची चूक पुन्हा केली जाऊ नये म्हणून 'गुन्हेगार' हे कलंकसदृश विशेषण काढून टाकण्याचा रास्त निर्णय घेतला गेला. रास्त यासाठी की त्या विशेषणाचे जे मानसिक, सामाजिक दुष्परिणाम संबंधित जमातींवर व ( विशेषतः लहान मुलांच्या संस्कारक्षम मनावर ) एकूण समाजावर होत होते ते अतिभयंकर होते. १९४९ साली जेव्हा तो कायदा रद्द करण्यात आला त्यानंतर मात्र कायद्याची राबवणूक करणाऱ्या पोलिसखात्याला पोकळी जाणवू लागली. गुन्हेगारांचे रजिस्टर ठेवण्यासाठी म्हणे त्यांना तसा कायदा आवश्यकच होता. शेवटी १९५२ मध्ये सराईत गुन्हेगार कायदा मंजूर करण्यात आला आणि भटक्या विमुक्तांचे स्वातंत्र्य पुन्हा एकवार गहाण पडले. 'ऐतिहासिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक वगैरे कारणांनी गुन्हाप्रवृत्त होण्याची त्यांच्याबाबत शक्यता असेल' अशावर ( पोलिसांच्या दृष्टीने याचा सरळसोट अर्थ : भटक्याविमुक्तांवर ) कडक निगराणी ठेवण्याचा अधिकार या कायद्याने प्राप्त झाला.

वस्तुतः एखाद्या टोळीत जन्मणारे सर्व स्त्री-पुरुष गुन्हेगार निपजत असतील तर त्यासाठी अनुवंशापेक्षा त्या टोळीचा इतिहास, आर्थिक परिस्थिती आणि बाह्य समाजाशी तिचे असलेले संबंध अशा त्रिविध बाजूंनी प्रश्नाचा विचार करावा लागेल. रेशमाच्या गाठी जशा हडेलहप्पी करून सुटत नाहीत तर हळुवार हाताने व डोक्यानेच सोडवता येतात, त्याचप्रमाणे भटक्यांमधील गुन्हेगारीचे निर्मूलनही समग्र विचार करण्यातूनच घडून येऊ शकेल. सत्ताधाऱ्यांचा दृष्टिकोन बहुधा दंडेली—दहशत वापरून गुन्हेगारी नियंत्रित करण्याचा असतो. वस्तुतः या उपायांची पूर्तता इतक्या वर्षांपासूनच्या अनुभवाने स्पष्ट झाली आहे. तरीही राज्यकर्त्यांना आपले मार्ग बदलण्याची आवश्यकता व शक्यता जाणवत नाही. जे राज्यकर्त्यांना विचार करण्यास भाग पाडू शकतात त्यांनाही भटक्यांच्या गुन्हेगारीचे यथार्थ आकलन झाले असल्याचे आढळत नाही.

## उपलब्ध अभ्यासाच्या मर्यादा

भटक्या विमुक्तांसंबंधी जी काही तुटपुंजी अध्ययने झाली आहेत त्यांचा रोख त्या जनजातींच्या वर्तमानावरच असल्याचे दिसते. भटक्यांचा परिसर, राहणीमान, वेषभूषा, खाद्यपान सवयी, हत्यारे-औजारे-वाद्ये, उपजीविकेचे मार्ग, छंद, कला, संगीत, भाषा, विवाहपद्धती, भ्रमणमार्ग इत्यादी तपशीलांचे वर्णनपर संकलन असेच एकंदरीत या अध्ययनांचे स्वरूप रहात आले आहे. किमान कार्यकर्त्यांनी यापेक्षा अधिक खोलवर जाऊन तपास करण्याची गरज आहे.

भटके आज आहेत तसे ते असण्यासाठी जो ऐतिहासिक विकासक्रम कारणीभूत झाला त्याचा सखोल व सप्रमाण आढावा घेतला जाणे अगत्याचे आहे. पुन्हा गुन्हेगार जमातींबद्दल बोलायचे तर प्रत्येकीचा गुन्हेगारीप्रवृत्त होण्याचा विशिष्ट इतिहास आहे. बृहत्तर समाजाचे समायोजन करण्याचे ज्यांचे प्रयत्न विकल झाले वा केले गेले, आणि ज्यांची मुळे कुठेच रुजू शकली नाहीत अशा या टोळ्यांना आर्थिक ओढगस्तीने वा सामाजिक बहिष्कृतीपोटी

गुन्हाप्रवृत्त केले, पुढे तीच त्यांची सवय झाली, जन्मणाऱ्या मुलांचे संगोपनच त्या पद्धतीने होत राहिले असे एक स्पष्टीकरण सामान्यतः दिले जाते.

काही मानवशास्त्रज्ञ मात्र असेही मानतात की, काही कथित गुन्हेगार जमातीचे पूर्वज राजघराण्यात होते. कुठल्याशा गुन्ह्यासाठी त्यांना विजनवासात जाणे भाग पडले. पुढे लोकापवाद टाळण्यासाठी त्यांनी गावोगाव भ्रमंती पत्करली. आपल्यावरच्या या छळाचा सूड घेण्यासाठी ते आणखी गुन्हे करू लागले. राजस्थानच्या गुन्हेगार जमातींविषयी अशा अनेक आख्यायिका आहेत. पराभवानंतर एकाच जागी न राहण्याचा निर्धार केलेल्या महाराणा प्रतापांचे ते स्वतःला वारसदार समजतात. काही जमातींचे पारंपरिक व्यवसाय व उदरभरणाची साधने बुडाल्यामुळे त्या गुन्हेगारीकडे वळल्या असतील. काही कौटुंबिक वातावरणामुळेही त्या वाटेला गेल्या असणे शक्य आहे.

## सबघोडे बाराटक्के

इत्यर्थ असा की इंग्रज राज्यकर्त्यांनी खास त्यांच्या 'सब घोडे बारा टक्के' न्यायाने सर्व गुन्हेगार जमातीना एकाच मापाने मोजून दडपले असले वा एकाच धोपट मार्गाने त्यांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न केला असला तरी स्वतंत्र भारताच्या स्वकीय राज्यकर्त्यांनी तरी प्रत्येक टोळीचे स्वतंत्रपणे विश्लेषण, मूल्यमापन करून तिच्या इतिहास संस्कृती जीवनसरणीच्या अनुषंगाने गुन्हेगारी नियंत्रक व पुनर्वसन यांची आखणी करायला पाहिजे. कार्यकर्त्यांनी त्या दृष्टीने राज्यकर्त्यांसमोर पूर्ण इतिहासानिशी एकेक जमातीचे चित्र ठेवायला हवे.

त्याचबरोबर कथित गुन्हेगारांच्या गुन्हेगारीसाठी प्रतिष्ठित समाजातले जे घटक कारणीभूत ठरतात त्यांचाही समाचार घेतला पाहिजे. आज तो फारसा घेतला जात नाही. रात्रीबेरात्री निरपराध बिनभिकारांना पकडून पोलिस चौकीत डांबणारा व बेदम मारणारा हवालदार, फौजदार ह्या एकापरीने त्यांच्यातील गुन्हेगारी प्रवृत्ती अधिक बळकट करण्यासच कारण ठरत असते. गुन्हेगारपणाचा कलंक कपाळावर कायम कोरल्यामुळे अख्खा समाज त्यांच्याकडे पूर्वग्रहदूषित नजरेने पहात असतो. त्यांना गुन्हेगार समजूनच त्यांच्याशी वागतो. ते दुरुस्त होणेच अशक्य असल्यामुळे शासनाइतकेच, औदासिन्य त्याच्याही ठिकाणी या जमातींच्या पुनर्वसनाच्या रचनात्मक योजना आखण्यांबाबत आढळते. औपचारिक सहानुभूतीपलीकडे समाजधुरिणांच्या सहानुभूती फारशा जात नाहीत.

## प्रतिष्ठितांकडून भटक्यांचा स्वार्थासाठी वापर

काही राजकीय–आर्थिक–सामाजिक दृष्ट्या वरचढ गट तर असेही असतात की या जनजातींनी गुन्हेगार राहाण्यातच त्या गटांचे हितसंबंध गुंतलेले असतात. या जमातींच्या लोकांना केव्हाही भाडोत्री म्हणून वापरून प्रतिपक्षाचे नुकसान आणि प्रसंगी खूनसुद्धा करवून घेणे त्यांना शक्य होते. गुन्हा करताना सापडलेच तरी प्रतिष्ठितांचे काहीच जात नाही कारण त्यांचे नाव भटक्यांच्या तोंडून फुटण्याची सुतराम शक्यता नसते.

मानवत हत्याकांडातील प्रत्यक्ष खुन्यांना फासावर जावे लागले तरी सूत्रधारांना मात्र पुराव्याअभावी नामानिराळे राहता आले, हे प्रकरण तसे प्रातिनिधिकच म्हणावे लागेल. सरकारी भ्रष्ट अधिकारीही गुन्हेगारी टोळ्यांची गुन्हेगारी पद्धतशीरपणे जोपाशीत असतात. चोरीदरोड्यामधील तसेच रासगुण्यांमधील त्यांच्या प्राप्तीत हे सहभागी होतात. गुन्हेगारीची ही सर्व मुळे छाटली तरच तिचा बंदोबस्त होऊ शकेल.

## मातृभाषेतून शिक्षण हवे

गुन्हेगार न ठरवल्या गेलेल्या जनजातींच्याही पुनर्वसनाचा प्रयत्न असा समग्र विचार करूनच करावा लागेल. नुसत्या आश्रमशाळा काढून त्यांच्या शिक्षणविषयक समस्या सुटणार नाहीत तर भटक्या विमुक्तांच्या मुलासाठी भटक्या शाळा काढून त्यांच्याद्वारे भटक्यांच्या मातृभाषेतून किमान प्राथमिक पातळीपर्यंतचे शिक्षण त्या त्या भाषेतील पाठ्यपुस्तकांसह उपलब्ध करवून द्यावे लागेल. आकाराने बऱ्याच मोठ्या असलेल्या जनजातींनाही आज ही सोय उपलब्ध नाही. 'मातृभाषेतून शिक्षण प्रभावी होते.' हा जागतिक मान्यता लाभलेला सिद्धांत जणू या जमातींना लागूच नाही. भटक्यांच्या अनुभवविश्वाशी सुसंवादी पाठच पाठ्यपुस्तकांतून आणले जाणे ही तितकेच अगत्याचे आहे.

अन्यायग्रस्त भटके न्याय मिळवण्यासाठी जिल्ह्याच्या गावी मामलेदार कचेरीत येऊन दादफिर्याद करतील ही शक्यताच अनेक कारणांनी नसल्यामुळे ते आज न्यायवंचितच राहातात. सतत बदलणारी गावे, बलदंडांचे दडपण व दहशत, प्रदीर्घ अंतरे, खर्चिक प्रवास, दारिद्र्य, अज्ञान इत्यादी असंख्य अडचणींवर मात करणे भटक्या विमुक्तांसाठी केवळ अशक्य असते. त्यांच्यासाठी फिरत्या अधिकाऱ्यांचीच नेमणूक करण्याची मागणी केली गेली

[ पान ४० वर पहा ]

# जिप्सी : स्मृतीआड गेलेली भारताची लेकरे

**लता बापट**

मानवशास्त्र विभाग,
पुणे विद्यापीठ

भारतामध्ये उपजिविकेसाठी भटकंती करणाऱ्या भारतीय भटक्यांबद्दल आपण नेहमीच वाचत आणि ऐकत असतो. परंतु भारताबाहेर असणाऱ्या भारतीय भटक्यांबद्दल आपल्यापैकी फारच थोड्यांना माहिती असेल. भारता बाहेरही मूळचे भारतीय भटके हे भटकतच आहेत. जिप्सी हे भारताबाहेर भटकणाऱ्या अनेक भारतीय भटक्यांपैकी एक होत. प्रस्तुत लेखात जिप्सी समाजाच्या चालीरीती, संस्कृती रूढीपरंपरा आणि त्यांचा धर्म ह्यांचा विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

जिप्सी हे मूळचे आर्यवंशातील असून ते भारतातील पंजाब, सिंध, सौराष्ट्र, रजपुताना माळवा वगैरे भागांतून युरोप आणि अमेरिकामध्ये भटकत, भटकत गेले. सध्या आपल्याला त्याची वस्ती युगोस्लाव्हिया, बल्गेरिया, हंगेरी झेकोस्लाव्हिया, फ्रान्स, जर्मन, इंग्लंड, रशिया इत्यादी ठिकाणी आढळते.

## जिप्सींच्या स्थलांतरासंबंधी काही मते :

हे जरी मूळचे भारतातील असले तरी ते भारताबाहेर का गेले असावेत ह्याबाबत वेगवेगळया विचारवंतांची वेगवेगळी मते आहेत. 'द स्टोरी ऑफ दि जिप्सिज्' ह्या पुस्तकाच्या लेखकाच्या मतानुसार अलेक्झांडरने भारतावर स्वारी केली त्या सुमारास भारतातून स्थलांतर झाले. गिरसन आणि इतर ब्रिटिश विद्वानांच्या मतानुसार गझनीच्या महंमदाने भारतावर ज्या सतरा स्वाऱ्या केल्या तेव्हा त्याने जाट आणि रजपूत सैनिकांपैकी अनेक सैनिक आणि पंजाब, गुजराथ, सिंध, राजपूताना इत्यादी प्रांतातील तसेच इराणमधील हजारो नागरिक गुलाम म्हणून नेले. परंतु ह्या हजारो गुलामांपैकी रंगाने गोरे नव्हते त्यांना त्याने मुक्त केले व मुक्त झालेले, गुलाम युरोपमध्ये गेले. फिरदोशीच्या मतानुसार इराणचा राजा बेहराम गुरू ह्याने पूर्वभारताचा राजा 'शंखल' ह्याच्याकडे वीस हजार संगीतकारांची राष्ट्रीय उत्सवासाठी मागणी केली. तेव्हा 'शंखल' राजाने इराणच्या राजाकडे वीस हजार संगीतकार म्हणून जिप्सींना पाठविले. ह्या संगीतकारांवर खूष होऊन इराणच्या राजाने त्यांना धान्य आणि काही जमिनी भेट म्हणून दिल्या. परंतु हाडाच्या ह्या संगीतकारांना जमीन कसताही आली नाही आणि धान्य साठवताही आले नाही. तेव्हा इराणचा राजा चिडला व त्याने त्या संगीतकारांना राज्यातून हाकलून दिले. हाकलून दिलेले हे संगीतकारनंतर इजिप्त आणि इराकमार्गे युरोपमध्ये आले.

## हिन्दु संस्कृतीशी साम्य :

जिप्सी हे मूळचे आर्यवंशीय असून त्यांची भाषा रोमनी आहे. आज जरी ह्या जिप्सींना भारतातून स्थलांतर करून अनेक शतके झाली असली तरी त्यांची ही रोमनी भाषा पंजाबी, हिन्दी आणि संस्कृत ह्या भारतीय भाषांशी बरीच मिळतीजुळती आहे असे भाषातज्ज्ञांचे मत आहे. एक, दु, त्रिन, पंच इत्यादी रोमनी भाषेतील शब्द हे हिन्दीतील एक, दो, तीन, पाँच ह्यांच्याशी साम्य दाखवितात तर प्रथम दिवस, द्वितीय दिवस इत्यादी रोमनी शब्द संस्कृत भाषेशी साम्य दाखवितात. ह्या रोमनी आणि भारतीय भाषा साम्याव्यतिरिक्त जिप्सींचे रीतिरिवाज, रूढीपरंपरा ह्या हिन्दूंच्या रीतिरिवाजांशी आणि रूढीपरंपरांशी दाखवितात. स्त्री आपला पती निवडते. तसेच लग्नप्रसंगी वधूवर एकमेकांच्या डोक्यावर अक्षता टाकतात. भारतीयांप्रमाणेच ते मृत व्यक्तीचे श्राद्ध करतात. भारतीयांइतकीच त्यांची श्रीकृष्ण आणि अर्जुन ह्यांच्यावर श्रद्धा, भक्ती, प्रेम आणि आदर आहे. त्यांच्यापैकी अनेकजण रामायणची पारायणेही करतात.

## जिप्सींचे वेगळेपण :

जिप्सींची संस्कृती, रूढीपरंपरा आणि रीतिरिवाज हे बऱ्याच अंशी हिन्दुसंस्कृतीशी मिळते जुळते असे असले तरी त्यांची स्वतःची अशी संस्कृती, परंपरा, श्रद्धा, विश्वास राजकीय संघटना, सामाजिक जीवन, नीतिनियम, कायदे इत्यादी आहेत की ज्यामुळे त्यांच्या संस्कृतीचे वेगळेपण उठून दिसते. उदा. मानवनिर्मिती आणि वंशविविधता का व कशी निर्माण झाली ह्याची एक मजेशीर गोष्ट ते सांगतात मनुष्यप्राण्याचा पृथ्वीतलावर प्रसार व्हावा म्हणून परमेश्वराने अगदी सुरुवातीला काही स्त्री-पुरुषांना घडविले.

त्यांचे साचे बनविताना त्याने पहिल्यांदा जे जोडपे भट्टीत ठेवले ते चुकून जास्त काळ आत राहिले आणि म्हणूनच ते अगदी काळे होऊन बाहेर आले. चूक सुधारायची म्हणून पुढच्यावेळेस परमेश्वराने भट्टीचे दार जरा लवकरच उघडले. त्यामुळे जो साचा तयार झाला तो पांढराफटक निघाला. फसलेल्या ह्या दोन प्रयत्नांनंतर मात्र तिसऱ्या वेळेस जेव्हा परमेश्वराने परत साचा भट्टीत टाकला तेव्हा मात्र भाजण्यासाठी नेमका व पुरेसा वेळ दिल्यामुळे त्या साच्याचा रंग योग्य आणि त्याला पाहिजे होता तसा तयार झाला. पहिल्या साच्यातून पुढे कृष्णवंशाची तर दुसऱ्या साच्यातून गोऱ्यापान वंशाची-प्रजा तयार झाली. तिसऱ्या साच्यातून जिप्सींचे पूर्वज म्हणजेच तेव्हाचे भारतीय निर्माण झाले.

## जिप्सींची धार्मिकता :

जिप्सींच्या धर्मामध्ये त्यांचे देव तसेच त्यांच्या जन्म-मृत्यूसंबंधीच्या कल्पना आणि आत्म्याबद्दलचे विचार ह्यांचा समावेश होतो.

जिप्सी श्रीकृष्णाला मानत असले तरी ते एकदेववादी आहेत. भूदेवी हेच त्यांचे एकमेव दैवत आहे. त्यांच्या-मतानुसार ह्या बदलत्या, अस्थिर जगामध्ये भूदेवी हीच केवळ अचल, पवित्र आणि अंतिम सत्य आहे. हिन्दू संस्कृतीत ह्या देवतेला धरतीमाता म्हणून संबोधले जाते. ते चंद्राचीही उपासना करतात. संध्याकाळी चंद्र उगवतो तेव्हा ते स्वतःची टोपी काढून त्याला वंदन करतात आणि प्रार्थना म्हणतात. मनुष्य हा परमेश्वराशी बोलू शकतो ह्याच्यावर त्यांचा विश्वास आहे. मनुष्याचा परमेश्वराशी होणारा संवाद ह्या कल्पनेचा त्यांच्या लोकसंगीतात नेहमीच उल्लेख असतो. मनुष्य आपल्या कर्मानुसार फळे भोगतो आणि दुसरा जन्म घेतो. हाती घेतलेले काम तडीस जावे आणि नेहमी यशप्राप्ती व्हावी म्हणून हे लोक उपास करतात.

जगामध्ये चांगल्या आणि वाईट शक्ती असतात आणि ह्या शक्तींवर 'मुरजा' ह्या देवाचे स्वामित्व असते असे ते मानतात. एखाद्या जिप्सीने जर वाईट कृत्य केले तर त्याच्यावर वाईट शक्तीचे आणि चांगले कृत्य केले तर तिच्यावर चांगल्या शक्तीचे नियंत्रण असते, असे समजले जाते. तसेच एखाद्या तरुणाचा अचानक मृत्यू झाला तर त्याला वाईट शक्तींनी ओढून नेले असे मानले जाते. जिप्सी धर्मामध्ये आत्म्याला महत्त्वाचे स्थान आहे. आत्मा अमर आहे असे ते मानतात. मृत्यूनंतर आत्मा आपल्या कर्मा-नुसार जन्म घेतो असा त्यांचा समज आहे. जन्म-मृत्यू समयी करण्याचे काही विधी आणि समज प्रचलित आहेत*

त्यांच्यामतानुसार बंद खोलीतील बालकाचा जन्म निषिद्ध असतो. कारण त्या खोलीमध्ये अनेक दुष्ट आणि वाईट शक्ती असण्याचा संभव असतो. म्हणून जिप्सी स्त्रिया आपल्या मुलांना जन्म मोकळ्या जागेत किंवा जिप्सी-व्यतिरिक्त लोकांच्या घरात देतात. बाळाच्या जन्मानंतर माता पुनः आपल्या घरी परत येते तेव्हा त्या घरात अनेक पौष्टिक पदार्थ मांडून ठेवलेले असतात. तसेच दीप प्रज्वलित करण्यामागचा त्यांचा हेतू असा की ज्याप्रमाणे दीपामुळे अंधार नाहीसा होतो त्याचप्रमाणे वाईट शक्तीही नाहीशा होतात. घरात दीप प्रज्वलित केल्यामुळे ह्या दुष्ट शक्ती पळून जातात आणि बाळाला संरक्षण मिळते. घरामध्ये पौष्टिक पदार्थ मांडले जातात कारण नव्या बाळाला भेटा-यला अनेक पऱ्या येतात. त्या पऱ्यांमध्ये काही वाईटही पऱ्या असतात. ह्या वाईट करू नये तसेच त्याचे काही अनिष्ट करू नये म्हणून पौष्टिक पदार्थांचा नैवेद्य दाखवून त्यांना प्रसन्न केले जाते.

स्त्री ही बाळाला जन्म देईपर्यंत अपवित्र असते परंतु ती जेव्हा बाळाला जन्म देऊन घरी येते तेव्हा पुन्हा शुद्ध व पवित्र होते. असे असले तरी बाळाच्या वडिलांना तिच्या खोलीत जाण्यासाठी बाळाच्या जन्मानंतर चाळीस दिवस-पर्यंत बंदी असते. बाळाला थंडी आणि उन्हापासून त्रास होऊ नये म्हणून जिप्सी लोक थंडीत बाळाला गार पाण्याने व उन्हाळ्यात त्याच्या अंगाला चरबी लावून आंघोळ घालतात.

मुलाच्या बारशाच्या वेळेसही बाळाला कोणत्या अनिष्ट शक्तीने त्रास देऊ नये म्हणून काही विधी केले जातात. विलीसकोच्कीच्या सांगण्यानुसार सुरुवातीला ब्रॅण्डी, पाणी आणि अद्भुत वनस्पती ह्यांचे मिश्रण केले जाते व ते बाळाच्या आसपास शिंपडले जाते. असे करण्याने वाईट शक्ती बाळाच्या आसपास फिरकू शकत नाहीत असा समज आहे. तसेच सटवाई देवीने बाळाला सौंदर्य आणि आनंदी जीवन द्यावे म्हणून तिच्यासाठी भाकरीचे तीन तुकडे तीन कोपऱ्यात ठेवले जातात. त्यानंतर बाळाला मैदानात ठेवले जाते व त्याच्याभोवती एक वर्तुळ काढले जाते. त्या वर्तुळावर कोळशाची व सापाची राख टाकली जाते. हे वर्तुळ भविष्यकाळातही आजारपणापासून बाळाचे संरक्षण करते असा समज आहे. बाळ वर्तुळात असताना जर रडले तर त्याच्या भविष्यकाळामधील आजारपणाचे सूचक लक्षण आहे, असे मानून त्या वर्तुळावर बाळाच्या नाळेचा तुकडा जाळला जातो. बाळाचा द्वेश करणाऱ्या

वाईट शक्तीना चिडविण्यासाठी छोटी छोटी मुले ह्या वर्तुळाभोवती फेर धरून नाचतात तसेच ह्या वाईट शक्तीसाठी शेंगा फेकतात.

जिप्सींमध्ये मृत्यू आणि मृत व्यक्तीचा आत्मा ह्यांच्याबद्दल अनेक भ्रामक समजुती आहेत. व्यक्तीच्या मृत्यूनंतरही त्यांचा आत्मा पुनः परत येऊन त्रास देण्याची शक्यता असते. तेव्हा त्या आत्म्याने परत येऊ नये म्हणून काही विधी केले जातात. मृत्यूनंतर प्रेताला खोलीतून बाहेर लांब नेले जाते असे केल्याने मृत व्यक्तीच्या आत्म्याला परत येण्याचा मार्ग सापडत नाही आणि त्यामुळे तो पुन्हा परत येऊ शकत नाही. तसेच मृत व्यक्ती परत येऊ नये म्हणून त्या व्यक्तीचे नावही घरातील एखाद्या व्यक्तीला ठेवत नाहीत. व्यक्ती जिवंत असताना ती वापरत असलेली प्रत्येक वस्तू, व्यक्तीच्या मृत्यूनंतर जाळली जाते. असे करण्यामागे त्यांचे उद्देश दोन; एक तर मृत व्यक्तीच्या आत्म्याने त्या वस्तूंच्या लोभापायी परत येऊ नये आणि दुसरे म्हणजे व्यक्तीने मेल्यानंतरही त्या वस्तूंचा उपभोग घ्यावा.

मरणपंथाला लागलेल्या व्यक्तीला सुखकर मृत्यू यावा म्हणून ते एक पांढरे कुत्रे बनवितात व त्या कुत्र्याला त्या व्यक्तीच्या शरीराला चाटायला लावतात. असे केल्याने व्यक्तीला मृत्यू सुखकर येतो असा समज आहे.

मृत व्यक्तीचा देह गांवापासून दूर अशा मोकळ्या जागेत, उघड्या पेटीमध्ये पुरला जातो. ह्या पेटीमध्ये बाजूला मृत व्यक्तीच्या आत्म्यासाठी अन्न आणि त्याच्या आवडीच्या वस्तू ठेवल्या जातात. ब्लॉक ह्या लेखकाच्या म्हणण्यानुसार मृत व्यक्तीला पुरण्यापूर्वी त्यांची करंगळी तोडली जाते आणि त्या जागी एक नाणे लाल धाग्याने जोडले जाते. मृत्यूनंतरच्या प्रवासात जर त्या व्यक्तीला काही खर्च आला तर त्या नाण्याचा उपयोग ती मृत व्यक्ती करू शकते.

## लग्नपद्धती :

जिप्सींमध्ये पितृसत्ताक पद्धती प्रचलित आहे. घरातील प्रत्येक निर्णय वडील घेत असतात. एवढेच नाही तर मुलींच्या पतीची निवडही वडिलांच्या निर्णयावर अवलंबून असते. अर्थात काही ठिकाणी अपवादाने आईचाही सल्ला ह्याबाबत घेतला जातो.

त्यांच्यामध्ये अनेकदा मुलांचे विवाह हे त्यांच्या लहानपणीच ठरतात असे करण्यामागचे कारण म्हणजे अस्तित्वात असलेली वधूमूल्य पद्धती. लहानवयात लग्न ठरविल्यामुळे वधूमूल्याचा आंकडा कमी असतो.

जिप्सीमध्ये एकपत्नी किंवा एकपती हा नियम आहे. अनेक पत्नी किंवा अनेक पती असणे हा अपवाद आहे. अनेक पत्नी पद्धती ही मातृसत्ताक तसेच पितृसत्ताक पद्धतीमध्येही आढळते. अनेकपत्नी पद्धती अस्तित्वात असण्याची कारणे अनेक आहेत, एक म्हणजे अशा पद्धतीमुळे व्यक्तीला समाजात मान प्रतिष्ठा मिळते. तसेच मिळवत्या स्त्रियांमुळे व्यक्तीच्या संपत्तीत भर पडते ह्याशिवाय म्हातारपणी मुलांचे प्रेमही मिळते. ह्या आणि अशा प्रकारच्या कारणांमुळे जिप्सींमध्ये अनेकपत्नी पद्धती लोकप्रिय आहे. असे असले तरी बहुभार्या पद्धती क्वचितच प्रचलित दिसते ह्याचे कारण म्हणजे जिप्सीमध्ये असलेली वधूमूल्य पद्धती. विवाहामध्ये मुलाच्या वडीलांना वधुच्या वडीलांना काही रक्कम हुंडा म्हणून द्यायची असते. जिप्सी पैशाने अतिशय गरीब असल्यामुळे असा हुंडा वरचेवर देणे त्यांना शक्य नसते आणि म्हणूनच त्यांच्यामध्ये बहुभार्यापद्धती क्वचितच दिसले.

सर्वसाधारणपणे वडील वाङ्मयनिश्चय पक्का करतात ह्या प्रसंगी वधूमूल्य देऊन वधु विकत घेतली जाते. वधुमूल्य हे लग्नापूर्वीच द्यावे लागते. काहीवेळेस लग्नानंर ठरावीक मुदतीने ते परत करावे लागते. जर ठरावीक मुदतीने ते परत करावे लागते. जर ठरावीक मुदतीत ते परत केले नाही तर वधूला पुन्हा तिच्या आई वडिलांकडे परत करावी लागते किंवा ते जोडपेच पळविले जाते.

वाङ्निश्चय साजरा करण्याचे विशिष्ठ रीतिरिवाज आणि रूढीपरंपरा आहेत. एखाद्या तरुणाला एखादी मुलगी आवडली असेल तर तो त्याची आवड मित्राला बोलून दाखवितो आणि त्या मित्राकडून पसंतीची पावती घेतो. जर त्या मित्राला सुद्धा ती मुलगी पसंत असेल तर तो मित्र ते लग्न होण्यास हरकत नाही हे जाहीर करतो. नंतर तो मुलगा त्या मुलीला डोक्याला बांधावयाचा रुमाल देतो. जर तिला तो मुलगा नवरा म्हणून पसंत असेल तर ती तो रुमाल लगेचच डोक्याला बांधते. अशा तऱ्हेने त्या मुलीची संमती घेतल्यावर तो तिच्या आईवडिलांशी चर्चा करतो आणि वाङ्मयमूल्य ठरविती. त्यानंतर वर वधूला चांदीची अंगठी देतो व अशा तऱ्हेने वाङ्निश्चयावर शिक्कामोर्तब होते.

त्यांच्यामध्ये लग्नाची तयारी अनेक पद्धतीने केली जाते. बिलिस्लोकीच्या सांगण्यानुसार वाङ्मयनिश्चयविधी हा लग्नसमारंभापूर्वी आठदिवस आधी नदीच्या किनाऱ्यावर रात्रीच्या वेळेस होतो. तेथे नदीच्या किनाऱ्यावर दोन मेणबत्त्या लावल्या जातात. जर वाऱ्याने त्यातील एक मेणबत्ती विझली तर तो अपशकुन समजला जातो. हा

अपशकुन जाऊन इडापिडा टळावी म्हणून ते नदीमध्ये काही अंडी आणि सफरचंदे फेकतात. त्यानंतर घरी येऊन ते लग्नाच्या पुढच्या तयारीला लागतात.

नवरदेव नंतर वाजंत्री वगैरे घेऊन आपल्या मित्र-मंडळींना लग्नासाठी मदत करण्याचे आमंत्रण देण्यासाठी जातो. हे आमंत्रण तो नाचत गात देतो. काही ठिकाणी अशा प्रकारचे आमंत्रण देण्यासाठी एका विशिष्ट व्यक्तीची नियुक्ती केलेली असते.

लग्नाच्या दिवशी सगळे निमंत्रित वधूच्या तंबूत जमतात आणि त्यांच्याकडून वधू भेटवस्तू स्वीकारते. त्यानंतर वधू मोठ्या लोकांचे आशीर्वाद घेऊन चर्चमध्ये इतर लोकांसमवेत जाते. चर्चमध्ये लग्न लावल्यानंतर धर्मगुरू वधूला भेटवस्तू देतो. घरी परत आल्यावर जोडप्याच्या अंगावर पाणी शिंपडले जाते व वाईट नजरा आणि अपशकून ह्यांच्यापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी सफरचंदच्या बिया त्यांच्या अंगावर उधळल्या जातात.

घटस्फोट घेणे हा प्रकार जरी जिप्सींमध्ये दुर्मिळ असला तरी घटस्फोट हा त्यांच्यात सहजपणे मिळतो. दीडशे वर्षांपूर्वी स्कॉटीश जिप्सी, घटस्फोट देण्यापूर्वी एक विधी करीत असत. ह्या प्रसंगी तेथे एक घोडा आणला जाई व त्या घोड्याच्या हालचालीवरून धर्मगुरू त्या स्त्रीला दोषी ठरवीत असत. असे करीत असताना जो घोडा आणला जाई त्याच्यावर स्त्रीने केलेल्या पापांचे आरोपण केले जाई व नंतर त्याचा बळी घेतला जाई. परंतु काहीवेळेस ती स्त्री दोषी असूनसुद्धा त्या निरपराध घोड्याचा बळी घेतला जाई. स्त्रीला घटस्फोट दिला आहे हे जाहीर झाल्यावर तिला एक बिल्ला दिला जाई आणि पुनर्विवाह करेपर्यंत तो बिल्ला जवळ बाळगण्याचे तिला बंधन असे. ह्या नियमाचे उल्लंघन केल्यास मृत्यूची शिक्षा दिली जाई.

**जिप्सींचे राजकीय जीवन :**

जिप्सींची स्वतःची अशी राजकीय संघटना आहे. ह्या संघटनेचे संपूर्ण जिप्सी समाजावर वर्चस्व असते. अनेक कायदेकानून ही संघटना करते आणि गुन्हेगाराला शिक्षा करते. त्यामुळेच जिप्सी समाजात नीतिनियमांचे पालन करण्यासाठी ह्या संघटनेचा महत्त्वाचा वाटा असतो.

त्यांचा स्वतःचा असा एक प्रमुख असतो. जमातीचा प्रमुख हा प्रमुख नेता, न्यायधीश आणि धर्मगुरू असतो. अंतिम सत्ता त्याच्या हातात असते. ह्या नेत्याला नक्षीकाम केलेला विशिष्ट पेहराव असतो. अनेक जिप्सी समाज म्हणजे छोटे छोटे, स्वतंत्र गटच असतात. हे सामाजिक गट पंचायत प्रमुखाच्या ( Voivod ) नेतृत्वाखाली असतात. व्यवहारात जिप्सींना मोठ्या प्रमाणात एकत्र राहाणे शक्य नसते म्हणूनच त्यांचे छोट्या-छोट्या स्वतंत्र, सार्वभौम जमातीत किंवा समाजात विभाजन झालेले असते. ह्या छोट्या जमातींना ' मलहिजी ' असे म्हणतात. ह्या छोट्या समाजाचा एक प्रमुख असतो त्याला ' स्कैबिड्सो ' म्हणतात. महत्त्वाच्या घटनांच्या संदर्भात हे समाजप्रमुख पंचायत प्रमुखाचा सल्ला घेतात. पंचायत प्रमुखाचा निर्णय अंतिम असतो. स्कैबिड्सोची निवड जिप्सी लोक लोकशाही पद्धतीने करतात. स्कैबिड्सोला सार्वजनिक जेवण आणि मीठ देऊन पंचायतप्रमुख त्या निवडीवर शिक्कमोर्तब करतो. मात्र पंचायतप्रमुखांची नेमणूक वंशपरंपरागत पद्धतीने ठरते. म्हणजेच पंचायत प्रमुखानंतर त्याचा मुलगा पंचायत प्रमुख बनतो. जमातीच्या प्रमुखाव्यतिरिक्त प्रत्येक सार्वभौम जिप्सिगटामध्ये जमातीची माता म्हणून एक वयोवृद्ध स्त्री असते. तिला ' फूरीदायी ' असे म्हणतात. ही माता जिप्सींच्या नैतिक कायद्यांचे पालन करते. ती सार्वजनिक स्थळी कधीच दिसत नाही पण तिचा प्रभाव जमाती प्रमुखाइतकाच असतो.

**जिप्सींचे नीतिनियम :**

समाजात राहात असताना एकमेकांशी कसे वागावे ह्याबाबत जिप्सींचे काही नीतिनियम आहेत. समाजातील माणसांशी खोटे बोलू नये, त्यांच्या संपत्तीवर दरोडा घालू नये तसेच वेळप्रसंगी एकमेकांना मदत करावी इत्यादी नियमांनी जिप्सी समाजात राहाणारा प्रत्येक जणू बांधील असतो. नियमबाह्य वर्तन करणारी व्यक्ती शिक्षेला पात्र असते. व्यक्तीने गुन्हा केलेला आहे हे अनेक व्यक्तींच्या साक्षीवरून ठरते. व्यक्तीने केलेल्या अनैतिक कृत्यांचा निवाडा जमातप्रमुख करीत असतो. दंड करणे, सक्तीने मजुरी करायला लावणे किंवा समाजातून बहिष्कृत करणे इत्यादी प्रकारच्या शिक्षा गुन्हेगार व्यक्तीला दिल्या जातात स्त्रियांनी केलेला व्यभिचार आणि बालेगुन्हेगारी ह्याबद्दल त्या व्यक्तीला समाजातून बहिष्कृत केले जाते. ह्या शिक्षा-व्यतिरिक्त चेहरा विद्रूप करणे, व्यक्तीच्या डोक्यावरील केस कापून टाकणे इत्यादी स्वरूपाच्या शिक्षाही दिल्या जातात.

अशा ह्या जिप्सींबद्दल सॅम्युअर रोबरटस लिहितो, ' ज्यांना देव खाऊपिऊ घालतो व ज्यांच्या काळजीचा सर्व भार वाहतो असे हे जिप्सी घर सोडून आकाशात संचार करणाऱ्या विमुक्त पक्ष्याप्रमाणे मला वाटतात. इतर कोणत्याही मानवसमाजापेक्षा ते परमेश्वरावर जास्त अवलंबून

असतात. परमेश्वराबद्दल त्यांना फार माहिती असेल असे मुळीच नाही पण ती आपल्यालासुद्धा नाही. जिप्सी मनुष्य परमेश्वराला त्याच्या आश्चर्यकारक कृतीमध्ये पाहातो आणि जरी परमेश्वरावर त्याची फारशी भक्ती नसली तरी ते परमेश्वराला दुखावतही नाहीत.

'जिप्सी जणूकाही आपल्या रक्ताचाच एक भाग असलेल्या परंपरांवर श्रद्धावर आधारलेले असे जीवन जगतात. ते आमच्या समाजाच्या चौकटीत, आमच्यामध्येच असतात. तरीही ते अलिप्त असतात. आम्हाला त्यांची फारशी माहिती नसते पण ते मात्र आमची सर्व रहस्ये जाणतात. कदाचित आमच्यापेक्षा त्यांना आमच्या संस्कृतीबद्दल जास्त माहिती असू शकते. प्राचीन काळी पूर्वेशी असणाऱ्या आमच्या सांस्कृतिक संबंधांचा तो एकमेव दुवा आहे. सर्वोत्कृष्ट नर्तक म्हणून समजल्या जाणाऱ्या स्पॅनिश लोकांपेक्षाही ते उत्तम स्पॅनिश नृत्य करतात तर हंगेरीयन लोकसंगीतात ते हंगेरीयन लोकांपेक्षा जास्त प्रवीण आहेत. ते ज्या छोट्या-छोट्या गोष्टी करतात त्या कौशल्याने करतात. ते नवीन असे काही करीत नाहीत पण चांगल्या परंपरामात्र उत्तमपणे टिकवितात. ते आपल्याला उपयोगी अशाच गोष्टी दुसऱ्यांकडून घेतात. त्यांच्या स्वभावात न बसणाऱ्या गोष्टीमात्र ते ठामपणे नाकारतात.'

'ते आमच्या इच्छा, आकांक्षाचे प्रतीक आहेत. खरे स्वातंत्र्य व निसर्गाशी एकरूपता, खुल्या आकाशाखालील जीवन, सततचा बदल, नव्या वाटा, नवी ठिकाणे ह्यांचे ते मूर्तिमंत रूपच आहेत. आज आम्ही प्रगतीच्या सहन न होणाऱ्या भाराखाली वाकलो आहोत तर आजच. जिप्सी हा संस्कृतीपूर्व काळातील निसर्गाचे एक चित्रण आहे. आमच्यातील सर्व काव्यात्मकता व निसर्गप्रेम आम्ही त्यांच्यातच पाहातो. आमची स्वप्ने तो जगतो. जगातील रम्यतेचा अस्तित्वात असलेला तो अंतिम धागा आहे. त्याच्या चेहऱ्यावर आम्हाला कोणतीच कृत्रिमता दिसत नाही किंवा आमची प्रगती त्याला आकर्षित करीत नाही. आमचे कायदे त्याला वाकवू शकत नाही. अशा ह्या जिप्सीला कायद्याच्या बंधनाखाली स्थिर जीवन जगण्यास भाग पाडणे म्हणजे मानवतेच्या एका अलौकिक इच्छेला दाबून टाकणेच होय.'

असे हे जिप्सी भारतातून अनेक शतकांपूर्वी दुसऱ्या देशांमध्ये भटकत भटकत गेले असले तरीही ते भारतभूमीशी आपले रक्ताचे नाते सांगतात, भारतीय रूढीपरंपरांची जपणूक करतात आणि आजही भारतीय परंपरांबद्दल आदर बाळगतात. असे हे जिप्सी भारतभूमीचीच लेकरे पण भारतापासून अनेक शतके दूर राहिल्यामुळे भारतीयांच्या स्मृतीआड झालेली.

**संदर्भ :** जिप्सीज : फारगॉटन चिल्ड्रेन ऑफ इंडिया
चमनलाल ( १९६९ )
प्रकाशन विभाग, माहिती व नभोवाणी मंत्रालय
भारत सरकार.

---

[ पान ३५ वरून ]

पाहिजे. जागच्या जागी न्यायनिवाडा करून गुन्हेगारांना शिक्षा करण्याचे प्रशासकीय व न्यायालयीन असे दुहेरी अधिकार या अधिकाऱ्यांना दिलेले असावेत.

### भटक्यांच्या हिताची कळकळ असणारे प्रशासन हवे

जिल्हापातळीवर बसून उंटावरून शेळ्या हाकणाऱ्या आदिम जनजाती दिखाऊ अधिकाऱ्याऐवजी तळपातळीवरच त्या जनजातीविषयी कळकळ असणारे आणि आदिम जमातीच्या विकासकार्याचे खास प्रशिक्षण घेतलेले सरकारी अधिकारी नेमले जाणेही आवश्यक आहे. आज अशी परिस्थिती आहे की भटक्यांचा गट खरोखरच विकसित झाला तर ज्यांचे हितसंबंध भलतेच धोक्यात येतील अशांच्याच हाती कथित विकासयोजनांच्या अंमलबजावणीची सूत्रे सोपविण्यात आली आहेत. पंचायत राज्याचा अनुभव कुठेही भटक्या विमुक्त जमातीच्या दृष्टीने हितकारक वा अभ्युदयकारी ठरल्याचे ऐकिवात नाही. अनुसूचित जाती-जमातीसाठी नेमलेल्या आयुक्तांनी आपल्या १९६२–६३ च्या अहवालात स्पष्टच नमूद केले आहे की, "आज सामाजिक व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण समाजातील वरचढ घटकांच्या हाती झालेले असल्यामुळे लोकशाही विकेंद्रीकरणातून अनुसूचित जमातींचे अधिक सखोल व व्यापक शोषणच प्रादुर्भूत होणे क्रमप्राप्त ठरले आहे."

औद्योगीकरण, आधुनिकीकरण, शहरीकरण, व्यापारीकरण, धरणे, पाटबंधारे योजना नैसर्गिक असंतुलन प्रदूषण संस्कृतीकरण, सर्वांगीण विकास प्रयत्न वगैरे सर्व गोष्टींचा अपरिहार्य परिणाम जनजातींवरही पडतच असतो अडचण एवढीच आहे की अडतीस वर्षांच्या स्वतंत्र लोकशाही भारताला आपले निर्णय घेताना जनजातींवर पडणाऱ्या त्यांच्या परिणामांची दखल घ्यावीशीही वाटत नाही. जनजातींचा प्रश्न सुटा काढूनच त्याचा विचार करण्याची आपल्याला सवय लागली आहे.

# महाराष्ट्रीताल कैकाडी समाज

'गावगाडाकर'
आत्रे यांनी घडविलेले दर्शन

सर्वसाधारणपणे 'भटके' म्हटले की गावोगाव चोरी करीत भटकणारे लोक अशी कल्पना जनमानसात रुजलेली असते. भटके गुन्हेगार जरूर आहेत पण ते प्रामाणिक आहेत त्यांची स्वत:ची अशी संस्कृती आहे. त्यांचे स्वत:चे असे नीतिनियम, भाषा, श्रद्धा, वेशभुषा, पोटापाण्याचा धंदा आहे. ह्या नीतिनियमांचे, धंद्याचे प्रत्येक भटका पालन करीत असतो. कैकाडी समाज हा अशाच भटक्यापैकी एक आहे. ह्या समाजाचा परिचय आणि त्यांच्या संस्कृतीची ओळख श्री त्रिं. ना. अत्रे ह्यांनी 'गावगाडा' ह्या पुस्तकात करून दिलेली आहे. प्रस्तुत लेख हा ह्या पुस्तकावरूनच घेतलेला आहे.

**संज्ञा :** महाराष्ट्रात कैकाड्यांच्या पोटजाती खाली लिहिल्याप्रमाणे आहेत.

[१] चोर कैकाडी उर्फ फिरस्ते किंवा डोंगलमोर.

[२] गावकैकाडी उर्फ बुटी, टोपले कैकाडी, यापैकी वाजंत्री काम करणाऱ्यांना वाजंत्री किंवा सनादी कैकाडी म्हणतात व घरदार करून राहिले त्यांना गृहस्थ कैकाडी म्हणतात.

[३] कुचडी कैकाडी किंवा कुंचीवाले.

[४] माकडवाले.

[५] कुथ (माकड) कैकाडी यांना लाल बाजारवाले किंवा गनसूर म्हणतात.

[६] तेलंगण किंवा कामाठी कैकाडी. हे कर्नाटक किंवा मद्रासकडील फिरस्ते कोर्चे, कोर्वे व पामलोर लोक होत.

कर्नाटकात कोर्च्यांच्या अगर कोर्व्यांच्या पोटजाती खाली लिहिल्याप्रमाणे आहेत.

[१] कोर्वे अथवा कल्ल कोर्वे

[२] कड्डी अथवा अगडी कोर्वे

[३] कुचे कोर्वे

[४] कोर्चे पामलोर

[५] वाजंत्री, सनादी किंवा ऊर कोर्वे.

ह्या प्रत्येक पोटजातीत चार कुळ्या किंवा गोत्रे आहेत.

[१] सातपाडी [२] मेलवाडी [३] कावाडी व मेंद्रगुट्टी.

**वस्ती :** महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, निजामशाही, मद्रास, म्हैसूर, वऱ्हाड व मध्यप्रांत ह्यात ते सापडतात.

**गुन्ह्याचे क्षेत्र :** वर लिहिलेल्या मुलुखात ते गुन्हे करतात. आपल्या तळांपासून सुमारे तीस मैलावर व चांगली शिकार मिळण्याचा संभव असला तर रेल्वेने प्रवास करून १०० मैलावरही कैकाडी गुन्हे करतात. तळाच्या जवळपास एखादे धाऊक घर दिसले तर ते तेथून तीस-चाळीस मैलावर मुक्काम हलवितात. आणि नंतर सुमारे एक महिन्याच्या आत बाहेर त्या घरावर छापा घालतात. ह्या जातीला भारी वळवळ असते आणि त्यांच्या टोळ्या खूप लांबवर पायपीट करतात. पुणे जिल्ह्यात गुन्हे केलेले कैकाडी वऱ्हाडात सापडले आणि सोलापुरातले बल्लारीत हाती लागले पण ते मोकाट हिंडत नाहीत. त्यांना खबर देणारे चहू मुलखी आहेत आणि जिकडील खबर येते तिकडे ते जातात. गाव कैकाडी व उर कोर्वे आणि पुष्कळ चोर कैकाडी व कल्ल कोर्वे हे गावातून कायमची वस्ती करून राहिले आहेत. बाकीचे फिरस्ते आहेत.

**लोकसंख्या :** ह्या जातीची गणती सुमारे सव्वीस हजार आहे पण हा आकडा बरोबर नसावा.

**स्वरूप :** ही जात हाडाची गुन्हेगार व फिरस्ती आहे. सहकुटुंब सहपरिवार, बायका पोरे, गाई-बैल, तट्टे गाढवे कोंबडे, बकरे, कुत्री वगैरेसह त्यांच्या लहानमोठ्या टोळ्या महाराष्ट्र व कर्नाटकात भटकतात. आपले सामान व पाले

ते गाढवावरून नेतात आणि गावापासून दूर उंचावर पाण्याजवळ तळ देतात. कुंची कोर्व्यांचा मात्र गावाजवळ तळ असतो. बेळगाव, धारवाड, बिजापूर, सोलापूर या जिल्ह्यात त्यांचा सुळसुळाट फार आहे. तसेच कोकणात त्यांचे हेर पुष्कळ असल्यामुळे ते कधी कधी घाटाखाली उतरतात. स्वरक्षणाकरिता आणि येणाऱ्या संकटाची एकमेकास ताबडतोब बातमी देता यावी म्हणून, चोर कैकाडी व कल्ल कोर्वे आपल्या झोपड्या गावाच्या ज्या भागात ते राहतात तेथे फार कसबाने बांधतात. एकमेकास लागून त्या अशा रीतीने बांधल्या जातात की त्यामधून ताबडतोब एकमेकांस खबर पोचविता येते. कल्ल कोर्वे नदीनाल्याजवळ झाडाखाली उतरतात आणि गुन्हा केल्याबरोबरच तळ मोडतात. त्यांच्याबरोबर बायकापोरे नसतात. क्वचित सैपाकाकरिता एखादी दुसरी तरुण स्त्री ते बरोबर घेतात. कड्डी कोर्वे गवताच्या किंवा बोरूच्या पालात सहकुटुंब सहपरिवार उतरतात. त्यांच्या गोण्याच्या पदरांना बाहेरून कातडे लाविलेले असते. कुंची कोर्वेही गवत-बोरुच्या पालात सहकुटुंब सहपरिवार राहतात शिवाय त्यांचेबरोबर डुकरे, माकडे असतात. कोर्वे चटयांच्या पालात सहकुटुंब सहपरिवार राहतात, त्यांच्याबरोबर बरेच गोणीचे बैल असतात. पामलोरांच्या कांबळ्याच्या पालावर खादी टाकलेली असून दोन्ही तोंडासमोर अटयांचे पडदे बहुतकरून बांधतात. त्यांच्या बरोबर बायका, मुले, गाई-बैल तट्टे, कुत्री ओझ्याची गाढवे वगैरे असतात.

कैकाडी मध्यम ते पुऱ्या उंचीचे बांधेसुद, धट्टकट्ट अतिचपळ श्रमसहिष्णु असतात त्यांचे काम आणि नजर तिखट असते. बायका आणि पुरुष काळे गदळ असतात व अव्यवस्थित रीतीने राहतात. गाय, बैल, म्हैस वर्ज्य करून सर्व प्रकारचे मांस खातात आणि खूप दारू व ताडी पितात. कल्ल कोर्वे आणि पामलोर यांच्यात बेटी व्यवहार होतो. बाकीच्या जातीत फक्त रोटीव्यवहार होतो.

महाराष्ट्रात पुरुष धोतर किंवा चोळणा नेसतात. बार-बंदी घालतात. अंगवस्त्र पांघरतात आणि रुमाल किंवा पागोटे बांधतात. त्यांच्याजवळ कधीकधी हसवी (खाकी बटवा) असते. बायका चोळी घालतात व कासोटा न घालता लुगडे नेसतात. त्या अंगावर खूप गोंदतात. कर्नाटकात कड्डी व कंची कोर्वे लंगोटी नेसतात आणि कांचा कसतात व डोक्याला रुमाल बांधतात आणि खांद्यावर धोतर किंवा घोंगडी घेतात.

कोर्वे बहुधा चड्डी किंवा चोळणा घालतात व लंगोटी घातली तर वरून धोतर गुंडाळतात ते अंगात अंगरखा व डोक्याला रुमाल घालतात आणि कांबळी किंवा हाचडा (पासोडा) पांघरतात.

पामलोरांचा पोषाख अंगरखा, अंगवस्त्र, रुमाल आणि डाव्या खांद्यावरून लटकणारी झोळी हा होय. इतर कैका-डणीप्रमाणे कोर्व्यांच्या बायका काही चोळ्या घालीत नाहीत आणि लुगडे असे नेसतात की आतला पदर डावी-कडून उजवीकडे निघून खांद्यावरून उरावर येतो व स्तन झाकतो. त्या हातात पोत व पितळी बांगड्या घालतात. त्या काचेच्या बांगड्या घालत नाहीत. पामलोरांच्या बायका चोळी घालतात व लुगड्याचे कमळ काढतात.

कैकाडी व कोर्वे यांच्या बायका पुरुषाप्रमाणे राकट असून गुन्ह्याचे कामात पुरुषांना हरप्रकारची साथ कर-ण्यात मोठ्या पटाईत असतात. टोपल्या वगैरे विकण्याच्या मिषाने दारोदार हिंडून गुन्ह्यासंबंधीची बातमी काढणे, माल लपवून त्याची विल्हेवाट करणे, दंग्याची व पोली-सांच्या हालचालीची बातमी आपले पुरुषांना देणे, प्रसंगा-नुरुप पोलिसांना झुकविणे किंवा त्यांना व्यत्यय आणणे, पुरुषांना भाकरी पोचविणे, त्यांना काय पाहिजे याचे धोरण बांधणे वगैरे सर्व कामे त्या मोठ्या चतुराईने करतात. त्या स्वजातीत व्यभिचार करतात. टोळीच्या तर्फेने बोलण्याचे काम बहुधा एखाद्या मोहक तरुणीवर सोपविलेले असते. जिकीरखोर पोलिसाला किंवा गावकामगारांना मुठीत आणण्याला हवे ते करण्याची तिला मुभा असते.

गुन्हे करण्यात अट्टल व बोलण्यात हुशार अशा इस-माला ते नाईक करतात आणि त्याचा हुकूम सर्वजण पाळतात. सोलापुराकडे पुढारीपण काही बायकांकडे आले. नायकाला उघड रीतीने वावरता येत नाही. अशावेळी त्याचे काम त्याची बायको करते. कल्ल कोर्व्यात नाय-काला रंगाएट, पामलोरात पुलाकुंज, कोर्व्यात वरमुन्सा आणि कड्डी कोर्व्यात नायकिनीला पुलाकुलमी म्हणतात.

रंगाएट व पुलाकुंज यांचे लग्न सुरी व कंगट्टी (घर-फोडीचे हत्यार) यांच्याशी लावितात. लुटीतील वाट्यां-शिवाय एकंदर लुटीचा पाचवा हिस्सा त्याला मिळतो.

**भाषा :** कैकाडी अर्वी किंवा अशुद्ध तेलगु बोलतात. त्यांना मराठी व कानडी येत असते. शिवाय त्यांचे सांके-तिक शब्द व खुणा आहेत.

कल्लकोर्वे आणि पामलोर ह्यांच्या सांकेतिक खुणा पुढे लिहिल्याप्रमाणे आहेत.

पोलिस येत आहेत हे दर्शविण्यासाठी ते तोंड मिटून रातकिड्याप्रमाणे आवाज काढतात.

पळून जा, हे दर्शविण्यासाठी ते तोंडाला हात लावतात,

किंवा कांहीसा घुबडाप्रमाणे व काही कोल्ह्याप्रमाणे आवाज काढतात

गचांडी धरली असता ते तळहाताचा मोठ्याने मुका घेऊन मुंगसाप्रमाणे आवाज काढतात, म्हणजे मागे राहिलेले लोक धावून येतात.

दडल्या ठिकाणाहून ते तोंडाला हात लावून लहान मुलाच्या रडण्याचा आवाज काढतात. त्यामुळे वाटसरू इकडे तिकडे पाहतो आणि त्याचे अंगावरचे दागिने दृष्टीस पडतात. म्हणजे त्याला लुटण्यात काही जीव आहे किंवा नाही ते उघड होते.

लांबच्या मनुष्याला बोलविणे झाल्यास भालूसारखा आवाज काढतात. दग्याचे भीतीने पांगलेली टोळी गोळा करणे झाल्यास ते बोकडासारखा किंवा घुबडासारखा आवाज काढतात अगर शिटी फुंकतात.

आत सापडलेल्या घरफोड्याला दग्याची इशारत देणे झाल्यास ते मांजरासारखे किंवा शेळीसारखे ओरडतात.

नाहीसा हो असे जोडीदाराला परक्या समक्ष सुचविणे झाल्यास कपाळ खाजवतात. अमुक बाजूला जा हे कपाळ खाजविताना त्या बाजूला कोपर करून सुचवितात.

तळ मोडून टोळी कोणत्या दिशेने गेली हे मागून येणाराला कळावे म्हणून ते खाली लिहिल्याप्रमाणे चिन्हे करतात.

झाडाची डहाळी मोडून ती चुलीच्या दगडांजवळ ठेवितात आणि डहाळीजवळ काटकोनात एक पाऊल बठविलेले असते. जिकडे टोळी गेली, त्या दिशेला डहाळीचे मोडलेले टोक असते. जेथे दोन किंवा अधिक रस्ते मिळतात तेथे पटाजवळ एक कडे काढून त्यातून मधोमध रेघ ओढतात म्हणजे कड्याबाहेर आलेल्या रेघेच्या टोकाच्या बाजूला टोळी गेली असे समजावे.

पावलाच्या कडेने भुसभुशीत जमिनीवर एक रेघ काढतात आणि तिच्या शेवटी पाऊल बठवितात. जिकडे पाऊल त्या दिशेला टोळी गेली असे समजावे किंवा एखादे पान अगर डहाळी तोडून तिजवर एक दगड ठेवून नजरेस पडेल अशा ठिकाणी हे ठेवितात.

जिकडे पानाचे अगर डहाळीचे टोक तिकडे टोळी गेलेली असते.

जेव्हा रस्ता सोडून जंगलातून व डोंगरातून भटकावे लागते तेव्हा ते थोड्या थोड्या अंतरावर झाडाची पाने पसरतात. म्हणजे मागच्या लोकांना माग लागतो.

**उपजीविकेची दर्शनी साधने :** चटया विणणे, कोष्ट्यांच्या कुंच्या, ओबडधोबड पाट्या व कणगी करणे, आणि कधी कधी दळण्याची जाती विकणे, उकटणे वगैरे कामे करतात. कोठे कोठे कैकाडी पोलिसातही नोकर आहेत. महाराष्ट्रात काहीजण वाजंत्री असतात, कांही शेतकी मातकाम करतात, कैकाडी आपल्या जमिनी बहुधा दुसऱ्यांना लावितात. काही कैकाडी माकडासापाचे खेळ करतात आणि खोड्यांत जनावरे पकडतात. काहींच्या बायका कसब करून घर चालवितात.

मुंबई इलाख्याच्या बाहेर या जातींचे काही लोक कसरत करतात. कर्नाटकात कल्ल कोर्वे चटया, टोपल्या करतात. कड्डी कोर्वे चटया करतात, त्यांच्या बायका भीक मागतात. कुंची कोर्वे पुंगी वाजवून पायात घुंगरे घालून नाचतात व भीक मागतात. ते माकडाचे खेळ करतात, शिकार धरतात. दोरखंडे, मुलांच्या कुरकुल्या शिंकी व कोष्ट्यांच्या कुंच्या करतात. त्यांच्या बायका गावात गोंदून व नशीब सांगून पैसे मिळवतात. कोर्चे चटया, सोल, शिंकी व धान्याची ने आण करतात आणि भीक मागतात वाजंत्री कोर्वे घरदार करून राहिले आहेत. ते शेतकाम, वाजंत्रीपणा, शिंदीच्या पाट्या, दोरखंड, केरसुण्या, शिंकीं वगैरे करतात.

**वेषांतर :** महाराष्ट्रात कैकाडी आपणास वडार म्हणवितात आणि बतावणी पुरी करण्यासाठी त्यांच्या बायका चोळी घालत नाहीत पुरुष चोळणे घालतात व टिकाऊ घेऊन फिरतात आपण घोंगडी तुणतुणेवाले, मराठे, गोसावी, किंवा जंगम आहोत असे भासवितात. कल्ल कोर्वे आणि पामलोर हे लिंगायत जंगम यांचा वेश धारण करतात, आणि आपण नशीब सांगणारे शंखघटाधारी दास्सये, शास्त्री गोळ, वैद्य सनादी, वाजविणारे वाजंत्री आहेत असे दर्शवितात. या वेषाने त्यांना घरात, देवळात जाता येते व खबरही मिळते. कधी कधी ते आपणाला धनगर, कुंची, अगर वाजंत्री कोर्वे म्हणवितात. महाराष्ट्रात कैकाडी एकटे किंवा जोडीने मारवाड्याच्या वेशाने व कर्नाटकात घरंदाज मराठ्याच्या वेशाने सोयरीक पहाण्याचा बहाणा करून हिंडतात.

पामलोर आणि कल्ल कोर्वे एखाद्या गावात मण्याराचे दुकान घालतात आणि गावाचा ठाव घेतात. सावकाराचा पोशाख करून ते कसबिणीच्या घरी उतरतात आणि खबर काढतात. कैकाड्यांना टोपण नावे फार असतात.

एखादी कैकाड्यांची टोळी चैनीत दिसली आणि तिच्यातले धट्टे कट्टे पुरुष वरचेवर नाहीसे होताना दिसले म्हणजे ती गुन्हेगार आहे असे समजावे. ज्या कैकाडवाड्यात बहुतेक बायका, मुले व थकलेभागलेले म्हातारे दृष्टीस पडतात, त्यालाही वरील नियम लागू पडतो. विचारपूस केल्यास बायका स्वच्छ सांगतील की आमचे नवरे व मुलगे

मेले. तरी पण पोलीसने पाळतीत कसूर करू नये.

**गुन्हे :** कैकाड्यांच्या टोळ्या आसपासच्या पिकांची चोरी करतात आणि शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या चोरून त्या लगेच मारून खातात. हे लोक अज्ञान मुले चोरून ती गरजूंना विकतात. महाराष्ट्रातील कैकाडी आणि कर्नाटकातील पामलोर आणि कल्ल कोर्वे हे निधड्या छातीचे, पाषाणहृदयी, पिढीजात दरवडेखोर आहेत ते रस्तालूट व घरफोडी करतात. खऱ्या म्हणून पितळेच्या मोहरा व मणी विकतात आणि चोरीचा माल घेणारांना भरवसा देऊन एकांत स्थळी नेऊन लुबाडतात.

कड्डी कोर्वे, पिके व शेळया मेंढ्या ह्यांची चोरी आणि रस्तालुट करतात. पेवे फोडून त्यातील धान्य ते लांबवितात आणि दरोडे घालतात. त्यांच्या बायका भीक मागताना चोऱ्या करतात.

कुंची कोर्वे, ३२ कोर्वे किंवा वाजंत्री बहुदा मोठासा गुन्हा करीत नाहीत.

कोर्वे रस्तालूट करतात आणि दरोडे घालतात ढोरे, शेळ्या, मेंढ्या चोरण्यातही ते पटाईत आहेत. पामलोर किंवा कल्ल कोर्वे ह्यांना दरोड्याचे कामी सामील होत नाहीत.

## गुन्ह्याची पद्धत :

**घरावर दरोडा :** टोपल्या विकताना आणि जाती झुकटताना कैकाडी, पामलोर आणि कल्ल कोर्वे ह्यांच्या बायका घर शोधून ठेवितात आणि त्याची खबर आपल्या पुरुषाला देतात. जर तिऱ्हाईताने खबर दिली तर टोळीतील एकजण पहिल्याने त्या घरची नीट पाहणी करतो पण केव्हा दरोडा घालावयाचा हे त्या बातमी देणाराला ते कळू देत नाहीत. घराची पाहणी करणारा इसम टोळीतल्या इसमांना त्या घराचा नकाशा जमिनीवर काढून दाखवितो.

कधी-कधी कोठे दरोडा घालावयाचा याची खबर कैकाडी तुरुंगातच दुसऱ्या कैद्याकडून मिळवतात, आणि तेथेच सुटकेनंतर घालावयाच्या दरोड्याबद्दल ठरवतात. खबर लागल्यावर त्यांच्या पायपिटीला सीमा नसते. बहुदा रात्री वाट चालतात. घरी पोचण्यापूर्वी उजाडले तर ते एखाद्या एकांत स्थळी किंवा जगलात दडतात, अगर टोळी फोडून वेगवेगळे चालून जातात. दरोड्याचे ठिकाण फार लांब असेल तर ते काही मजलपर्यंत बैलगाडी करतात आणि तिला बोकड बांधतात, जणू काय यात्रेला निघाले आहेत.

फेरीला निघण्यापूर्वी ते शकुन पहातात. भावनीची आराधना करून जेवण करतात आणि खूप दारू झोडतात कर्नाटकात ते कुऱ्हाड आणि कंगाष्टी यांची पूजा करतात, तिला "गबी" म्हणतात. दरोडा मारल्यावरही याचप्रमाणे ते पूजा व जेवण करतात. अशा प्रसंगी महाराष्ट्रात सत्यनारायण करतात. गुन्ह्याचे वेळी माल काढण्यासाठी किंवा आपली अगर झटापटीत घायाळ झालेल्या किंवा मेलेल्या साथीदाराची सुटका करून घेण्यासाठी वेळेवर कैकाडी खून सुद्धा पाडतील. त्यांना त्वेष फार चढतो. मोठी दुखापत झाली असेल, बांबू अगर ताज्या तोडलेल्या काठ्या टाकून दिलेल्या असतील, विड्याच्या पिचकाऱ्या दिसतील, किंवा घरचे जोडे चोरीस गेले असतील तर कैकाड्यांनी दरोडा घातला असे समजावे. ते बहुदा रात्री ८ ते १२ वाजेतो आणि क्वचित प्रसंगी मोठ्या पहाटेस दरोडे घालतात.

तळाच्या नीट रस्त्यापासून एकीकडे आणि दरोड्याच्या ठिकाणापासून सुमारे एक मैलावर ते एक संकेतस्थान ठरवितात. गुन्हा करण्यापूर्वी त्या ठिकाणी टोळीतले लोक जमून आपापले ठेवितात आणि कोणी काय करावयाचे वगैरे संबंधाने टोळीतल्या लोकांना नाईक समजूत देतो.

महाराष्ट्रात कधी कधी ओबडधोबड शिडी किंवा चढण्याचा वासा कैकाडी आपल्याबरोबर नेतात. दरोड्याच्या घरात ते मागच्या भितींनी धाब्यावरून उतरतात आणि कुऱ्हाडीने किंवा दगडांनी दारे फोडून इतरांना रस्ता खुल्ला करून देतात. कधी कधी आसपासच्या घरांना बाहेरून कड्या लावतात. आणि रस्त्यात काटे पसरतात. कोणी ओळखू नये म्हणून ते गुन्हा करताना कंबर कसतात. धाटे बांधतात. आणि तोंडाला राख किंवा पिंवडी फासतात. त्याचप्रमाणे कालेखान संभाळो, जमादार, बताव, मारो, गरीब लोक मत आव बंदुक भरो' वगैरे हिंदुस्थानी शब्द ते वापरतात. त्यांच्या जवळ मशाली असून ते कुऱ्हाड, पहार किंवा मोठ्या दगडांनी खिडक्या दरवाजे फोडतात.

दुसरे काही वाटेवर गोफण एकसारखी चालवितात, आणि जो मध्ये आडवा येईल त्याचे काम काढतात.

महाराष्ट्रातले कैकाडी कधी कधी आपटबारही काढतात. माल कोठे ठेविला आहे हे समजण्यासाठी आणि घरातले माणूस बाहेर जाऊ नये म्हणून कैकाडी घरातल्या सर्व माणसांना गोळा करून एका खोलीत कोंडतात व तिला कडी लावून घेतात अगर मालक किंवा दुसरा माहितगार इसम माल दाखवीपर्यंत त्या गोळा केलेल्या इसमांवर काही जण पहारा करतात. याप्रमाणे इकडे असे चालले आहे तो दुसरे लोक पेट्या फोडतात. आणि बायकांच्या अंगावरचे दागिने काढून घेतात.

निघून जाण्याची इशारत देण्यासाठी नाईक महाराष्ट्रात 'नडा' किंवा 'खूष' आणि कर्नाटकात 'काळ्या' किंवा

'फैल' म्हणतो. त्याबरोबर सर्वजण घराबाहेर गोळा होतात. सर्व आले असे पाहून नाईक हुकूम करतो, (कर्नाटकात पांजरा म्हणतो आणि सर्व टोळी संकेतस्थानी व तेथून तळावर जाते. माग लागू नये म्हणून ते बहुदा सरकत जमिनीवरून जातात. ज्यांच्याजवळ चोरीचा माल असतो ते चालतात व इतर त्यांच्या बाजूने चालतात.

पोलीसाला झुकविण्यासाठी ते गुन्ह्याच्या ठिकाणी परजातीचे कपडे किंवा परठिकाणचे जोडे टाकतात. आणि चोरीच्या मालापैकी फोल जिनसा संकेत स्थानी फेकून देतात, तसेच वाटेवरच्या गावाजवळ काही चोरीचा माल ते टाकतात. तळ लांब असला तर परत जाताना टोळीतील एखाद दुसरा माणूस वाटेवरच्या खेड्याच्या दुकानातून गूळ, शेंगदाणे विकत आणतो. आणि सर्वजण एखाद्या एकांत स्थळी ते खाऊन पुढे चालते होतात. कैकाडी बहुदा एका गावात एकापेक्षा जास्त घरे लुटत नाहीत.

एका खटल्यात असे दिसून आले की, फिर्यादीचे घरी एका कैकाड्याने लहानसहान कामे केली व पुढे तो नाहीसा झाला. काही दिवसांनी त्याच्या टोळीतले इसम एकेक दोन दोन निरनिराळया वाटांनी एका संकेत स्थळी जमले आणि गुन्हा करून आले तसे गेले. त्यांना एक ब्राह्मण सामील असावा असा संशय आला होता.

## घरफोडी

घाब्याला घारे पाडून शिरावयाचे असल्यास त्या घान्यावर एक काठी आडवी ठेवतात. तिला पागोटे किंवा दोरी लटकावून ते घरात प्रवेश करतात. महाराष्ट्रातले कैकाडी भिंतीच्या तळाला धावे घेऊन त्यातून आत जातात. आत घुसलेला इसम घर धुंडाळतो. तोपर्यंत बाकीचे इसम चोहोकडे पहारा करतात. कर्नाटकात कैकाडी रुमाली पद्धतीने घरफोडी करतात तिला 'मनकल्लू' म्हणतात आणि बगली पद्धतीने घरफोडी करतात तिला 'नोंदबुक' म्हणतात.

पहिल्या पद्धतीने भिंतीच्या तळाशी धावे घेऊन आत शिरतात आणि दुसऱ्या पद्धतीने चौकडीजवळ भोक पाडून आत हात घालून दाराची कडी काढतात किंवा आगळ सारतात. कोणी जागा होऊन मारण्यासाठी उभा आहे की नाही हे पाहण्यासाठी आत जाण्यापूर्वी काठीला कांबळी गुंडाळून ती आत घालतात, म्हणजे बसला टोला तर काठीला बसावयाचा. पामलोर आणि कल्लकोर्वे हे घरफोडीत अट्टल आहेत. ते भिंतीला जे धारे पाडतात ते फार मोठे नसून नीटनेटके असते, कैकाडी लोक बायका पोरांवर हात टाकीत नाहीत, मंगळसूत्र, केकत केवडा आणि जोडवी बिरुद्या नेत नाहीत, ते बाकीचे दागिने निर्दयपणे काढतात. जर एका घरी काही हाती लागले तर दक्षिणी कैकाडी दुसऱ्या घरावर छापा घालतात.

## रस्त्यावर दरोडा

कोर्चे आणि कड्डी कोर्वे रस्त्यावर दरोडा मारण्यात फार पटाईत आहेत. ते पाच ते पंचविसांची टोळी करून ज्या रस्त्यावर दरोडा घालावयाचा त्यापासून दोन-तीन मैलावर एखाद्या एकांत लपण्याच्या ठिकाणी जातात तेथे फाजील कपडे काढून ठेवितात.

तेथून त्यांचा बेमुंन्सा गावापासून लांब अशा सोईस्कर रस्त्याच्या भागावर टोळी नेऊन तिचे दोन तीन भाग करून, त्यांना थोड्या थोड्या अंतरावर बसवितो. आणि आपण एक इसम बरोबर घेऊन रस्त्यावर बसतो गाडी, टांगा किंवा लुटण्याला योग्य असा वाटसरू आला म्हणजे तो इशारा देतो, त्या बरोबर सर्वजण लपलेल्या ठिकाणातून बाहेर पडतात.

वाटसरूजवळ हत्यार असल्यास बेमुंन्सा त्याजवर हल्ला करून ते हिसकावून घेतो. टोळीतील लोक बैल किंवा घोडे सोडून गाडी उलथतात, मुशाफरांना ठोकतात, त्यांच्या अंगावरचे मूल्यवान जिन्नस हिसकावून घेतात व बोभाटा करू नये म्हणून कधीकधी त्यांना झाडाला बांधून ठेवितात.

नंतर सर्वजण कपडे ठेवलेल्या ठिकाणी जातात व कपडे घेऊन जे निघतात ते सुमारे वीस मैलावर मुक्काम करतात. अशा रीतीने अनेक रस्त्यांवर दरोडे मारून ते आपल्या तळाला परततात. अशा प्रसंगी त्यांच्या बरोबर बायका नसतात. ते बहुदा दिवसा व क्वचित रात्री दरोडा घालतात.

कड्डी कोर्व्यांच्या बायका बड्या चोर असतात. त्यांच्या त्यांच्या नायकिणीला चारवाटे मिळतात, आणि तिच्या नवऱ्याला दोन वाटे मिळतात. त्या भीक मागता मागता घराची कुलपे काढून चोऱ्या करतात. त्यांची चोरीची एक रीत अशी– ज्या घरात थोडी माणसे असतील त्याच्या मागच्या दारी काहीजणी बसतात. काही पुढच्या दारी मांडून एकमेकींना रक्त निघेपर्यंतही मारतात. अर्थात घरची माणसे तंटा तोडण्याला बाहेर येतात. तो मागच्या दारी असलेल्या कोर्विणी आत शिरून हाती लागेल ते घेऊन चालत्या होतात. तळ सोडण्यापूर्वी पामलोर आणि कल्लकोर्वे आपल्या चुलीच्या तीन-चार दगडांचा एक असे ढीग घालतात आणि कपाळाला राख फासतात. विड्यांच्या पिचकाऱ्या खूप दिसल्या किंवा जवळपास आग अगर आकड्याच्या पानांच्या पत्रावळी दिसल्या म्हणजे पामलोरांचा तळ होता असे समजावे.

कैकाडी बहुधा कबुली जबाब देत नाहीत. ते जिकडे

तिकडे सामसूम होईपर्यंत चोरीच्या मालाची वाटणी करीत नाहीत. दुसऱ्या जातीचे जे लोक त्यांना सामील होतात त्यांना ते रोकड देतात. महाराष्ट्रातील काही टोळ्यांमध्ये सर्व लूट नाईक घेतो. आणि टोळीतील इसमांना व त्यांच्या कुटुंबाला खाणे, पिणे, मांस पुरवितो. काही टोळ्यांमध्ये नायकाला दोन वाटे मिळतात. टोळीतील कैकाड्यांना शिक्षा झाली तरी त्यांच्या गैरहजेरीत मिळालेल्या लुटीचा वाटा त्यांना पोचवितात. गुन्हा करताना एखादा मेला तर त्याचा मुलगा किंवा दुसरा माणूस गुन्हा करण्याजोगा मोठा होई-पर्यंत त्याच्या कुटुंबाला वाटा मिळतो.

कैकाड्यांना पोलीस ठाण्यांची व जिल्ह्यांची हद्द चांगली माहित असते. एका जिल्ह्याच्या सरहद्दीवर तळ देऊन ते दुसऱ्या जिल्ह्याच्या सरहद्दीवर गुन्हा करतात. गाव पोलीस व गावकरी यांशी, वेळेवर तालुक्यातील कामगारांशी कैका-ड्यांची दोस्ती असते. त्यामुळे गुन्ह्याच्या तपासाला पुष्कळ अडचण पडते.

दरोडा मारल्यावर जर काही तपास वगैरे चालू नसला तर कैकाडी देवीची मोठी जत्रा करतात, आणि बायका-पोरांसुद्धा यथेच्छ दारू पितात. दारूच्या कैफात ते बरीच हकीकत बरळतात. सबब पोलिसांनी असल्या जत्रांच्या टेहळणीवर असावे.

अटकेतल्या कैकाड्यांवर फार जपून पहारा करावा कारण ते वाटेल ती युक्ती लढवून निसटून जातात. नुकतेच तेरा असामी तुरुंगातून खाली लिहिल्याप्रमाणे निसटले. तेरा इसमांना एका कोठडीत ठेवले. एकाने कबुली जबाब देऊन माल दाखवला. रात्री आठ वाजता सर्वजण मारामारी करू लागले. ज्याने कबुली जबाब दिला तो पहारेवाल्यास म्हणाला, 'मला जर दुसऱ्या कोठडीत ठेविले नाही तर मी मेलो.' हुकमाविरुद्ध पहारेकऱ्याने दार उघडले. आणि तेराही इसम दाराकडे धावले. पहारेकऱ्याच्या तोंडावर मडके आपटले आणि सर्वजण पळून गेले, त्यापैकी फक्त एकाला तेव्हाचे तेव्हा पकडले. तात्पर्य कैकाडी तुरुंगात भांडू लागले की दार उघडण्यापूर्वी सर्व पहारेकरी गोळा करावेत म्हणजे त्यांना पळून जाता येणार नाही.

## गुन्ह्याची हत्यारे :

गुन्हे करण्यासाठी कैकाडी काठ्या नेतात व गोफण, धोंडे, चवाळ्यात किंवा धोतरात घालून ते कंबरेला गुंडाळ-तात. शिवाय त्यांजवळ कोयता, कुऱ्हाड, सुऱ्या पहारी, मशाली आणि सापडल्यास बंदुका तलवारीही असतात. त्यांच्याजवळ 'कंगट्टी, पंसकोल्लु' किंवा 'शिल्लाकळ' (सुमारे एक फूट लांबीची टोकांकडे चिंचोळी होत होत गेलेली पहार) असते, महाराष्ट्रातल्या कैकाड्यांजवळ एक ओबडधोबड शिडी किंवा एखादा लहान झाडाच्या फांद्या तोडून त्याचा चढण्याकरिता केलेला बासाही असतो. त्यांच्या कुऱ्हाडीला दांडा बहुदा नवीन लाविलेला असतो, आणि काठ्याही नवीन तोडलेल्या असतात. शेतकऱ्यांच्या गोफणीपेक्षा त्याच्या गोफणी लहान असतात कड्डी कोर्व्यांच्या बायकांजवळ कुलपे उघडण्यासाठी खिळा किंवा किल्ल्यांचा जुडगा असतो.

## चोरीच्या मालाची निर्गती :

चोरीचा माल ते दरीत, नाल्यात, शेतात, जंगलात, स्मशानात किंवा उकिरड्यात पुरतात, आणि काही दिवसांनी गाव कामगार, सावकार, कलाल, सोनार, यांच्या मार्फत तो फुकून टाकतात. कैकाडी आता सोने चांदी गाळावयाला शिकले आहेत. पुरलेला माल लवकर बाहेर काढण्याचा संभव नसला तर रुपाया कापून तो लोखंडाच्या तुकड्यासह तेथे पुरतात, म्हणजे मालाला भूतबाधा होत नाही. अशी त्यांची समज आहे. मराठे, पाटील, किंवा देशमुख यांचा वेश घेऊन मुंबईसारख्या शहरात कैकाडी माल विकतात.

तसेच टोळीतली एखादी तरुण व हुशार बाई लिंगा-यतणीचा पोषाख करून गहाण जमीन सोडविण्याच्या मिषाने चोरीचा माल राजरोस विकते. एका सोनाराने कैकाड्याच्या टोळीबरोबर जाऊन त्यांच्या जवळील माल चोरी झाल्या, बरोबर संकेत स्थळी विकत घेतला. एकदा कैकाड्यांनी चोरीचा माल घोड्याच्या टांग्यातून नेला. पूर्वी चुली, अंथरुणे, पालाच्या मेखा, वळीमूठ (खोगीर) यांच्याखाली कैकाडी माल पुरून ठेवीत असत. एका प्रसंगी चोरलेले दागिने व तीस रुपये कैकाड्यांनी सुपा पोपळ्यांच्या काठात विणले व गोधडीत शिवले. कैकाड्यांचे एकमेकात इमान नसते. टोळीतील इसम कधी कधी एकमेकांच्या चोरून चोरीचा माल एकीकडे फेकून देतात, आणि परत येऊन घेऊन जातात. एखाद्या विषयी कपटाचा संशय आला तर त्याला प्रमाण करावयाला लावितात. म्हणजे कढत तेलात अंगठी किंवा चवली टाकतात, आणि ती त्याला काढावयास सांगतात. जर त्याची बोटे भाजली नाहीत तर तो निरपराधी समजतात. कैकाड्यांचा तळ फार दिवस एकाच गावी पडून राहिला तर असे समजावे की गाव कामगार वगैरे त्यांना अनुकूल आहेत. चोरीचा माल गाढवाच्या वळीत किंवा गोणीत लपवून एखादी म्हातारी बाई त्याजवर किंवा त्या-बरोबर जाते.

कैकाड्यांचा झाडा घेताना एखादी बाई शौचाला किंवा लघवीला जाऊ लागली तर तिजवर लक्ष असावे. कारण बायका लुगड्याच्या निऱ्यात, तोंडात बगलेत जिनसा लपवितात. एकदा कैकाड्याच्या तळाची जमीन नांगरली तेव्हा तेथे चौदाशे रुपये सापडले. सबब झाडा घेताना तळाची जमीन नांगरावी. कोऱ्र्यामध्ये अशी रीत आहे,की टोळीतील एक इसम आडरस्त्याने हलक्या किंमतींचा चोरीचा माल व कंगट्टी आणि कुऱ्हाड घेऊन जातो, नवीन तळाला पोचल्यावर टोळीतील एखादा दुसरा इसम जुन्या तळाच्या जाग्यावर परत येतो आणि रात्री तेथील माल घेऊन जातो. आणि मग नव्या तळाजवळ ती पुरून ठेवितात.

( बंद दरवाजावरून साभार )

# आवाहन

**भटक्या विमुक्तांच्या अडचणी, सुख-दुःख आणि विचारांची बांधिलकी मानून उद्बोधनाचे कार्य करणाऱ्या पाक्षिक ' विमुक्त विचार ' ला हवंय —**

- कृतिशील विचाराचं लेखन
- विद्रोही कथा, कविता
- परखड विचार
- भटक्या विमुक्त जमातीची जीवन गाथा
- अभ्यासपूर्ण लेख.

**संपादक ' विमुक्त विचार '**
बंजारा कॉलनी औरंगाबाद ४३१००१

# हाकारा लेखन सूची १९८६

**हाकारा वर्ष सातवे । अंक पहिला । जानेवारी–मार्च १९८६ । जंगल आणि धरण**

आम्हाला डोळाभर पाण्याची भेट ... मेधा पाटकर
जंगल – भारत आणि महाराष्ट्र ... दिनानाथ मनोहर
वननीती : एक प्राथमिक मसुदा ... शरद कुलकर्णी
पुस्तक परिक्षण : पर्यावरणाची दशा व दिशा ... प्रकाश गोळे
एका काडीची क्रांती ... प्रकाश लवेकर

**हाकारा वर्ष सातवे । अंक दुसरा । एप्रिल–जून १९८६ । आदिवासी कला**

आदिलीला : प्रत्यक्ष जीवन की नाट्य ... प्रा. रमेश कुबल
सावरांची भिंतीवरील वैशिष्ट्यपूर्ण चित्रकला व तिचे धार्मिक महत्त्व ... सुधीर जोग
आदिवासी कलाविचार .. सुचित्रा साठे
लोककला : एक समांतर प्रवाह ... संध्या बागळे
आदिवासी कला व संग्रहालये ... वसंत हरि बेडेकर

**हाकारा वर्ष सातवे । अंक तिसरा । जुलै–सप्टेंबर १९८६ । आदिवासी व वेठबिगारी**

वेठबिगारी पद्धत म्हणजे काय ? ... रा. वि. मुस्कुटे
सुडका – मडका घे, सुटून पड ! ... गोदूताई परुळेकर
लग्नवडी : वेठबिगारीचा एक प्रकार ... वसंत देशपांडे
व्यथा कोळसा मजुराची ... रमाकांत पाटील
आपण कधीच विजयी होणार नाही ? ... सतीश कामत
कायदा आणि समाजपरिवर्तन ... शरद कुलकर्णी

**हाकारा वर्ष सातवे । अंक चौथा । ऑक्टोबर–डिसेंबर १९८६ । आदिवासीविषयक ग्रंथ व मानवशास्त्र परिचय**

मानवशास्त्र : स्वरूप व व्याप्ती .... सुधीर जोग
आदिवासी अभ्यास आयोग
सावकारीने उध्वस्त केलेले आदिवासी जीवन ... एकनाथ बागुल
छत्तीसगडमधील कामीयांचा संघर्ष ... शरद कुळकर्णी
आंबेडकर आणि मार्क्स ... सदानंद मोरे
विमुक्त जमातींचा एक अभ्यास ... शरद कुळकर्णी

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# 'हा का रा'

## सूची


| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी–मार्च | १९८० — जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल–जून | १९८० — आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै–सप्टेंबर | १९८० — आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८० — आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी–मार्च | १९८१ — दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल–जून | १९८१ — आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै–सप्टेंबर | १९८१ — वनशेती व संवर्धन |
| अंक आठवा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८१ — रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी–मार्च | १९८२ — उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल–जून | १९८२ — धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै–डिसेंबर | १९८२ — जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी–मार्च | १९८३ — आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल–जून | १९८३ — आदिवासींच्या सामाजिक/राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा जुलै- सप्टेंबर | १९८३ — प्रा. सरदार गौरव अंक/आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर डिसेंबर | १९८३ — आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-अठरा : जानेवारी–जून | १९८४ — आदिवासीमधील स्वयंसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै–सप्टेंबर | १९८४ — आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८४ — आदिवासींचे आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी–मार्च | १९८५ — आदिवासी संघटना |
| अंक बाविसावा : एप्रिल–जून | १९८५ — जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै–सप्टेंबर | १९८५ — आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८५ — आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी–मार्च | १९८६ — जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल–जून | १९८६ — आदिबासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै–सप्टेंबर | १९८६ — आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : आक्टोबर–डिसेंबर | १९८६ — आदिवासीविषयक ग्रंथ व मानवशास्त्र परिचय |

*Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80*

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन.

कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व-शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे, याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून '**हा का रा**' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रुपये |
| आदिवासी कार्यकर्ते सभासद | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोशिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी. मनीऑर्डर पाठविल्यास फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**रा. के. मुटाटकर,** सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
६४/३, आनंद पार्क, औंध, पुणे ४११००७

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.